घटक २

(Semester I)

१.मराठी साहित्यप्रवाह आणि साहित्यकृतींचा परिचय होईल.

२.कथा या साहित्य प्रकाराचे आकलन होइल.

३.साहित्याच्या अभिरूचीचा विकास होईल.

४.मराठी कथेचा परिचय होईल.

५.ललित लेखाचे स्वरूप समजून घेता येईल.

५.साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधांचे आकलन होईल.

प्रास्ताविक : कथा हा कथात्म साहित्याचा महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. गोष्ट सांगण्याच्या प्रवृत्तीतून कहाणीचा जन्म झाला आणि कहाणीपासून लघुकथेपर्यंत या कथनपर साहित्यप्रकाराने निरनिराळे रूपविशेष धारण केले. व्यक्तींच्या जीवनात ज्या घटना प्रसंग घडतात त्या व्यक्ती, त्यांच्या वृत्ती-प्रवृत्ती, संघर्ष, संवाद-विसंवाद या सर्वांचे वर्णन कथेत येत असते. कथा आकाराने लहान असते. प्राचीन काळापासून देशविदेशात लोककथा, परीकथा, नीतिकथा, दैवतकथा इत्यादी प्रकार ही मौखिक परंपरेतील कथा रूपे होत. त्यातूनच आधुनिक कथा विकसित झाली. ज्या कथेला लघुकथा असे म्हटले जाते; ती एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अस्तित्वात आली. कथेत मोजकी पात्रे, प्रसंग, वातावरणादी घटक या सर्वांच्या सुंदर मिलाफातून कथा आकाराला येत असते, व दर्जेदार कथेत एखाद्या व्यक्तीच्या, व्यक्तिसमूहाच्या, मानवी नातेसंबंधाच्या किंवा स्वभाववैशिष्ट्याच्या एखाद्या प्रसंगाच्या अथवा अनुभवाच्या विशिष्ट अशा पैलूवर लक्ष केंद्रित करून त्याचे दर्शन घडविलेले असते. कथेत कथानक, पात्र, वातावरण, निवेदनपद्धती व भाषा हे महत्त्वाचे घटक असतात. कथेचे भयकथा, रहस्यकथा, विज्ञानकथा, अद्भुतकथा, ग्रामीण कथा, दलित कथा, महानगरीय कथा असे प्रकार असतात. वाचकांच्या मनात कुतूहल, जिज्ञासा, उत्कंठा जागृत व्हावी अशा पद्धतीने कथा लिहिली जाते. हरिभाऊ आपटे, वि.स.खांडेकर, ना.सी.फडके, वामनराव चोरघडे, पु.भा.भावे, व्यंकटेश माडगूळकर, जी.ए.कुलकर्णी, कमल देसाई, विलास सारंग, भाऊ पाद्धे, जयंत पवार इत्यादी अनेक कथाकारांनी कथेच्या क्षेत्रात लक्षणीय भर घातली आहे. या कथाकारांनी मराठी कथेच्या प्रांतात आशय आणि आविष्कार या दोनही बाबतीत अनेक

प्रयोग केले. माणसाच्या अस्तित्वाचा शोध घेणारा एक महत्त्वाचा साहित्यप्रकार म्हणून कथेकडे पाहिले जाते.

मिटिंग – शंकर पाटील

शंकर पाटील : शंकर बाबाजी पाटील (जन्म०८ ऑगस्ट १९२६ मृत्यू ३० जुलै १९९४) हे मराठी साहित्यातील अत्यंत महत्त्वाचे ग्रामीण लेखक आहेत. कथा, कादंबरी, वगनाट्य, ललित लेख, चित्रपटच्या कथा अशा विविध साहित्यप्रकारात त्यांनी साहित्यनिर्मिती केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील पट्टणकोडोली येथे त्यांचा जन्म झाला. तारदाळ, गडहिंग्लज आणि कोल्हापूर येथे त्यांनी बी.ए.बी.टी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. रयत शिक्षण संस्थेत त्यांनी अनेक वर्षे अध्ययन आणि अध्यापन केले. १९५७ मध्ये पुणे आकाशवाणी केंद्रावर त्यांची नियुक्ती झाली. १९५९ मध्ये त्यांना एशिया फाऊंडेशनची शिष्यवृत्ती मिळाली. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळात मराठी भाषा विषयासाठी विशेष अधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले त्यांच्या अनेक कथासंग्रहांना महाराष्ट्र राज्याची पारितोषिके मिळाली आहेत. निवडक शंकर पाटील (१९६६) या त्यांच्या प्रातिनिधिक कथांच्या संग्रहाचे भारतीय आणि पाश्चात भाषांत अनुवाद झाले आहेत. वळीव (१९५८), भेटीगाठी (१९६०), आभाळ (१९६१), धिंड (१९६२), खेळखंडोबा (१९७४), ताजमहालमध्ये सरपंच (१९७७), इत्यादी कथासंग्रह त्यांनी लिहिलेले आहेत. त्यांनी लिहिलेली टारफुला (१९६४) ही कादंबरी मराठी साहित्यात महत्त्वाची मानली जाते. गल्ली ते दिल्ली, कथा अकलेच्या कांद्याची, लवंगी मिरची कोल्हापूरची इत्यादी लोकप्रिय वगनाट्ये त्यांनी लिहिलेली आहेत. चोरीचा मामला, पिंजरा, केला इशारा जाता जाता, एक गाव बारा भानगडी, डोंगराची मैना, छंद प्रीतीचा, भोळीभाबडी, पाहुणी, लक्षी इ. इत्यादी चित्रपटाच्या कथा, पटकथा आणि संवाद शंकर पाटील यांनी लिहिले आहेत.

शंकर पाटील यांनी ग्रामीण संवेदनशीलतेने कथालेखन केले आहे. ग्रामीण जीवनाचा आणि तेथील माणसांचा वेध घेणारी कथा त्यांनी लिहिली आहे. ग्रामजीवनातील निसर्ग, माणसे, रूढी, परंपरा, संस्कृती, समाजकारण, राजकारण इत्यादींचे वास्तव चित्रण त्यांच्या कथांमध्ये परिणामकारकपणे आले आहे. ग्रामजीवनातील अनुभवांना त्यांनी त्यांच्या खास अशा ग्रामीण बोलीभाषेत चित्रित केले आहे. त्यांची भाषा ही त्यांच्या अनुभवातून सिद्ध झालेली भाषा आहे.

कथेच्या प्रांतात ते सतत प्रयोगशील राहिलेले दिसतात. आशय आणि त्याच्या आविष्काराची विलक्षण जाण त्यांच्याकथांमधून प्रत्ययास येते.

मिटिंग या कथेचा आशय : मिटिंग ही शंकर पाटील यांची बहुचर्चित कथा आहे. ही कथा जशी वाचकप्रिय आहे तशीच ती श्रोत्यांच्याही खूप आवडीची कथा आहे. शंकर पाटील हे ग्रामीण कथा लेखक म्हणून जसे परिचित आहेत तसेच ते एक उत्कृष्ट कथाकथनकार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. मिटिंग या कथेचे त्यांनी महाराष्ट्रभर कथाकथनाचे प्रयोग केले आहेत. ग्रामजीवनातील घटना प्रसंगांना त्यांनी आपल्या विशिष्ट अशा लेखनशैलीने सर्वदूर पोहोचविले आहे. मिटिंग या कथेचा आशय तसा अत्यंत सहजसोपा असा आहे. ग्रामपंचायतीत नेहमीप्रमाणेच एक मिटिंग बोलावण्यात येते. या मिटिंगकरिता गावातील बाळा माळी वगळता इतर सदस्य (मेंबर) वेळेवर उपस्थित राहिले नाहीत; त्यामुळे या मिटिंगची आठवण करून द्यावी म्हणून गावचे सरपंच महादेव या शिपायाला सदस्यांच्या घरी जाऊन त्यांना आठवण करून द्यायला सांगतात. सरपंच यांनी सांगितलेले काम करण्यासाठी म्हादू सदस्यांच्या घरी जातो. याप्रसंगी ज्या काही गमती जमती घडतात त्याचे कथन शंकर पाटील यांनी विलक्षण विनोदी शैलीत या कथेत केले आहे.

ग्रामपंचायतीतील मिटिंगकरिता म्हादू हा शिपाई सर्वप्रथम बापशा लोहार यांच्या घरी जातो तो वाकळ पांघरून घेऊन झोपलेला असतो. म्हादू अंगणात उभा राहून 'बापसाबअऽऽऽ 'अशी हाक मारतो. त्याची बायको प्रश्नार्थक चेहऱ्याने दार उघडते. 'पंच काय करत्यात' असा प्रश्न विचारताच, 'पंच निजलं कीरं बाबा. असे चाणाक्ष उत्तर ती देते आणि 'उद्या सकाळी मिटिंगचा निरोप देते'असेही ती सांगते. यावर काय उत्तर द्यावे हे म्हादूला समजत नाही. सरपंच फारच रागावले आहेत, सर्वांना ताबडतोब घेऊन यायला सांगितले आहे, काकुळतीला येऊन तो सांगू लागतो. झोपेचं सोंग घेतलेल्या माणसापुढे म्हादू शिपायाचे काहीच चालत नाही हतबल होऊन अखेरीस बापू लोहार यांना तो म्हणतो, ''मग हितं पडायचे ते तिथं येऊन पडा की, मधी उठवून आनि च्या देतो.'' चहाचा विषय निघताच बापू लोहार मिटिंगला यायचे कबूल करतो.

मिटिंग या कथेत घडणाऱ्या प्रत्येक प्रसंगाचे चित्रण शंकर पाटील यांनी विनोदी शैलीने केले आहे. मिटिंगकरिता बापू लोहाराला तयार करून म्हादू शिपाई भालू सोनार या सदस्याच्या घराकडे जातो. देसायाच्या आवडाक्काचे दागिने तयार करत बसलेला भालू सोनारही मिटिंगला हजर न राहण्याबाबत काहीबाही कारणं सांगू लागतो, ''लेका, बारसं महत्त्वाचं का तुझी मिटिंग

महत्त्वाची?'' असे नेमके कारण सांगून हातातले काम होताच मिटिंगला येतो. असे सांगताच म्हादू शिपाई शंकर कोळी यांच्या घरी जातो. रंगेल व्यक्तिमत्त्वाचे शंकर कोळी त्यांच्या बायकोला 'मिटिंगला जातो' अशी खोटी थाप मारून दुसऱ्याच एका बाईच्या घरात जाऊन बसलेले असतात. शंकर कोळी यांची बायको सहाजिकच प्रचंड रागावते. आणि म्हादू शिपाई यालाच, ''लगोलग जाऊन तिथं बसल्यात का हे बघून सांगायला ये बघू'' असे जास्तीचे काम सांगते. नाईलाजाने म्हादू शिपाई परटिणीच्या घराकडे जातो. झोपाळ्यावर पान खात शंकर कोळी बसलेले असतात. सोबत परटिणबाईही असतेच. शंकर कोळी घाबरून जातात आणि ''मी हितं न्हाई म्हणून सांग जा. हितं बसलोय म्हणून सांगितलस तर जोड्यानं हानीन बघ.'' असा सज्जड दम भरतात.

माणसांच्या तऱ्हेवाईकपणाचे अनुभव घेत घेत म्हादू शिपाई दाजीबा देसाई यांच्या वाड्याकडे जातो. गड्यांकरवी जोंधळ्याच्या पोत्यांची हलवाहलव करणारे देसाई आयताच सापडलेल्या म्हादू शिपायालाही जोंधळ्याची थप्पी रचण्याचे काम लावतात. बिचारा म्हादू शिपाई कोणतेही आडेवेडे न घेता हे कामही इमानेइतबारे करतो. इतकेच नव्हे तर उसाला पाणी पाजण्याकरिता, 'कुणाची रिकामी बैलजोडी मिळते का बघ' असे आणखीही एक अधिकचे काम लावतात. या कामातून स्वत:ची कशीबशी सुटका करून घेत म्हादू बाहेर पडतो आणि तडक वाटेवरच असलेल्या तारामावशी यांच्या घराकडे निघून जातो. तारामावशीची म्हैस व्यायला आलेली असते. तिच्या बाळंतपणाची काळजी तारामावशीला लागलेली असते. तरीही ती मिटिंगसाठी वेळ काढते. घराबाहेर पडताना ती गोठ्यात चक्कर मारून येते आणि हातात एक कंदिल घेऊन ती मिटिंगला जाण्यासाठी निघते.

मिटिंगकरिता सर्वसदस्यांना निरोप देऊन आलेल्या म्हादा शिपायाला झालेला आनंद शंकर पाटील यांनी 'एक दसऱ्याची शिकार साधावी तसा आनंद म्हादाला झाला.' अशा शब्दात केले आहे. मिटिंगचा कोरम भरतो. रागात असलेले सरपंच, डुलक्या घेणारा बाळा माळी, भिंतीला लागून आडवा झालेला बापशा लोहार, तपकिरीची डबी घेतलेली तारामावशी अशा वातावरणात थोडासा जागा होऊन, ''च्या घेऊनच मिटिंग सुरू करा.'' असे म्हणणारा बाळा माळी. पायात चप्पल सरकवत, ''निम्मी रात्र गेली आनि कसली मिटिंग घेता आता? फुडच्या आठवड्यात ठेवा.'' असे उद्गार काढणारा शंकर माळी. हे सर्व रागानं सरपंच पाहतात. आणि अजिंड्यावरचे विषय पाहत सेक्रेटरीला ते म्हणतात, ''विचारता काय? कोरम भरल्याला हाय; मिटिंग सुरू करा.''

आणि मिटिंग सुरू होते. गावपातळीवरील मिटिंगसारखा विषय अत्यंत विनोदी पद्धतीने शंकर पाटील यांनी खास अशा त्यांच्या रंगढंगात या कथेत मांडला आहे.

कथेतल्या बिलंदर व्यक्तिरेखा : शंकर पाटील यांचे घटना प्रसंगांचे, मानवी भावभावनांचे, वृत्तीप्रवृत्तींचे सूक्ष्म निरीक्षण अत्यंत तीव्र होते. मिटिंग या कथेतही याचा प्रत्यय आल्यावाचून रहात नाही. चित्रदर्शीपणाने हे सारे वाचकांना जाणवत राहते. कथेत घडणारा प्रसंग साक्षात आपल्या नजरेसमोर घडतो आहे, असे वाटत राहते. या छोट्याशा कथेत अनेक व्यक्तिरेखा येतात. सरपंच, म्हादू शिपाई, बापशा लोहार, भालू सोनार, शंकर कोळी, दाजीबा देसाई, तारामावशी अशा व्यक्तिरेखा या कथेत येतात. या छोट्याशा कथेत तितक्याच छोट्या घटनाप्रसंगात या व्यक्तिरेखा आल्या आहेत. तरीही या व्यक्तिरेखांचे चालणे-बोलणे, स्वभाव असे सारेकाही ठळकपणाने जाणवत राहते. रागावलेले सरपंच, म्हादू शिपायाचा प्रामाणिकपणा, भोळेपणा, निरागसता, अगतिकता पडेल ते काम कुणालाही नाही न म्हणता करीत राहण्याची सचोटी हे सारेकाही जाणवत राहते, बापशा लोहाराचा व त्याच्या बायकोचा वेळकाढूपणा, काम टाळण्याची वृत्ती, आळशीपणा हे सारेकाही शंकर पाटील यांनी अत्यंत मोजक्याच शब्दांमध्ये व्यक्त केले आहे.

या कथेत येणारा भालू लोहारही असाच गावच्या महत्त्वाच्या मिटिंगकरिता न देणारा आणि आपलं काम आणि पैशाला महत्त्व देणारा असा जाणवत राहतो. या कथेत शंकर कोळी ही व्यक्तिरेखा शंकर पाटील यांनी अगदी समरसून रेखाटली आहे. बिलंदर असलेला शंकर कोळी मिटिंगला जातो आहे; असे सांगून परटिणीच्या घरी तिच्यासोबत पान खात झोपाळ्यावर झुलत बसलेला तरीही बायकोला घाबरणारा, 'मी मिटिंगलाच गेलो आहे.' असे खोटेच घरी सांगायला लावणारा असा हा शंकर त्याच्या स्वभाव वैशिष्ट्यामुळे लक्षात राहतो.

इतरांविषयी कणव नसलेली, माया, ममता, प्रेम आपुलकी नसलेली स्वकेंद्रित-स्वार्थी माणसेही गावपातळीवरही आढळत असतात. याचेच प्रातिनिधिक पात्र म्हणजे दाजीबा देसाई. ते एका मोठ्या वाड्यात राहतात. जोंधळ्याच्या पोत्याची थप्पी इतर मजूरांकडून ते लावून घेत आहेत. मिटिंगकरिता सांगावा घेऊन आलेल्या म्हादू शिपायालाही ते काम सांगण्यास कचरत नाहीत. केवळ इतकेच नव्हे तर उसाच्या शेताला पाणी पाजण्याकरिता, 'एका बैलजोडीची व्यवस्था कर' असा हुकूमही ते सोडतात. म्हादू शिपायावर ते रागावतात, चिडतात हा प्रसंग वाचताना म्हादू शिपायाबद्दलचे ममत्व अधिकच वाटू लागते.

शंकर पाटील यांनी या कथेत तारामावशी ही व्यक्तिरेखा अत्यंत मोजक्याच शब्दात रेखाटली आहे. तिची म्हैस व्यायला झालेली असते. तरीही हातात कंदिल घेऊन ती मिटिंगकरिता घराबाहेर पडते. कोणत्याही प्रकारचे व्यक्तिगत संकट असले तरी त्याची काहीएक तजवीज करून मिटिंगसारखे गावचे काम महत्त्वाचे असते. आणि या कामाकरिता आपण वेळ दिला पाहिजे; हा संस्कार तारामावशी या व्यक्तिरेखेतून आपणास मिळतो.

चित्रदर्शी वातावरणनिर्मिती : कथेचा एकच एक संस्कार वाचकांच्या मनावर व्हावा हा हेतू डोळ्यांपुढे ठेऊन कथेतील वातावरणनिर्मिती करावी हे चांगल्या कथाकाराचे वैशिष्ठ्य असते. मिटिंग या कथेतूनही शंकर पाटील यांनी अतिशय समर्पक अशी वातावरणनिर्मिती या कथेत केली आहे. कथेचे स्थळ आहे ग्रामपंचायतीचे कार्यालय आणि कथा घडणीची वेळ आहे सायंकाळ ते रात्र अशी. संध्याकाळ, ग्रामपंचायतीचे कार्यालय, अस्वस्थ असणारे सरपंच, ग्रामपंचायतीच्या दरवाजाच्या समोर गटारीवरच्या पायरीवर विड्या ओढत बसलेला म्हादू शिपाई असे कथेच्या सुरूवातीलाच असलेले वातावरण वाचकांच्या मनाची पकड घेते. शिवाय गालात तंबाखू धरून तक्याला टेकून बसलेले सरपंच, तुळीला मधोमध टांगून ठेवलेली गॅसबत्ती असे ग्रामजीवनातले–ग्रामपंचायतीतले समग्र वातावरण कथेच्या सुरूवातीसच अत्यंत नेमक्या आणि परिणामकारक शब्दात शंकर पाटील यांनी रेखाटले आहे. हे सगळे वातावरण संवेदनशील वाचकांच्या नजरेसमोर तंतोतंत उभे राहते.

अशाच दुसऱ्या एका प्रसंगाचे अतिशय चित्रदर्शीपणे वातावरण या कथेत आपणास दिसते. मिटिंगची वर्दी देण्यासाठी गावातून, रस्त्यातून, गल्लीबोळातून भरभर जाणारा म्हादू शिपाई, झोपेचं सोंग पांघरलेला बापशा लोहार, त्याची बाजू घेणारी प्रेमळ बायको, स्वत:च्या कामात गर्क असणारा भालू सोनार, दागिने तयार करून घेणारी आवडाक्का, पान रंगवत झोपाळ्यावर झुलणारा शंकर कोळी, जोंधळ्याची थप्पी रचणारे आणि घरी येईल त्याच्याकडून फुकटात काम करून घेणारे दाजीबा देसाई, म्हैस व्यायची वाट पहात बसलेली तारामावशी या सर्वांच्या घरामधले वातावरण–त्या वातावरणातले सारे रंग–गंध–नाद घेऊन या कथेत अत्यंत मनोरमपणाने आलेले आहेत.

लक्षवेधी सहज सुंदर संवादशैली : मिटिंग या कथेत शंकर पाटील यांनी लिहिलेले संवाद हे या कथेचे एक महत्त्वाचे वैशिष्ठ्य आहे. माणसामाणसांमधील सहज सुंदर संवादांची अनेक रुपे या कथेत परिणामकारकपणे आलेली आहेत. या कथेत येणारे संवाद हे बोली भाषेत लिहिले गेले

आहेत. बोली या मुळातच प्रवाही असतात. व्यक्तींच्या अंतरंगातले गूज त्या बोली सहजतेने साकारत असतात. या कथेत येणारी मिटिंग ही घटना आणि या घटनेभोवती निर्माण केलेले प्रसंग आणि या प्रसंगांच्या अनुरोधाने येणारे निवेदन आणि दोन व्यक्तींमधील संवाद या आशयात आणि आविष्कारात मोलाची भर घालणारे आहेत. या कथेत आलेल्या सर्वच व्यक्तिरेखांच्या मानसिक आणि भावनिक आंदोलनांचे प्रतिबिंब या कथेतल्या संवादांच्या अनुषंगाने आले आहे.

या कथेच्या सुरूवातीसच म्हादू शिपायाला सरपंच म्हणतात,''लेका, आज मिटिंग हाय नव्हं रं?'' या एका ओळीच्या संवादातून सरपंच यांची म्हादू शिपायाकडे आपुलकीने पाहण्याची वृत्ती, जबाबदारीची हळूवार जाणीव करून देते. स्वत: जबाबदारीची जाणीव आधिकाराची जाणीव हे सारे काही दिसून येते. गावच्या माणसांमधील बोलण्यातील सहजता आणि दिलखुलास विनोदीवृत्ती यांचा प्रत्यय या कथेतल्या संवादांमधून सतत येत राहतो. परस्परांविषयीचे प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा हे सारेकाही या संवादांमधून जाणवत राहते. मिटिंग चुकवून झोपण्याचा बहाणा करणाऱ्या बापशा लोहाराला म्हादू म्हणतो,''हितं पडायचं ते तिथं येऊन पडा की'', सोनारानं ''लेका बारसं महत्त्वाचं की मिटिंग महत्त्वाची.'' शंकर कोळी यांची बायको एका प्रसंगात म्हादू शिपायाला म्हणते, ''कुठं बसत्यात? गेले असतील त्या धनगरणीकडं !'' मिटिंग या विषयाकडं कानाडोळा करत, ''मी कशाला निघतोयरं आता? अजून माझे जेवाणखान व्हायचे. मी जेवणार कवा आणि मिटिंगला जानार कवा?'' असा हुकमी सवाल उपस्थित करणारे दाजीबा देसाई. असे हास्याचे कारंजे निर्माण करणारे अनेक संवाद मोठ्या खुबीने शंकर पाटील यांनी या कथेत मोठ्या चातुर्याने योजलेले आहेत.

प्रवाही निवेदनशैली : शंकर पाटील यांची संवादाची भाषा जितकी परिणामकारक आहे तितकडा त्यांची निवेदनाची भाषाही अत्यंत परिणामकारक आहे. अर्थातच ग्रामीण ढंगातली निवेदनाची भाषा शंकर पाटील यांनी या कथेत वापरली आहे. सहज, सुंदर आणि अत्यंत प्रवाही निवेदन या कथेत आलेले आहे. या निवेदनाच्या माध्यमातून शंकर पाटील वाचकांना असेकाही गुंतवून ठेवतात, की आपणही या कथेचा एक घटक आहोत असे वाटत राहते. छोटी छोटी वाक्यरचना, नितळ पाण्यासारखे शब्द इत्यादींचा मनोहारी आविष्कार या निवेदनातून सतत पाझरत राहतो. 'मग उभा न राहता पाय उचलून म्हादा झटक्यानं गावात निघाला. खरं म्हणजे आता टाईम झाला होता. अशावेळी वर्दी द्यायला जाणं त्याला अवघड वाटत होतं. कारण कोणी जेवून झोपलं

असणार, तर कोणी 'घेऊन' बसलं असणार.' हे निवेदन किंवा आधीच वेळ झाला होता. त्यात ते काम निघाले उशीर झाला तर सरपंच जोड्यानं हाणणार! बरं हे काम न करावं तर कोळ्याची बायको मिशीला कांदं बांधणार! काय करावं असं करतच तो परटिणीकडं गेला. दोघेही सोप्यालाच होते. एक गुडघा वर करून ती भिंतीला टेकून बसली होती आणि शंकर कोळी तिच्यासमोर झोपाळ्यावर बसून पान खात बसला होता.'' हे निवेदन किंवा देसाईच्या वाड्यावरील प्रसंगाचे छोटेखानी निवेदनाच्या माध्यमातून कथेला विलक्षण अशी गती देण्यात शंकर पाटील हे कसे वाकबगार आहेत याचा प्रत्यय येतो. अर्थातच निवेदनाच्या पातळीवरही ही कथा श्रेष्ठ दर्जाची वाटते.

समारोप : मराठी कथेला खूप जुनी अशी सशक्त परंपरा आहे. या परंपरेत शोभून दिसेल अशा प्रकारची कथा शंकर पाटील यांनी लिहिलेली आहे. त्यांच्या अनेक प्रसिद्ध कथांपैकीच मिटिंग ही कथा आहे. गावपातळीवर व्यक्तिरेखा, घटना प्रसंग, निसर्ग अशा विविध घटकांना शंकर पाटील यांनी शब्दबद्ध केले आहे. मिटिंग या कथेतही असाच गावपातळीवरील सर्वपरिचित विषय शंकर पाटील यांनी कथा लेखनासाठी निवडलेला आहे. या कथेच्या माध्यमातून साध्या, भोळ्या पापभिरू पण बिलंदर माणसांचे जगणे वागणे या लेखकाने मनोज्ञपणाने टिपले आहे. या कथेतल्या व्यक्तिरेखा कामचुकार, इतरांना फसविणाऱ्या, स्वत:च्या स्वार्थ साधणाऱ्या वाटत नाहीत. मिटिंग ही अत्यंत महत्त्वाची घटना असली आणि या व्यक्तिरेखा या मिटिंगला बगल देणाऱ्या असल्या तरी त्या खलनायकी वृत्तीच्या वाटत नाहीत. तर ती गावावर प्रेम असणाऱ्या, प्रामाणिक व स्वत:च्या कामाला प्राधान्य देणाऱ्या आहेत असे वाटत राहते. शंकर पाटील यांनी या कथेत उभे केलेले वातावरण, निवेदनशैली आणि भाषाशैली अशा सर्वच घटकांनी ही कथा विलक्षण परिणामकारक झाली आहे.

सांज – सखा कलाल

सखा कलाल : (जन्म १० डिसेंबर १९३८ मृत्यू१४ डिसेंबर २०१९) सखा कलाल हे मराठी साहित्यातील अत्यंत मोजकीच पण कसदार साहित्यनिर्मिती करणारे प्रथितयश लेखक होते. त्यांनी प्रामुख्याने कथात्मक साहित्य लिहिले आहे. त्यांचे शालेय शिक्षण रायबाग येथे तर महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर आणि पुणे येथे झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपले

शिक्षण पूर्ण केले. जेष्ठ प्रकाशक श्री.पु.भागवत यांनी या लेखकाच्या उमेदीच्या दिवसात खूप मोठा आधार दिला. पुण्यातील शिक्षण संपवून ते कोल्हापूरला परतले. त्यांनी ग्रंथालयशास्त्रात पदविका संपादन केली. सखा कलाल यांनी देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉमर्स कॉलेजमध्ये ग्रंथपालाची नोकरी केली. या महाविद्यालयातूनच ते सेवानिवृत्त झाले.

साहित्यिक वर्तुळापासून काहीसे फटकून रहात असलेले सखा कलाल हे सतत लेखन, वाचन आणि चिंतनात रमत असत. त्यांची पहिली कथा हिरवी काच ही १९५९ मध्ये सत्यकथा या मासिकात प्रकाशित झाली. या कथेला महाराष्ट्र राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. परिस्थितीच्या चक्रात सापडलेली सर्वसामान्य माणसे, दारिद्र्य, उपासमार इत्यादी वातावरण त्यांनी मोठ्या संवेदनशीलतेने त्यांच्या कथांमधून रेखाटलेले आहे. नियतीच्या निष्ठूर आघातांनी कोसळून निमूटपणानं जगणारी आणि जगण्याच्या संघर्षात अबोलपणे संपून जाणारी माणसे त्यांच्या कथेत केंद्रवर्ती असलेली दिसून येतात. शिवाय निसर्गाची विविध रूपे त्यांनी मानवी भावभावनांच्या माध्यमातून प्रतिकात्मकरीत्या मांडलेली आहेत. त्यांची कथा लहान आकाराची असली तरी आशयाच्या अनुषंगाने विचार करता तिचे व्यापकपण सहज नजरेत भरते. सखा कलाल यांचे बहुतेक सर्व लेखन सत्यकथा या मासिकात प्रकाशित झाले आहे. त्यांच्या 'सांज' आणि 'ढग' या दोनही कथांचे संग्रह मौज प्रकाशन गृह या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहेत. कलाल यांनी ४० लघुकथांचे लेखन केले आहे. सखा कलाल यांनी 'पार्टी' या नावाचा एक ललितलेख संग्रहही प्रकाशित केला आहे.

मराठी कथेच्या प्रांतात सखा कलात यांनी मोजकेच पण महत्त्वाचे कथालेखन केले आहे. ग्रामजीवनातील निसर्ग, व्यक्तिरेखा, घटनाप्रसंगांच्या चित्रणाबरोबरच त्यांची कथा विशेषत्वाने परिस्थितीच्या चक्रात सापडलेली माणसे केंद्रस्थानी आणली आहेत. नियतीच्या निष्ठूर आघातानं कोसळलेल्या माणसांचे अंतरंग मोठ्या कौशल्याने कलाल यांनी शब्दबद्ध केले आहे. सखा कलाल यांची कथा वाचताना या कथेतल्या मध्यवर्ती व्यक्तिरेखांचे भावविश्व पाहता अस्वस्थ व्हायला होते. सांज ही कथाही या सर्व वैशिष्ठ्यांना अर्थातच अपवाद नाही.

कथेचा आशय : सखा कलाल यांनी सांज या कथेच्या माध्यमातून इंदू या विवाहितेच्या मनाची तगमग व्यक्त केली आहे. तीन मुलांची आई असलेली इंदू संसारात तशी सुखी आहे. मुले, सासू-सासरे आणि पती असे हे आनंदात जगणारे कुटुंब आहे. शेतीभाती, जनावरे, कोंबड्या,

मांजरे अशा गोष्टींनाही या कुटुंबात महत्त्वाचे स्थान आहे. पण एका संध्याकाळी कसल्याशा स्वप्नामुळे इंदू हडबडून जागी होते. कसल्यशा अनामिक भीतीने सैरभैर होते. ही कातरवेळ तिला स्वस्थ बसू देत नाही. तोंडावरून पाण्याचा हात फिरवून पदरानं तोंड पुसत ती अंगणात येते. तिथेही तिला चैन पडत नाही. आपल्या मनाला कोणती हुरहूर लागून राहिली आहे, हे तिला कळेनासे होते. संसारातली दैनंदिन कामे ती सराईतपणे करते आहे. गिरणीतून पीठ दळून घेऊन येणे, चहापाणी-स्वयंपाक करणे, मुलांना, सासू-सासऱ्यांना जेवायला वाढणे, गुराढोरांना हवं नको ते पाहणे, कोंबड्याना खुराड्यात नीट जागा करून देणे, इत्यादी कामे ती विनातक्रार करते पण भूतकाळातील आठवणी तिला स्वस्थ बसू देत नाहीत. तिचं मन व्याकूळ होऊन जातं.

इंदूचा लहान मुलगा जेव्हा धावत येतो तेव्हा ती त्याला आनंदाने उचलून घेत ती त्याचे लाड करते. पारू या मोठ्या मुलीचेही ती लाड करते, प्रसंगी कोंबड्यांना नीट कोंडले नाही म्हणून तिच्यावरही रागावते. बाहेरून घरात आलेल्या सासूला,''घरात कुणीच न्हाई. बाहेर जाताना सांगायला काय हुतय ?'' असे म्हणून चरफडते.

आपल्याला नेमकं हे असं का होतय, मनाला कशाची आस लागून राहिली आहे. याचा कोणताच उलगडा न झालेली इंदू घरातून बाहेर येऊन उंबऱ्यावर थबकते. सांजसावल्या गडद होत जातात आणि एका न कळणाऱ्या बेचैनीला जन्म देऊन जातात. न राहवून इंदू मातीत खेळणाऱ्या लहान मुलाला मारू लागते. ''कशाला मारतासा मुलाला'' असं शेजारची सुंद्रा इंदूस समजावण्याचा प्रयत्न करत निघून जाते. वर्षापूर्वीच या सुंद्राचा नवरा काळ्या रानात बसल्या जागीच हकनाक मरून गेलेला असतो. तिच्याकडे पहात इंदू बराच वेळ पाहत राहते. लाल रेशमासारखं दिसणारं आभाळ तिला वाळलेल्या रक्तासारखं काळपटलेले दिसते. ''आपल्या आसपासचं सगळं किती झटपट बदलतं. मघाशी होतं, आता न्हाई. आता हाय, घटकेनं न्हाई...'' असे उलटसुलट विचार तिच्या मनातून जाता जात नाहीत.

भुरभुरणाऱ्या वाऱ्याच्या पार्श्वभूमीवर गावातल्या पाटलांचा हंबीर पायातल्या चपलांचा आवाज करत येतो. आणि सखाराम म्हणजे इंदूच्या नवऱ्यासंदर्भात, ''सका आलाया?'' असा प्रश्न विचारतो. इंदूचा नवरा सका हा सकाळपासून कुठेतरी निघून गेलेला असतो, त्यातच, 'साळुंख्यांचा हणुमंता छातीत अचानक दुखून मघाशीच मरण पावला.' ही बातमी हंबीर इंदूच्या जिवाची घालमेल अधिकच वाढते ती कमालीची अस्वस्थ होते.

इंदूच्या सासऱ्याची दैनंदिन कामेही न चुकता सुरूच असतात. शेताकडून येऊन जळणाचा भारा टाकून तो मुलांशी गप्पागोष्टी करतो. म्हातारीची चेष्टा मस्करी करतो, मुलगा घराकडे अजूनही आला नाही म्हणून चिंता करत बसतो. इंदूशीही बोलण्याचा प्रयत्न करतो. मोहन हा इंदूचा थोरला मुलगा. तोही न सांगता सवरता घराबाहेर पडलेला असतो. तोही उशीराच घरी परततो. या साऱ्या काळजीत पडलेली इंदू आणि तिच्या मनाचा कुणी विचारच करत नाही. आपले सारे आयुष्यच संसाराच्या चाकोरीत अडकले आहे. हा विचार तिच्या मनात घर करून राहतो.पारूला त्रास देणाऱ्या मोहनलाही इंदू तणतणत बाहेर येऊन थोबाडीत मारते. आणि हातपाय गळल्यागत होऊन ती तशीच बसून राहते. तिच्या डोळ्यात अश्रू जमू लागतात.

रात्रीची जेवणं होऊन अंथरूण टाकले जाते. मुलं झोपी जाऊ लागतात. आपल्या मनाला इतका थकवा का आला आहे, आपलं मन उगाचच का भिरभिरतं आहे, न कळून तिच्या तोंडून लाट फुटावी तसा हुंदका फुटतो. घरातील सारेच दचकून इंदू भोवती गोळा होतात. म्हातारीने तव्यावर टाकलेली भाकरी तिथेच करपून जाते. तेवढ्यात पायातल्या चपला वाजवत सका येतो. हुंदके देणाऱ्या इंदूकडे पहात,''आयला! कुणी मेलं की काय!'' असं अत्यंत कोरड्या स्वरात बोलू लागतो. इंदू डोळे पुसत उठते, मान खाली झुकवून चुलीत काटक्या सारते. आपल्याला हे असं एकाएकी काय झालं–रडू का कोसळलं याचा विचार करत राहते.

सायंकाळच्या वेळी एका स्त्रीच्या मनाची होणारी घालमेल अशाप्रकारे सखा कलात यांनी मांडलेली आहे. सगळे काही व्यवस्थित चालले आहे असे वाटत असतानाच निराशेची, अस्वस्थपणाची, एकटे–एकाकी पडल्याची भावना माणसाला कशी घायाळ करते. अशाप्रसंगी त्या स्त्रीचे वर्तनही कसे बदलते, याचे परिणामकारक चित्रण सांज या कथेच्या माध्यमातून सखा कलाल यांनी केले आहे. अशा अस्वस्थ करणाऱ्या वातावरणात आपल्या नवऱ्याने तरी आपल्याला समजून घ्यावे, अशी माफक अपेक्षा एक स्त्री बाळगू शकत नाही. कोणत्याही प्रकारची तक्रार न करता संसाराचा गाडा मुक्या जनावरासारखा हाकणे हेच स्त्रीचे भागधेय आहे; असा आशय सखा कलात या कथेच्या माध्यमातून व्यक्त करत आहेत, असे जाणवत राहते.

वातावरणनिर्मिती : सखा कलाल यांचे वातावरणनिर्मितीचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. या कथेतल्या वातावरणनिर्मितीमुळे निसर्ग आणि माणूस यांच्यातील परस्परसंबंध अधोरेखित झाले आहेत. दिवस नकळत कसातरी कामाच्या रहाटगाडग्यात निघून जातो. पण संध्याकाळ सरता सरत

नाही. या कथेतल्या इंदूचेही नेमके तसेच झाले आहे. कुठलीतरी अज्ञात अशी गूढ अस्वस्थता तिचे मन घेरून टाकते. त्यातच तिला अशुभ असे स्वप्न पडते. ती दचकून उठून बसते. संध्याकाळ झालेली असते. नवरा अजूनही घरी परतलेला नाही. या कोलाहलातच गावातील घडून गेलेले मृत्यूचे प्रसंग तिला आठवू लागतात. भिती घालू लागतात. इंदूची ही भावावस्था सखा कलाल यांनी नेमक्या शब्दात व्यक्त केली आहे. मावळतीकडे वळलेला सूर्य, फिकं पडलेलं ऊन. लांबत चाललेल्या सावल्या. आकाशात भिरभिरणारं एक काळं पाखरू, दाटून आलेल्या सांजसावल्या, मावळतीला च्रिक च्रिक करत उडणारी पाखरं, रक्तासारखं काळपट दिसणारं आभाळ, भुंकत सुटलेली कुत्री या अशा सर्व वातावरणात इंदूची नेमकी भावावस्था कथन करताना सखा कलाल म्हणतात,''इंदू मटकन खाली बसली. बाहेरच्या अंगणात स्पष्टसं काहीच दिसत नव्हतं. ओळखीचंदेखील अनोळखी वाटत होतं... अंधाररेषा गडद झाल्या होत्या. दिवस बुडाला... दिवेलागण झाली... पाखरं घरट्यात गेली... वासरं आईला बिलगली... आणि तरी कुठंतरी आभाळ रितं राहिलंय. अंधाऱ्या खोल डोहात पारवा घुमावा तसं आतल्या आत काहीतरी फुटतंय. असं रिकाम रिकामं वाटतय. तरीसुद्धा मनात काहीतरी भरून आलय...''

सांज या कथेचा काळ अत्यंत थोडा थोडका आहे. संध्याकाळ ते रात्रीच्या जेवणापर्यंतचा अल्पसा काळ या कथेत आला आहे. स्थळही इंदूचे घर इतकेच आहे. तरीही या अल्पकाळात इंदूची मनोवस्थेचा विलक्षण परिणामकारकपणे सखा कलाल यांनी शब्दबद्ध केली आहे. सायंकाळ होताच इंदूच्या मनात अस्वस्थतेने घर केले आहे. सायंकाळ संपून काळोखी रात्र जशी वाढत जाते, गहिरी होत जाते, तशी इंदूच्या मनाची घालमेलही वाढत जाताना दिसते. जणूकाही सखा कलाल यांनी इंदूच्या मनात परकाया प्रवेश केला आहे, असे वाटत राहते. सायंकाळच्या निसर्गाचे वातावरण इंदूच्या मनाच्या सैरभैर अवस्थेशी समांतर जाताना दिसते. उदाहरणादाखल या कथेच्या शेवटी लेखकाने निवेदन केलेले वातावरण आपणास पाहता येईल. सखा कलाल लिहितात,''कुणाची तरी पावलं वाजली तसं इंदूनं बाहेर वाकून पाहिलं. पण पावलांचा आवाज दूर गेला. ती भुईला लवंडली. एवढा थकवा कशानं आलाय तेच तिला कळत नव्हतं. पडल्या पडल्याच तिचं मन भिरभिरत होतं. मनात काही काही येत होतं आणि एकाएकी लाट फुटावी तसं तिचं झालं. अवचित तिच्या तोंडून एकदम हुंदका फुटला.'' हे असे वातावरण निर्माण करताना इंदूचे नेमके दु:ख कोणते आहे; याचा यत्किंचितही सुगावा लेखक वाचकांना लागू देत नाहीत.

इंदूची भावावस्था तिच्या मनातली नेमकी सल न सांगताच ही कथा वाचकांच्या मनात घर करून बसते. इंदूविषयी सहानुभूमी निर्माण करते. यातच या कथेचे सामर्थ्य आहे, असे वाटत राहते. बाहेर कुणाची पावले वाजल्यावर इंदूने बाहेर डोकावून पाहणे, म्हणजेच ती नवऱ्याची मनापासून काळजी करते आहे, वाट पाहत आहे. पण वाजणारी पावलं दुसऱ्याच कुणाचीतरी असतात. ती थकून जाते याचा अर्थ आशा निराशेचा खेळ तिच्या भरलेल्या संसारात सुरू झाला आहे; हेच सखा कलाल यांना सूचित करावयाचे असावे. तात्पर्य, वातावरण निर्मितीच्या कौशल्याने सखा कलाल यांनी इंदूचे मुके दु:ख, मौनातल्या विरहाची जाणीव फार परिणामकारकपणे मांडलेली आहे.

कथेतल्या व्यक्तिरेखा : सांज या छोट्याशा कथेत तसे पाहिले तर अनेक व्यक्तिरेखा आहेत. तथापि इंदू ही या कथेतली मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. अर्थातच इतर व्यक्तिरेखांपेक्षा हीच व्यक्तिरेखा वाचकांच्या लक्षात राहते. ही व्यक्तिरेखा सखा कलाल यांनी अत्यंत समर्थपणे रेखाटली आहे. सासूरवाशीण इंदू ही ही एक संसारी स्त्री आहे. शांत, समाधानी असलेल्या इंदूला सायंकाळच्या वेळी एक कसलेसे स्वप्न पडते, आणि सांज जसजशी वाढू लागते, तसतसे तिचे अंत:करण काळवंडून जावू लागते. भरल्या संसारात तिचे लक्षच लागत नाही. 'असा कसा डोळा लागला म्हणावं... आणि दिवसा पडलेली स्वप्नं खरी होतात का? काय बाई एकेक...' तिचं मन चुकचुकतं. इंदूला नेमकं कोणतं स्वप्न पडलं हे सखा कलाल यांनी या कथेत सांगितलेले नाही. पण काहीतरी अशुभ असं स्वप्न तिला पडलं असावं. कदाचित तिच्या जवळच्या माणसाचं काही बरंवाईट घडल्याचं स्वप्न तिला पडलं असल्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण या स्वप्नानंतर ती सैरभैर झाली आहे. तिचे घरसंसारात लक्ष लागत नाही. त्यातच सायंकाळच्या मन कातर करणाऱ्या वातावरणाने भरच घातली आहे. इंदू ही चांगल्या संस्कारात वाढली असल्याचे दिसून येते. नवऱ्यावर तिचे मनापासून प्रेम आहे. तो घरातून सकाळीच काही कामासाठी निघून गेला आहे. उद्यापही तो परत आला नाही. ती त्याची मनापासून वाट पाहते आहे. त्यातच कसल्याशा स्वप्नाने ती काळजीत पडलेली आहे. तिच्या या भावावस्थेचे वर्णन करताना लेखक लिहितात,''आठवणीनं इंदूनं कपाळावर कुंकवाची टिकली रेखली. आरशातल्या स्वत:च्याच काळ्याभोर डोळ्यात तिनं निरखून पाहिलं. डोळे कधीतरी बोलतात का? कायतरीच त्याचं! लाजून तिनं आरसा बाजूला केला आणि मग तिचं तिलाच हसू फुटलं.''

एका कुटुंबवत्सल स्त्रीचं व्यक्तिमत्व या कथेच्या माध्यमातून सखा कलाल यांनी रेखाटलं आहे. घरातल्या दैनंदिन कामकाजात ती कधीही चालढकल करताना दिसत नाही. झाडलोट करणं, धान्य दळून आणण्यासाठी पिठाच्या गिरणीकडं जाणं, स्वयंपाक करणं, जनावरांना हवं नको ते पाहणं, मुलांची काळजी घेणं हे सर्व काही ती निमूटपणेण करते आहे.

संसारी स्त्रीची सर्व काम ती कोणत्याही प्रकारचे आढेवेढे न घेता करीत असली तरी एका स्वप्नामुळे मात्र तिचे चित्त थाऱ्यावर नाही; हे सर्व कथाभर आपणास जाणवत राहते. मुलांबरोबरचे तिचे वागणे-बोलणे बदलले आहे. किरकोळ कारणांवरून ती मुलांना मारहाण करणे, टाकून बोलणे असे करू लागली आहे. सासूवरही ती आपला राग व्यक्त करते,''बाहेर जाताना सांगून जाता येत नाही का?'' असे उद्गार ती चिडून व्यक्त करते.

या तिच्या अवस्थेत आणखी एक भर पडते ती म्हणजे सुंद्राच्या नवऱ्याचा आणि साळुंख्यांचा हणमंता या दोघांचे मृत्यू , त्यांचे अचानक हे जग सोडून निघून जाणे. यामुळे ती अधिकच धास्तावून जाते. आपल्या या हसत्या-खेळत्या घरात आपल्याला ही उदासीनता का घेरून राहिली आहे; हेच तिला कळत नाही. मग या अस्वस्थतेचा कडेलोट होतो आणि अचानक तिच्या तोंडून हुंदका फुटतो.

इंदूही स्वत:च्या दु:खाला असहाय्यतेला आवर घालून आपले मन संसारात पुन्हा गुंतवण्याचा प्रयत्न करणारी महत्त्वाची व्यक्तिरेखा वाटते. दिवसभर बाहेर असलेला नवरा जेव्हा घरी येतो तेव्हा ती स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करते. नवऱ्याकडून आपुलकीचे चार शब्द ऐकण्याचेही तिची सत्ता नसते; हे जाणवते. कारण अत्यंत तुसडेपणाने इंदूला सका म्हणतो,''आयला! कुणी मेलं की काय!'' इच्छा नसतानाही बळेच हसत ती पुन्हा आपल्या कामाला लागते. अशाप्रकारे ग्रामजीवनातील एका स्त्रीच्या अस्वस्थतेला सखा कलाल यांनी अतिशय नेमकेपणाने व्यक्त केले आहे.

सूचकता : सूचकता हे या कथेचे आणखी एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. सखा कलाल हे मराठी कथाविश्वातील एक अल्पाक्षरी लेखक आहेत. अत्यंत मोजक्याच शब्दात वाचकांना ते खूप काही सुचवून जातात. कथेतल्या सर्वच गोष्टींची उकल सरधोपटपणानं न करता कथेतल्या अनेक गोष्टी ते वाचकांवर सोपवतात. वाचकांना विचारप्रवृत्त करण्याचा प्रयत्न करतात. सांज या कथेतही हे सतत जाणवत राहते. मग ते व्यक्तिरेखांच्या बाबतीत असो की ते निसर्गातल्या

विविध घटकांच्या बाबतीत असो. इंदूला नेमके कोणते स्वप्न पडले, इंदूचे आणि सायंकाळचे नेमके कोणते नाते आहे. कोणत्या आठवणीने तिला बेजार केले आहे. 'डोळे कधीतरी बोलतात का? कायतरीच त्याचं!' हे कुणाचे उद्गार आहेत. कथेत येणाऱ्या मृत्यूच्या प्रसंगांचे आणि इंदूच्या भावावस्थेचे नाते काय आहे, ती मुलांवर, सासू-सासऱ्यावर का चिडते आहे, संध्याकाळचे, रात्रीचे, काळोखाचे, वाळलेल्या काळपट रक्ताचे उल्लेख का येतात? लेखकाने या कथेतल्या सर्व वाक्यरचना, शब्दप्रयोग हेतूपूर्वक केले आहेत. कारण जगण्याच्या रहाट गाडग्यात आपल्या मनाला नेमकं काय हवं आहे, आपल्या मनाची शांतता नेमकी कुठे आहे; हेच कळत नाही. ते कळालं तरी माणसाला परत मागं फिरता येत नाही. कसेही दिवस असले तरी दु:ख पचवून आला दिवस माणसाला साजरा करावा लागतो; असाच काहीसा आशय सखा कलाल या कथेच्या माध्यमातून मांडत आहेत, असे वाटत राहते.

प्रतिकात्मक शब्दकळा : सखा कलाल यांनी या कथेत वापरलेली शब्दकळा वाचकांचे मन मोहून टाकणारी आहे. शिवाय प्रासादिक निवेदन आणि अल्पाक्षरी नेमक्या संवादलेखनामुळे ही कथा अधिकच वाचनीय झाली आहे. ग्रामजीवनातील माणसे, परस्परांमधील प्रेम, जिव्हाळा, नातेसंबंध, पशू, पक्षी, जनावरांशी असणारे घट्ट नातेबंध हे सारे विलक्षण प्रत्ययकारीपणाने कलाल यांनी या कथेत रेखाटले आहे. इंदू झोपेतून नुसती जागी होत नाही तर ती हडबडून जागी होते. इंदू उंबऱ्यावर केवळ उभी राहात नाहीतर ती थबकते, शिवाय मावळतीला लाल रेशमी पदर, काळ्या रानात जागीच मेलेला सुंद्राचा नवरा, लांब शिंगाच्या म्हशी, पायताण वाजवत येणारा हंबीर, ठिश्य करून अंग फुलवत बाहेर पळालेलं मांजर, मावळतीला च्रिक च्रिक करीत उडत गेलेली पाखरं, घळंग घळंग करून म्हाताऱ्यानं संपविलेलं पाणी, गडद झालेल्या अंधाररेषा, अधाऱ्या डोहात पारवा घुमावा तसं आतल्या आत फुटणारं काही, लाट फुटावी तसा फुटलेला हुंदका, बुचकळ्यात पडलेला म्हातारा आणि खुळ्यागत झालेली म्हातारी असे कथानकाशी त्या कथेच्या आशयाशी एकजीव होऊन गेलेल्या असंख्य शब्दांचा वापर सखा कलाल यांनी या कथेत केला आहे. त्यामुळे या कथेला एक आगळेवेगळे वाचनमूल्य प्राप्त झाले आहे.

ग्रामजीवनातल्या बोली भाषेचा चपखल वापर सखा कलाल यांनी या कथेतल्या संवादांच्या माध्यमातून केला आहे. साधी, सोपी, प्रवाही आणि व्यक्तिमत्त्वांच्या वर्तनाचा, मनोविश्वाचा नेमका वेध या भाषेच्या माध्यमातून लेखकाने घेतला आहे. अल्पाक्षरी निवेदनशैलीचा वापर केल्यामुळे

कथेला सहज सुंदर प्रवाहीपणा लाभला आहे. 'म्हातारी एकदम दचकली. घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली, ''काय झालं ग?'' अंथरूणावरून उठून पोरांनी तिच्या भोवती कोंडाळं केलं, जे ते तिच्या तोंडाकडं बघाय लागलं आणि मग तिला एकदम रडूच फुटलं. ती काही बोलंना तसं म्हातारा बुचकळ्यात पडला. म्हातारी चक्रावली. घाबरून गेली. तव्यावरची भाकर तिथंच करपली. हा या कथेत आलेला एक प्रसंग पण नेमक्या शब्दकळेचा, वाक्यरचनेचा वापर केल्यामुळे या प्रसंगाला चित्रदर्शीपणा प्राप्त झाला आहे. वाचकांच्या डोळ्यासमोर हा प्रसंग जसाच्या तसा दिसू लागतो आणि विशिष्ट अशा वातावरणात हवा तो एकच एक संस्कार वाचकांच्या मनावर उमटतो. असे अनेक प्रसंग या कथेत पानोपानी पहावयास मिळतात.

प्रभावी संवादलेखन : सांज या कथेत निवेदन जसे अधिक्याने येते तसे संवाद विपूलतेने येत नाहीत. सखा कलाल यांनी या कथेत अत्यंत मोजक्याच पण परिणामकारक संवादांची रचना केली आहे. कथेतले इंदू हे पात्र क्वचितच एखादा संवाद उच्चारते पण या तिच्या कमी बोलण्यामुळेही तिच्या मनातले अस्वस्थ वादळ, तिची मनोवस्था-भावावस्था अधिकच गहिरी होते. कथाकाराने निवेदनच इतक्या सशक्तपणाने केले आहे; की पात्रांना अधिकच बोलावे लागत नाही,''घरात कुणीच न्हाई. बाहेर जाताना सांगायला काय हुतय?'',''रांडं ह्यावर ओझं कुणी ठेवायचं ग?'',''मढं बसविलं तुझं'', ''शेंगा पायजेत रं?'',''सकाळी गेलेत ते घराकडं आलेत कुठं'' असे इंदूच्या तोंडचे संवाद किंवा म्हाताऱ्याच्या तोंडचे, ''येऊ द्यात. बघतो एकेकास्नी. म्हातारीचं परमिट नसताना हिंडत्यात म्हणजे काय?'', ''म्हातारी कुणाची रं?'', ''हुंदक्यावर हुंदकं काय झालं कुणास दखल!'' या कथेत सखा या व्यक्तिरेखेस, ''आयला! कुणी मेलं की काय!'' हा केवळ एकच संवाद आहे पण या एका संवादावरून सखा हे अवघं व्यक्तिमत्त्व वाचकांच्या मनासमोर उलगडत जातं.

समारोप : सखा कलाल यांची सांज ही सर्वांगसुंदर कथा वाचत असताना बालकवींची 'उदासीनता' ही कविता आणि आणि अरविंद गोखले यांची 'कातरवेळ' ही कथा आठवत राहते. या दोन साहित्यकृतींमध्येही सांज या कथेतल्यासारखीच भावावस्था बालकवी आणि अरविंद गोखले यांनी नेमकेपणाने पकडली आहे. ग्राम जीवनातील इंदू ही एक संसारी स्त्री. सायंकाळच्या वेळी तिला एक अशुभ अशा स्वरूपाचे स्वप्न पडते. या स्वप्नामुळे ती अस्वस्थ होते. घरादारात तिचे लक्ष लागत नाही. अत्यंत अस्वस्थ असलेल्या या इंदूचे चालणे बोलणे सर्वच बदलून जाते.

मुलाबाळांवर ती चिडते, ओरडते. सासू सासऱ्याकडेही ती दुर्लक्ष करते. आपल्याला हे असे का होते आहे, हे तिला कळत नाही. या अशा अवस्थेत ती तिच्या नवऱ्याची आतुरतेने वाट पाहते. आपण निराधार आहोत, आपल्या जिवाभावाचे कोणीच नाही, असे विचार तिच्या मनात सतत येत असतात. अशा इंदू या व्यक्तिरेखेची भावनिक, मानसिक आंदोलने या कथेतून सखा कलाल यांनी अतिशय तरल पातळीवर रेखाटली आहेत. कथेच्या अंगभूत वैशिष्ट्यांमुळे कथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती निवेदन, संवाद, भाषाशैली या सर्वांमुळे सांज ही सखा कलाल यांची कथा मराठीतल्या चांगल्या कथांच्या पंक्तीत जाऊन बसली आहे.

जंगलाचं देणं – मारुती चितमपल्ली

मारुती चितमपल्ली (१२ नोव्हेंबर १९३२) : मारुती चितमपल्ली हे प्रतिभावंत लेखक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षीशास्त्रज्ञ, वन्यजीव अभ्यासक म्हणून प्रसिद्ध आहेत. सोलापूर येथे एका सर्वसामान्य कुटुंबात जन्माला आलेले मारुती चिमपल्ली यांना लहानपणापासून निसर्गाची, निसर्गातल्या विविध घटकांची प्रचंड ओढ होती. आपल्या मुलांनी विणकामाचा, गिरणीचा परंपरागत व्यवसाय करू नये अशी चितमपल्ली यांच्या वडिलांची इच्छा होती. तर चितमपल्ली यांची आई सुगंधाबाई म्हणजेच अम्मा या स्वभावाने शांत आणि सहनशील स्वभावाच्या होत्या. त्या मारुती चितमपल्ली यांना वृक्ष निर्झरांच्या, जंगलातील पक्षी प्राण्यांच्या कथा सतत सांगत असत. अम्मा, माळकरी आत्या आणि लिंबामामा हे चितमपल्ली यांचे अरण्यविद्येतले गुरू होते.

मारुती चितमपल्ली हे बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे लेखक आहेत. सोलापूर येथून शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी पुढील व्यावसायिक शिक्षण स्टेट फॉरेस्ट कॉलेज, कोईमतूर आणि बंगळूरू, दिल्ली कान्हा राष्ट्रीय उद्यान (मध्य प्रदेश), डेहराडून येथील वने आणि वन्यजीवविषयक संस्थांमधून घेतले. नांदेड येथील संस्कृत पाठशाळेत तसेच पुणे, पनवेल येथील संस्कृत पंडितांकडे संस्कृत भाषेचे व साहित्याचे त्यांनी अध्ययन केले. जर्मन आणि रशियन भाषांचाही त्यांनी अभ्यास केला. महाराष्ट्र शासनाच्या वनविभागात ढेबेवाडी ते मेळघाट अशी तीस वर्षे त्यांनी सेवा केली. कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या विकासात त्यांचे विशेष योगदान आहे. मारुती चितमपल्ली यांना डॉ.सलीम अली, नरहर कुरूंदकर, व्यंकटेश माडगूळकर आणि गो.नि.दांडेकर अशा मान्यवरांचा

सहवास लाभला आणि या मान्यवरांकडून त्यांना ललित लेखनाची प्रेरणा मिळाली. ललित गद्य, कथा, व्यक्तिचित्रे, आत्मचरित्र, कोशवाङ्मय, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारात त्यांनी लेखन केले आहे. पक्षी जाय दिगंतरा (१९८३), जंगलाचं देणं (१९८५), रानवाटा (१९९१), रातवा (१९९३), सुवर्णगरूड (२०००), चकवाचांदण : एक वनोपनिषद (२००५), नवे बांधगावचे दिवस (२०१०) इत्यादी साहित्यसंपदा त्यांनी निर्माण केली आहे.

मारुती चितमपल्ली यांनी लिहिलेल्या साहित्याला निसर्ग जाणिवांचा अभिजात स्पर्श आहे. त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या साहित्याने मराठी साहित्यात आगळेवेगळे स्थान मिळविले आहे. अरण्यातील जीवनानुभव आणि संशोधन वाचकांपर्यंत पोचावे म्हणून त्यांनी कसदार असे ललित लेखन केले आहे. निसर्गाकडे आणि निसर्गातील विविध घटकांकडे पाहण्याच्या व्यापक आणि स्वतंत्र दृष्टीचा प्रत्यय त्यांच्या लिखाणातून आपणास येतो. अरण्यविद्येतून मिळालेली शास्त्रीय माहिती ते अत्यंत रोचक स्वरूपात आपल्या साहित्यातून ते सतत देत असतात. त्यांच्या ललित लेखनाने मराठी साहित्याच्या अनुभवाच्या कक्षा रूंदावल्या आहेत. पक्षांविषयी विशेष ममत्त्व असलेल्या मारुती चितमपल्ली यांच्या लेखनात प्राणिसृष्टीसह आदिवासी संस्कृतीचे दर्शनही घडते. निसर्ग आणि माणूस यांच्यातील नात्याचा शोध मारुती चितमपल्ली यांनी मनोज्ञतेने घेतलेला आहे. त्यांना वनविद्येचे तत्त्वज्ञ, ललित गद्यकार म्हणून गौरविले गेले असून, महाराष्ट्र शासनाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार (२०१६), दमाणी साहित्य पुरस्कार (१९९१), अखिल भारतीय मराठी विज्ञान परिषदेचा सन्मान (१९९६), महाराष्ट्र फाउंडेशनचा गौरव पुरस्कार(२००३) मिळाले आहेत. सोलापूर येथे आयोजित केलेल्या ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमानही त्यांना प्राप्त झाला आहे.

मारूती चितमपल्ली यांचं अवघं आयुष्यच जंगलमय होऊन गेलं आहे. झाडं, वेली, पशू, पक्षी, प्राणी, हिस्त्र श्वापदं, फुलपाखरं, कीटक, आकाश, ढग पाऊस, समुद्र आणि समुद्री जीव यांचं विलक्षण आकर्षण या लेखकाला आहे. वनाधिकारी म्हणून सेवा बजावत असताना त्यांना लोकविलक्षण अनुभव येत गेले. या अनुभवांनीच त्यांचं खरं शिक्षण झालं. जंगलातील अनुभव हेच त्यांचे गुरू आहेत. जंगलवाटा तुडवताना त्यांना आलेले अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले आहेत. या अनुभवांकडं केवळ कुतूहल म्हणून न पाहता त्यांनी त्याचं शास्त्रीय विश्लेषण केलं आहे. आणि हे जंगलधन अनुभवकथनाच्याद्वारे रसिक वाचकांपर्यंत पोहचविलं आहे. 'जंगलाचं देणं' हा त्यांचा

छोटासा लेख वाचकांच्याही जाणीवांच्या कक्षा रूंदावणारा–निसर्गाकडं नव्यानं पहायला शिकविणारा आहे.

जंगलांच्या निर्मिती कहाणी : 'जंगलाचं देणं' या अनुभवकथनाच्या सुरुवातीस 'जंगलं कशी निर्माण झाली असावीत?' असं प्रश्नचिन्ह उपस्थित करून मारूती चितमपल्ली वाचकांचं जंगलाविषयीचं कुतूहल जागृत करतात. जंगलाच्या निर्मितीची प्रक्रिया समजावून सांगतात. पूर्वीही खूप मोठी जंगलं होती. मोठमोठे वृक्ष होते. वादळ वाऱ्यांमुळे झाडाच्या बिया इथं तिथं विखरून गेल्या. वाहत्या पाण्यानं त्या बिया दूरवर वाहून गेल्या. विविध प्रकारच्या पक्षांच्या विष्ठेतूनही त्या बिया दूरवर टाकण्यात आल्या. त्या रूजल्या, वाढल्या, फोफावल्या. त्यांची मोठी झाडं झाली, जंगलं निर्माण झाली. अशा झाडा–जंगलांकडे वात्सल्यानं पाहत मारूती चितमपल्ली जंगलाची गोष्ट सांगू लागतात. 'झाडं डोगरावर वाढू लागली की वारा त्यांना एखाद्या शिल्पकाराप्रमाणे आकार देतो. झाडं निसर्गाचा सारा इतिवृत्तांत पोटात घेऊन वाढत असतात.' अशाप्रकारे जंगलांच्या निर्मितीची कारणं अत्यंत लालित्यपूर्ण भाषेत वाचकांना सांगतात.

जंगलांचं सौंदर्य : जंगलांच्या निर्मितीची, वाढीची आणि विनाशाची कहाणी अत्यंत सुबोध शब्दात सांगत मारूती चितमपल्ली आपणास चिरपल्लवी वृक्षांच्या जंगलाचं सौदर्य समजावून सांगतात. या जंगलातील निर्मळ, स्फटिकासारखं पाणी, शुद्ध हवा यांची महती सांगतात, तसेच या जंगलात चुकण्याची–रानभुलीची कथाही सांगण्यास ते विसरत नाहीत. चितमपल्ली कुर्गच्या माकुतच्या खोऱ्यातील एका छावणीत बसून जंगलाच्या कहाण्या सांगत राहतात. एकदा ते या जंगलात वाट चुकले होते. फक्त पाणी पिऊन त्यांनी कसाबसा दिवस काढला. खायला काहीही मिळालं नाही. नदीच्या वाहत्या प्रवाहाबरोबर ते चालत राहिले. बरच अंतर चालून गेल्यावर त्यांना हिरव्या निळ्या पाण्याचं तळं दिसलं. नदीच्या काठावर पडलेलं वृक्षांचं प्रतिबिंब, तऱ्हेतऱ्हेचे वृक्ष, कारी, फणस, आंबा, पिसा, नागकेशर, नेचे, हाडशंकर अशी अनंत झाडे त्यांना दिसू लागली. हे सारं वर्णन करताना नवी झाडे त्यांचे प्रकार चितमपल्ली वाचकांना सतत सांगत राहतात. त्या झाडांवर इतकं शेवाळ साठल्याचं ते सांगतात, की 'त्या झाडांना जणूकाही दाढ्या आल्या आहेत.' या समृद्ध करणाऱ्या अनुभवासोबतच बांबूचे बेट, माड आणि त्या गर्द जाळीत कावळ्या एवढ्या आकाराचा किलकिल करीत उडणारा खंड्या, सापासारखं डोकं असलेली मोठी धनचिडी असे सौंदर्याचे क्षण ते शब्दबद्ध करत जातात. नदीकाठानं पायपीठ करीत जाताना झाडांची अजस्त्र

बुध्यांची गर्दी, नदीकाठी जाणाऱ्या वन्यप्राण्यांच्या फसव्या पाऊलवाटा, 'चल, तुला आम्ही वाट दाखवितो' असं सांगत मोहात टाकून बळी घेणाऱ्या पाऊलवाटा यांच्याही अद्भुत गोष्टी लेखक आपणास सांगतात.

लोकविलक्ष अनुभवांचं कथन : नव्याची आस असणाऱ्या आणि त्याकरिता चाकोरीबद्ध आयुष्याला दूर सारणाऱ्या व्यक्तीला विलक्षण अनुभव येत असतात. त्याकरिता वेळ, काळ, पैसा यांची किंमतही मोजावी लागते. मारूती चितमपल्ली यांनीही पैसा, प्रसिद्धी, सत्ता, संपत्ती यांच्यामागे आंधळेपणाने न लागता लोकविलक्षण अनुभव घेण्यासाठी जंगलाची वाट धरली. त्यांनी मनसोक्तपणानं जंगलवाटा तुडविल्या. जंगलातल्या सागाच्या झाडांचे वर्णन त्यांनी अविस्मरणीय असं केलं आहे. या झाडांविषयी सांगताना ते म्हणतात,''उन्हाळ्यात एखाद्या शिल्पासारखी वाटणारी ही झाडं पावसाळ्यात हिरव्यागार, विशाल, खरबरीत पानांनी भरून जातात. पानं शिल्पासारखा आकार घेतात. लहान पांढुरक्या फुलांच्या गुच्छांनी बहरून जातात. या झाडाचं बी वर्षानुवर्षे न अंकुरताच धरतीच्या कुशीत पडून राहतं. या झाडाच्या सावलीत धरतीदेखील निर्जीव होते. या झाडाखाली गवताचं पातं देखील उगवत नाही. साजा, बिजा, धावडा व केळ हे त्याचे सोबती त्याच्याशीच स्पर्धा करतात. हे झाड जेवढं कठीण तेवढच सुंदर.'' लेखकाने त्यांच्या आयुष्यात निसर्गातील अनेक सुंदर दृश्य पाहिली आहेत. ती कथन करता करताच ते सहज म्हणून जातात, ''जिथं माणसाचे हात ते कुरूप करायला पोचले नाहीत, असं कुंवार-अस्पर्श पानगळीच्या जंगलाइतकं उदात्त सुंदर असं क्वचितच काही असेल! अशा ठिकाणी आपण जातो ते मुळी गोंधळलेल्या अवस्थेत. घाई गडबडीत-वनभोजनासाठी. गमती-जमतीकरिता आपल्या बरोबरचा मार्गदर्शक पोपटपंची करीत असतो. थकून भागून रात्री आपण परत येतो.'' मारूती चितमपल्ली यांच्या या चिंतनातून आपणास हा धडा मिळतो की, निसर्गाकडं जाताना आपण स्वच्छ, मोकळ्या मनानं गेलं पाहिजे. जंगलाचं देणं निष्पान रूप पाहण्यासाठी पुरेसा वेळ दिला पाहिजे, चित्त एकाग्र करून मनमुक्तपणे भटकलं पाहिजे.

निसर्गाकडं पाहण्याची नम्र दृष्टी : मारूती चितमपल्ली यांची रानावनात भटकंती करण्याची रीत सर्वसामान्यांच्या भटकंतीपेक्षा आगळीवेगळी आहे. निसर्गात जंगलावनात ते केवळ उत्सुकता म्हणून फिरत नाहीत; तर त्यांचे भटकणे-हिंडणे, फिरणे सहेतूक असते. जंगलवाटेने जात असताना निसर्गाची भव्यता आणि दिव्यता त्यांना नम्र बनवते. निसर्ग त्यांचा सखा सोबती बनतो. बहुतेकदा

ते जंगलात कुणाचीही सोबत न घेता वावरत असतात. नानाप्रकारच्या वृक्षांकडे पहात, विविधप्रकारचे आवाज ऐकत जात असतात. लहान, मोठे, वक्राकार, सरळसोट असे वृक्ष त्यांचे आकार, सावल्या त्यांना भुरळ घालतात. निसर्गाकडं विशेषत: झाडांकडे कसे पहावे याचे दिग्दर्शनच ते वाचकांना करत आहेत, असे जाणवत राहते. जंगलातल्या झाडांविषयी ते म्हणतात,''कुठे दोन झाडं एकमेकांना आलिंगन देत वाढत असतात, तर एखादं झाड दुसऱ्या झाडासमोर नम्र व्हावं, तसं ओणावलेलं असतं. जंगलातील वाटेनं ह्या वृक्ष समुदायाकडं पाहताना वाटतं की, ह्या वक्षांचं एकमेकांशी नातं आहे. ह्या कुटंबातील नातं शोधणं, पाहणं माझा आवडता छंद आहे. मला फक्त त्यांच्यातील नातं उमगू लागतं. कुठं प्रेमाचं, कुठं दुराव्याचं, कुठे नम्रतेचं, कुठं ताठरपणाचं, कुठं समाधानाचं, कुठे साफल्याचं...'' या त्यांच्या निवेदनावरून मारूती चितमपल्ली हे जंगलातल्या झाडांशी किती एकरूप झालेले आहेत हे जाणवत राहतं. शिवाय झाडांना पाहून त्यांच्या मनात कसे भावतरंग उमटत जातात हेही समजते.

निसर्ग आणि माणूस नांतेसंबध : माणूस हा निसर्गाचा एक अविभाज्य घटक आहे. आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात माणसाचे निसर्गाशी असणारे नाते तुटत जाताना दिसते आहे. स्पर्धेच्या, धावपळीच्या आणि घाईगर्दीच्या जगणे माणसाला अपरिहार्य बनत चालले असल्यामुळे निसर्गापासून माणूस दूर जातो आहे. पण ही माणसाच्या अस्तित्त्वाकरिता धोक्याची घंटा आहे, याची प्रखर जाणीव 'जंगलाचं देणं' या पाठाच्या आधारे आपणास सदैव होत राहते. या लेखात मारूती चितमपल्ली यांनी झाड आणि माणूस यांची तुलनाही केली आहे. ते सांगतात, ''जंगलातल्या वृक्षांकडे बारकाईनं पाहिलं तर वृक्ष जसजसा मोठमोठा होत जातो; तसतसे त्याचे सौंदर्य वाढत जाते-खुलत जाते. महाकाय वृक्षांचे बुंध्ये, फांद्या, पानं अधिकाधिक देखणी दिसायला लागतात. झाडं पाखरांना आश्रय देतात. प्राण्यांना मायाळू सावली देतात पण माणूसच असा प्राणी आहे की तो वाढत्या वयाबरोबर कुरूप दिसू लागतो.'' मारूती चितमपल्ली झाडांचं व माणसांच्या व्यक्तिमत्त्वाचे सत्य कथन करतात. वाढत्या वयाबरोबर अधिकांश माणसं लोभी, सत्तांध, स्वार्थी, मतलबी होत जातात आणि ती झाडांसारखी शांत समंजस दिसत नाहीत. तर ती लेखक सांगतात तशी करूप दिसू लागतात. निसर्गाकडं कसं विशाल अंत:करणानं पहावं याची जाणीव या लेखाच्या आधारे आपणा अशाप्रकारे होत राहते.

भुरळ घालणारा पाऊस : मारूती चितमपल्ली जंगलांचं, जंगलातल्या झाडांचं सौंदर्य जसं वाचकांच्या दृष्टीस आणून देतात तसंच जंगलातल्या पावसाच्या सौंदर्याचही वर्णनही ते समरसून करतात. पाऊस-हिवाळ्यातला पाऊस या लेखकाला मनस्वी भुरळ घालतो. या लेखात अशा भुरळ घालणाऱ्या पावसाचं अतिशय सुंदर चित्रण चितमपल्ली यांनी केलं आहे. आभाळ भरलेलं असतं, कधी पाऊस पडेल हे सांगता येत नाही. अशा वातावरणात लेखक जंगलात भटकत असतात. ते चालत असता पावसाची साद त्यांच्या मागून येऊ लागते. पाऊस येतो आहे असे वाटून एखाद्या झाडाचा आसरा लेखक शोधू पाहतात; तोच त्यांना तो त्या पावसाचा आवाज नसून सागाच्या जंगलातून वाहणाऱ्या वाऱ्याचा आवाज आहे हे समजतं. अशा वाऱ्याच्या आवाज लेखकाच्या मनाला, शरीराला आणि भावभावनांना ताजातवाना करतो. नादाची आणि गंधाची संवेदना घेऊन येणारा पहिला पाऊस आणि त्या पावसाची नादलुब्ध साद मारूती चितमपल्ली यांना वेड लावते. 'असे अद्भुत आवाज एका दिशेतून येत नाहीत, तर ते दशदिशांतून स्त्रवू लागतात.' असे अर्थपूर्ण विधान चितमपल्ली करतात.

उटीच्या जंगलातील आठवणी : मारूती चितमपल्ली यांनी या लेखाच्या माध्यमातून त्यांच्या भूतकाळातील आठवणींना उजाळा दिला आहे. या आठवणींमध्ये उटीच्या जंगलातील आठवणींना विशेष स्थान आहे. या जंगलातल्या गवताळ टेकड्यांचा समूह, रानफुलांवर पडणाऱ्या दवबिंदुंमुळे सुटलेला सुगंध, लहान लहान दऱ्याखोऱ्यांमधून दिसणारं हिरवंगार जंगल, निळ्या, हिरव्या, पोपटी अशा हिरव्या रंगांच्या विविध छटा अशा जंगलाला शोला म्हणजेच सावलीचं जंगल असं तमिळी भाषेत नाव आहे, अशी माहितीही चितमपल्ली आपणास देतात.

शोला या जंगलाकडं पहात भटकंती करणं हा मारूती चितमपल्ली यांचा छंदच होऊन गेलेला आहे. या शोलाच्या-सावलीच्या जंगलाच्या कित्येक गोष्टी लेखक आपणास या लेखात सांगत राहतात. ''आभाळात एखाद्या ढगाचा खंड असावयाचा. वाऱ्याबरोबर जाताना त्याची सावली ग्रासडाऊनवरून तरंगत जाई. एखादा शोलाच इकडून तिकडे जातो की काय वाटे. म्हणून तर त्यांना सावलीची जंगलं म्हणत नसावेत ना?'' अशाप्रकारे ढग आणि सावली यांचा अनुबंध लेखक कथन करतात. शिवाय राजकपूर या अभिनेत्याच्या 'जिस देश मे गंगा बहती है' या चित्रपटाचं शुटिंग आणि त्या चित्रपटात लता मंगेशकर यांनी गायलेलं 'ओ बसंती पवन पागल' या गाण्याची आठवणही ते वाचकांना रसाळ भाषेत सांगतात.

मारूती चितमपल्ली यांचं लेखन एखाद्या बुजुर्ग माणसाने गप्पागोष्टी केल्यासारखं आहे. सावलीच्या जंगलाचं वर्णन करतानाही ते आपल्याबरोबर जणूकाही प्रत्यक्ष बोलत आहेत असं वाटतं. या जंगलाविषयी सांगताना ते म्हणतात,''अनेकांनी उटी पाहिली असेल, तिथल्या सुंदर सरोवरात नौकाविहार केला असेल, मनोहारी उद्यानं, शांत स्वच्छ घाट रस्ते, लाल कौलांची घरं, चर्चबेलचा आवाज, घोड्यावरची सैर, उंच शिखरांवरचं आकाश दर्शन हे सारं पाहिलं असणार किंवा वाटाड्यानं ते तुम्हाला दाखविलं असणार पण शोलाची जंगलं दाखविली नसणार'' म्हणूनच या जंगलाचं सौंदर्य आवर्जून पहावं, त्याची प्रचिती घ्यावी असे मारूती चितमपल्ली यांना वाटते.

शोलाच्या जंगलांचे अनोखे अनुभवविश्व या लेखात मारूती चितमपल्ली यांनी अतिशय सुंदरतेने रेखाटले आहेत. शिवाय पी.एस.फायसन ह्या ब्रिटिश वनस्पतीशास्त्रज्ञानं 'फ्लोरा ऑफ निलगिरी अँड पलनीज हिल टॉप्स' या ग्रंथात शोलातल्या वृक्षांच्या पानाफुलांचे सौंदर्य टिपलं आहे. असा संदर्भ द्यायलाही लेखक विसरत नाहीत. त्यांना रोडोडेन्ड्राची रानफुलं आठवतात. फादर संत पाऊ या वनस्पती शास्त्रज्ञ यांच्या बरोबर शोला जंगलातल्या वनस्पतींचा अभ्यास करीत, त्याचे नमुने गोळा करीत भटकल्याचे दिवस त्यांना आठवत राहतात.

सागरी सौंदर्याची श्रीमंती : रानावनातील, जंगलझाडीतील पक्षांचा अभ्यास करणे हा छंद मारूती चितमपल्ली यांना लहानपणापासून आहे. या छंदाकरिता त्यांनी अनेक जंगलांना भेटी दिल्या आहेत. पक्षीनिरिक्षणाच्या भटकंतीत त्यांना आलेले अनोखे अनुभव त्यांनी या लेखात शब्दबद्ध केले आहेत. पक्षी निरीक्षण करण्याकरिता ते एकदा दिवेआगर नजीकच्या कुडेगाव येथे पहाटेच्या अंधारात पोहोचले. त्यांच्यासोबत भातखंडेशास्त्री होते. कोळीवाड्यातील धर्मा जानु पाटील यांच्याशी त्यांची ओळख झाली. पहाटेच्या सुंदर वातावरणात होडीत बसून त्यांना समुद्राचा प्रवास करावयाचा होता. दोन डोंगरांमधून वाहत समुद्राला मिळालेल्या हरीवत या नदीतून ते प्रवास करत होते. या प्रवासातील अतिशय नयनरम्य अनुभव त्यांनी या लेखात सांगितले आहेत. या लेखातून नवे प्रदेश, नवी माहिती वाचकांना सतत मिळत राहते. समुद्रकाठच्या अशा वनांना मॅनग्रुव्ह म्हणजे खाजणीची जंगलं म्हणतात, अशी माहिती लेखक आपणास देतात. शिवाय या जंगलाविषयीची शास्त्रीय माहिती ते वाचकांना सांगतात,''खाजणीच्या जंगलात कांदळ, टिवर व वांजळाची झाडं होती. भरती-ओहोटीचं पाणी ह्या जंगलात येत असल्यानं त्यांना भरती-ओहोटीची म्हणजे 'टायडल फॉरेस्ट' असंही संबोधलं जातं. या झाडांच्या मुळांची टोकं पाण्यावर आलेल्या एखाद्या तीक्ष्ण

खिळ्यासारखी दिसतात. बी झाडावरच उगवतं. खाली पडताच ती वाढू लागतात.'' जंगल झाडांविषयीची अशी नवनवी माहिती मारूती चितमपल्ली यांनी या लेखात देतात. त्यामुळे वाचकांच्या ज्ञानाच्या कथा सतत रूंदावत राहतात.

ही जंगलं पहात असतानाच मारूती चितमपल्ली यांना चुट्चुट् असा आवाज येऊ लागतो. सोबत असलेल्या धर्मा यांना ते या आवाजासंबंधी विचारतात,''हा कसला आवाज येतो आहे.'' लेखकाच्या या प्रश्नाचे निराकरण करताना धर्मा म्हणतात, ''कालवं मिटताना असा आवाज होतो.'' कालवं मिटतानाच्या आवाजाविषयीची नवीच माहिती वाचकांनाही या लेखाच्या आधारे मिळते. या प्रवासात लेखकांना झाडावर पाच-सहा फूट उंचीवर सरड्यासारख्या हिरव्या रंगाचा प्राणी दिसतो. त्यांना तिथे 'तेलमुंडे' असे म्हटले जाते. ''हा झाडावर चढणारा डेमका म्हणजे मासा आहे.'' अशीही माहिती धर्मा यांनी लेखकाला दिली. शिवाय त्यांनी लेखकांना उदमांजराचे घरटंही दाखविले आणि,''उदमांजरी आपली पिलं देण्याकरिता पाण्यालगत जमिनीच्या दिशेनं लांबवर बीळ करते अन् त्यातच दोन तीन पिलांना जन्म देते. अशा पिलांना घबाड म्हणतात'' हेही धर्मा लेखकांना उत्साहाने सांगत राहतो. अशी पशु, पक्षी, जलचर यांच्याविषयीची नवनवी माहिती मारूती चितमपल्ली यांनी या लेखाच्या माध्यमातून वाचकांना, अभ्यासकांना करून दिली आहे.

होडीतून प्रवास करताना पाण्याच्या कडेला जमिनीवर मारूती चितमपल्ली यांना उंचउंच वारूळं दिसू लागली. पण ती वारूळं नव्हती तर ती 'समुद्री विंचवाची घरं आहेत.' असे सांगून धर्माने त्यांना या विंचवांची माहितीही तपशीलवारपणाने सांगितली. या विंचवांविषयीची नवी शास्त्रीय माहिती मारूती चितमपल्ली यांनी इथेही सांगितली आहे. विंचवांविषयीची माहिती सांगताना लेखक म्हणतात,''समुद्र विचंवाला 'किंग क्रॅब' असे म्हणतात. ह्या प्राण्यांविषयी अद्यापपर्यंत शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास झाला नाही. समुद्र विंचू खेकड्यासारखा दिसत असला, तरी त्याचा संबंध कोळीगण-स्पायडरशी येतो.'' वाचकांच्या ज्ञानात ही अशी भर मारूती चितमपल्ली सतत घालत असताना जाणवत राहते. मारूती चितमपल्ली यांचे लेख वाचताना वाचकांच्या जीवनजाणिवांच्या कक्षा रूंदावत असल्याचे जाणवत राहते.

निसर्ग सौंदर्याचे अवीट वर्णन : मारूती चितमपल्ली यांनी या लेखात निसर्ग सौंदयाची महती मुक्त कंठाने गायली आहे. चितमपल्ली यांना सूक्ष्म निरिक्षणशक्तीचं देणं लाभलं असल्यानं सृष्टीचं सौंदर्य ते डोळेभरून पाहतात आणि त्या सौंदर्यात वाचकांनाही सहभागी करून घेतात. एखाद्या

वाक्यात किंवा एखाद्या शब्दात ते निसर्गाचं सौंदर्य टिपतात. या लेखात त्यांनी पाहिलेल्या समुद्र पक्षांच्या जोडीविषयी ते लिहितात,'' इतक्यात डोक्यावरून समुद्र पक्षांची जोडी उडत गेली. समोर एखादं जिवंत रत्न बुडावं असं वाटलं.'' लेखकांनी पाहिलेला हा पक्षी म्हणजे मोतिया रंगावर काळे ठिपके असलेला खंड्या पक्षी होता.

सायंकाळ होताच समुद्र किनाऱ्यावरील विलक्षण गूढतेच्या वातावरणालाही मारूती चितमपल्ली यांनी शब्दबद्ध केले आहे. या अशा वातावरणाचे ते देहभान हरपून अवलोकन करतात. या वातावरणाचा आनंद घेतात. मोहाच्या झाडाविषयी ते लिहितात,''जंगलाच्या कडेला मोहराना– इतकं मोहून टाकणारं सुंदर दृश्य नाही. वाढत्या झाडांबरोबर ही झाडं अधिक मनोहर दिसतात. डेरेदार आकार. भरगच्च पानोळा. सदा सावलीचा बहर. किती पाखरांना, किती जनावरांना ते आसरा देतात. अन्न देतात. मोहा फुलला की त्याचं आगळं रूप अनुभवाला येतं.'' या झाडांविषयी लिहिताना लेखक या फुलांच्या गंधांविषयी 'मोयान मोयान गंध' अशा नव्या आणि फार सुंदर शब्दांचा वापर करतात. रात्रीच्या वेळी जंगलातील सांबर, चितळ, भेकर आणि कोठरी या नावाची हरणंही फुलं खायला येतात. आदिवासी स्त्रिया ही फुलं गोळा करतात. ही फुलं खाऊन एखाद्या अस्वलाला तिथेच गुंगी येते. ही अशी माहिती वाचताना चितमपल्ली आपणास एका सुंदर निसर्गचक्राचा परिचय करून देत आहेत; असेच वाटत राहते.

निसर्ग हाच गुरू : निसर्गाच्या सानिध्यात आपलं अवघं आयुष्य वेचलेले मारूती चितमपल्ली निसर्गाकडून खूप काही शिकलेले आहेत. निसर्गाचं ऋण ते सदैव मानताना दिसतात. 'निसर्ग हाच माझा खरा गुरू आहे.' हे त्यांनी विलक्षण नम्रतेने मान्य केले आहे. 'वनांच्या सावलीत मी वाढलो आहे.' अशी प्रांजळ कबूली देऊन ते पुढे लिहितात,''ग्रंथात आढळून येणार नाही ते वृक्ष व दगडांनी पढविलंय.'' निसर्गाकडून खूप काही शिकण्यासारखं आहे ही लेखकांची धारणा आहे. त्यामुळे, आभाळाच्या, पर्वताच्या, हिरव्या मैदानाच्या चमकणाऱ्या पाण्याच्या दर्शनानं कितीतरी स्मृती माझ्यात जागृत होतात. मुलांना विचारी, पवित्र बनवायचं असेल तर मुलांना निसर्गाच्या सानिध्यात मुक्तपणे भटकू दिलं पाहिजे. अशाप्रकारचा निसर्गधार्जिणा विचार या लेखाच्या आधारे मारूती चितमपल्ली यांनी व्यक्त केला आहे.

समारोप : मारूती चितमपल्ली यांनी लिहिलेला 'जंगलाचं देणं' हा मराठी साहित्यातील एक अतिशय सुंदर असा ललित लेख आहे. लहानपणापासून चितमपल्ली यांना जंगलवाटा धुंडाळण्याची

आवड होती. त्यांना नोकरीही जंगलझाडांचा अभ्यास करणे आणि त्यांचं संवर्धन करणे अशा स्वरूपाची होती. या अभ्यासाला त्यांनी निरीक्षण करण्याची, ते अनुभव शब्दबद्ध करण्याची जोड दिली. निसर्गाच्या सानिध्यात घडणाऱ्या घटना, प्रसंगांकडे त्यांनी कुतूहलपूर्ण पाहिले. जंगलांची निर्मिती, त्या जंगलात जगणारे पक्षी, प्राणी, वनस्पती या सर्वांकडे मारूती चितमपल्ली यांनी करूणेच्या पातळीवर पाहिले आहे. देशविदेशातील जंगलांसोबतच त्यांना पावसाचे, समुद्राचे, समुद्रीजीवांचेही विलक्षण आकर्षण असल्याने या संदर्भातील अनुभवही त्यांनी अत्यंत मनोज्ञतेने टिपले असल्याचे दिसून येते. मारूती चितमपल्ली यांची शब्दकळाही अत्यंत प्रवाही आणि प्रासादिक असल्याचे आपणास दिसून येते. 'जंगलाचं देणं' हा लेख वाचल्यानंतर जंगलांविषयीची उत्सुक्ता वाचकांच्या मनात जागृत होते आणि आपणही निसर्गाकडे विशाल अंत:करणाने पाहिले पाहिजे; निसर्गाचे संवंर्धन केले पाहिजे, याची जाणीव होत राहते.

नांदेड ते हार्वर्ड–डॉ.सूरज मिलिंद एंगडे

डॉ.सूरज मिलिंद एंगडे : डॉ.सूरज मिलिंद एंगडे हे एक तरूण संशोधक, मानवाधिकार कार्यकर्ते, आंबेडकरवादी सामाजिक कार्यकर्ते, वकील व लेखक आहेत. ते मूळचे नांदेड येथील असून अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात ते संशोधन करीत आहेत. ते अलिकडच्या काळातले जातव्यवस्थेचे प्रख्यात अभ्यासक आहेत. 'कास्ट मॅटर्स' हे त्यांचे बहुचर्चित पुस्तक आहे. 'द रॅडिकल इन आंबेडकर' या ग्रंथाचे सहसंपादक आहेत. जीक्यू इंडिया या मासिकाने त्यांना २०२१ मधील २५ सर्वाधिक प्रभावशाली तरुण भारतीयांमध्ये सूचीबद्ध केले आहे. त्यांच्या 'कास्ट मॅटर्स' या पुस्तकाचा अनेक भाषांमध्ये अनुवाद झाला आहे. सूरज एंगडे आफ्रिका आणि आफ्रिकी अमेरिका अध्ययन विभागात संशोधन सहयोगी या पदावर काम करीत आहेत. शिवाय नुकतीच त्यांची नियुक्ती हार्वर्ड केनेडी स्कूलमध्ये सिनियर फेलो म्हणून झाली आहे. ते विटवाटरसैंड विद्यापीठ, जोहान्सबर्ग या विद्यापीठातील भारतातील पहिले दलित पीएच.डी. प्राप्त विद्यार्थी आहेत. त्यांनी विविध भाषांमध्ये जवळपास १५० हून अधिक निबंध आणि समीक्षात्मक लेख लिहिले आहेत. त्यांना २०१८ मध्ये रोहित वेमुला मेमोरियल स्कॉलर ॲवार्ड पुसस्कार आणि २०१९ मध्ये कॅनडा येथील 'डॉ.आंबेडकर सामाजिक न्याय पुरस्कार' प्राप्त झाला आहे. लोकसत्ता या दैनिकासाठी त्यांनी स्तंभलेखनही केले आहे. त्यांचे अनेक लेख अल जजीरा, बीबीसी, द

कारवा, लाइवमिंट, द संडे वर्ल्ड, द वायर स्क्रॉल, ओपन डेमोक्रेसी या नियतकालिकात प्रकाशित झाली आहेत. सूरज एंगडे यांनी देशविदेशात जातीवाद, नक्षलवाद, सामाजिक भेदभाव, विविधता आणि एकता आदि विषयांवर अनेक व्याख्याने दिली आहेत.

प्रास्ताविक : साहित्य, समाज आणि वैचारिक लेखन या क्षेत्रातील सूरज एंगडे हे एक महत्त्वाचे नाव आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन यश, प्रसिद्धी आणि कीर्ती यांची उत्तुंग शिखरे सूरज एंगडे यांनी कशी पादाक्रांत केली; याची हकीगत नांदेड ते हार्वर्ड या लेखात स्वत: सूरज एंगडे यांनी कथन केली आहे. त्यांनी कथन केलेला हा प्रवास तरूण विद्यार्थी अभ्यासकांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. महाराष्ट्रातील नांदेड सारख्या शहरात जन्मलेले आणि याच शहरात शिक्षण घेऊन परदशातील नामांकित अशा हार्वर्ड या विद्यापीठापर्यंत एंगडे कसे पोहोचले त्याकरिता वाचन, चिंतन, मनन ही शिदोरी कशी कामी आली; याचे सुंदर शब्दांकन हा या लेखाचा विषय आहे.

आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीवर मात : एका दलित कुंटुंबात जन्मलेल्या सूरज एंगडे यांची कौटुंबिक आणि सामाजिक परिस्थिती अत्यंत बिकट स्वरूपाची होती. अनेक दलित वर्गाची जशी सामाजिक आणि आर्थिक कुचंबणा आपल्या समाज जीवनात होत असते; तशीच परवड या कुटुंबाचीही होत होती. अखंड दारिद्र्य आणि उच्चवर्णीय समाजाकडून होत असलेली मानहानी या समाजालाही सोसावी लागत होती. तथापि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा परिणाम अनेक कुटुंबावर जसा परिणामकारकपणे घडत होता. तसाच त्या विचारांचा प्रभाव एंगडे यांच्या कुटुंबावरसुद्धा होत होता. सूरज एंगडे यांचे वडील तसे अल्पशिक्षित पण पुरोगामी विचाराचे होते. आपल्या मुलांनीही डॉ.आंबेडकरांसारखे शिकावे, मोठे व्हावे असे स्वप्न अर्थातच सूरज एंगडे यांच्या वडिलांनी पाहिले होते; आणि ते सत्यात उतरावे अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे आपल्या मुलाला दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी सूरज एंगडे यांना लहानपणापासूनच उत्तम शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. आर्थिक ओढग्रस्तीचा संसार असूनही शिक्षणासाठी त्यांनी सतत आर्थिक तजवीज करण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाच्या बाबतील पालकांचे प्रोत्साहन कशा प्रकारचे असावे याचा सुंदर वस्तुपाठ म्हणून आपणास सूरज एंगडे यांच्या वडिलांकडे त्यांच्या विचारांकडे पाहता येईल. सूरज एंगडे यांनी त्यांच्या वडिलांचा उल्लेख या लेखात अत्यंत कृतज्ञतेने केला आहे.

नकारात्मक परिस्थिती आणि सकारात्मक विचार : सूरज एंगडे यांनी ज्यावेळी शालेय शिक्षणाला सुरुवात केली. तेव्हा त्यांच्या आसपासचे वातावरण अत्यंत प्रतिकूल आणि नकारात्मक स्वरूपाचे होते. शिक्षणाकडे पाहण्याची उदासीन वृत्ती, शिक्षणाकरिता आर्थिक झळ न सोसण्याची मानसिकता सूरज एंगडे यांच्या नातेवाईकांमध्ये, शेजारी, मित्रमंडळी यांच्या मानसिकतेमध्ये होती. तरीही महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांनी समाजात शिक्षणाचे रुजविलेले विचार सूरज एंगडे यांच्या वडिलांच्या मनावरही बिंबलेले होते. सामाजिक प्रश्नांवर विचारमंथन करणारे ग्रंथ, मासिके यांचे ते चांगले वाचक असल्याने त्यांनी सूरज एंगडे यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश मिळवून दिला. ती शाळा केरळ, तमिळनाडू येथून आलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी सुरू केली होती. तिथेही त्यांना त्यांच्या दलितातत्त्वाची जाणीव इतर मुले करून देत असत. शाळेतल्या मुलांचे आईवडील त्या मुलांना, 'या मुलाबरोबर वेळ घालवू नकोस.' असे सांगत रहायचे. ऑफिसमधले क्लार्क लेव्हलचे अधिकारीदेखील त्यांच्या मुलांना सरकारी शाळेत घालायचे. तथापि 'तुझ्या घरावर पत्रे आहेत आणि याची फी कोण भरेल?' असे लोक म्हणत असतानाही सूरज एंगडे यांच्या वडिलांनी त्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातले. शाळेची फी वेळेत भरली नाही म्हणून शाळेचे क्लार्क अचानक वर्गात येऊन त्यांचा अपमान करायचे. शिवाय दुसरीच्या वर्गात असताना सूरज एंगडे यांच्या वडिलांचे संधिवाताचे दुखणे सुरू झाले. त्यामुळे ते सदैव अंथरुणावर विश्रांती घेत असायचे. मोडका पलंग, तांदुळ निवडणारी आई, ब्लॅक ॲण्ड व्हाईट टीव्हीवर केबल आणण्याचा प्रयत्न करणारा भाऊ, चित्रं काढण्यात किंवा कविता लिहिण्यात गुंग असणारी बहीण अशा कौटुंबिक वातावरणात शालेय शिक्षण पूर्ण करणाऱ्या सूरज एंगडे यांचे चांगले चित्रण या लेखात आले आहे.

वाचनाचे संस्कार : सूरज एंगडे शालेय शिक्षण जेव्हा घेत होते तेव्हा त्यांना किंचितही अवांतर वाचनाची आवड नव्हती. त्या काळात मी साहित्य आणि लेखनाबाबत मानसिक दृष्ट्या तयारच नव्हतो.' असे त्यांनी या लेखात म्हणून ठेवले आहे. कारण ज्या वातावरणात ते रहात असत ते वातावरण शिक्षण घेण्यासाठी वाचन, चिंतन अथवा एखादा छंद लावून घेण्यासाठी अनुकूल नव्हते. सूरज एंगडे यांचे मित्रमंडळ मारामाऱ्या करण्यात आणि पाकीटमारी करण्यात पटाईत होते. या वातावरणात आपली मुले शिकणार नाहीत; असा विचार करून त्यांनी बाजूच्या एका कॉलनीत दोन खोल्यांचे एक घर भाड्याने घेतले होते. पण वडिलांचे आजारपण आणि

आर्थिक ओढग्रस्तीमुळे हे कुटुंब परत जनता कॉलनीमध्ये आले. तिथेच सूरज एंगडे यांना चाचा चौधरी यांनी लिहिलेल्या डायमंड कॉमिक्स आवडू लागल्या. वि.स.खांडेकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, म.जोतिबा फुले यांच्या साहित्याची, त्यांच्या विचारांची गोडी सूरज एंगडे यांना लागली महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रातल्या पुरवणीत आलेली लडाखमध्ये असलेल्या एका मुलाची कहाणी सूरज एंगडे यांच्या वडिलांनी त्यांना इंग्रजीतून भाषांतरित करायला सांगितली होती. अशा प्रकारच्या वाचनाच्या, भाषांतराचा आपल्या व्यक्तिमत्त्व विकासावर फार चांगला परिणाम होतो. त्यामुळे आपल्या शिक्षण व्यवस्थेतही असे प्रयोग आपण केले पाहिजेत; असे महत्त्वपूर्ण विचार सूरज एंगडे यांनी या लेखात व्यक्त केले आहेत. पाश्चात्य देशात विशेषत: अमेरिकेत अशाप्रकारचे गृहपाठ विद्यार्थ्यांना दिले जातात. अशीही नवी माहिती ते या लेखात देतात. हे सारं काही वडिलांनी आपल्या मनावर जाणीवपूर्वक बिंबवलं आणि चांगल्या विचारांचं बीज माझ्या मनात रुजत गेलं अशी प्रांजळ कबूलीही ते देतात.

चाकोरीबद्ध शिक्षणाचा त्याग आणि नव्याचा ध्यास : सूरज एंगडे हे दहावी आणि बारावी या वर्गाचे शिक्षण घेताना पारंपरिक अर्थाने अत्यंत हुशार समजले जाणारे विद्यार्थी नव्हते. या वर्गात शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना जे मार्क्स मिळाले तेही काही घवघवीत म्हणावेत असे नव्हते. दहावीला ६६ टक्के आणि बारावीला केवळ ४६ टक्के घेऊन ते जेमतेम उत्तीर्ण झाले होते. तरीही दहावी, बारावी उत्तीर्ण त्यांच्या कुटंबामध्ये कुणीही झालेले नव्हते, म्हणून या गोष्टीचा अभिमान घरातल्या प्रत्येकाला होता. बरोबरीचे पास झालेले सर्व विद्यार्थी सायन्स किंवा कॉमर्स या शाखेकडे जायला उत्सुक होते. 'भारतात अजूनही कुणी आर्टस्ला जायला उत्सुक नसतं. हार्वर्डमध्ये तो सगळ्यात महत्त्वाचा विषय आहे.' असे अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण सूरज एंगडे या लेखात नोंदवितात. आणि यामुळे 'भारतात मानवता नसलेली संस्कृती आपण तयार करत आहोत. नंबर्स आणि रोबोट्सनी मानवता थोडीच तयार होते?' असे परखड, वास्तवदर्शी आणि चिंतनीय मत ते या लेखात मांडण्याचा प्रयत्न करतात.

सूरज एंगडे यांच्या वडिलांनी त्यांना शिक्षणातल्या नव्या वाटा दाखविल्या शिवाय फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी या विषयांची त्यांना अजिबात आवड नव्हती. तसेच सूरज एंगडे यांचा स्वभावही शालेय वयात खोडकर स्वरूपाचा होता. ते गुंडागर्दी, मारामाऱ्याही करायचे. मार खायचे आणि मार द्यायचेही. त्यामुळे, 'क्रिमिनॉलॉजी किंवा सोशल सायन्स शिकायला हवं होतं. कारण

अनुभव त्याचाच होता.' असंही ते गमतीनं या लेखात म्हणतात. या पुढील शिक्षणाकरिताही त्यांना त्यांच्या वडिलांची खूप मदत झाली. यशवंत कॉलेज येथे चंदनशिवे नावाचे एक इंग्रजीचे प्राध्यापक होते, त्यांनी आणि वडिलांनी सूरज एंगडे यांना 'लॉ' या शाखेचे शिक्षण पूर्ण करण्याचा सल्ला दिला. सुरुवातीला 'लॉ' चे शिक्षण घ्यावे असे त्यांना वाटत नव्हते. पण वडिलांनी त्यांना एक प्रकारचं तात्पुरतं आमिष दाखविलं,'तुला शिक्षणासाठी लागतील तेवढे पैसे देतो. गाडी घेऊन देतो.' असं आश्वासन वडिलांकडून मिळाल्यामुळं त्यांनी 'लॉ'चे शिक्षण पूर्ण करण्याकरिता महाविद्यालयात प्रवेश घेतला. 'लॉ' इंग्रजीत होते आणि ती भाषा सूरज एंगडे यांच्या आवडीची होती. ही त्यांना एकप्रकारची संधीच होती. ती त्यांनी दवडली नाही. 'लॉ' कॉलेजमध्ये स्पर्धात्मकता आणि सकारात्मकता ही सूरज एंगडे यांच्या आयुष्याचा एक अविभाज्य घटक बनली.

नांदेड ते इंग्लंड उत्तुंग भरारी : सूरज एंगडे यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात जी नेत्रदीपक प्रगती केली ती निश्चितच प्रशंसनीय स्वरूपाची आहे. उच्च शिक्षणाकरिता हार्वर्ड येथे जाण्यापूर्वी ते नांदेडच्या आंबेडकरनगरच्या जनता कॉलनीतून थेट इंग्लंड येथील विद्यापीठात गेले. परदेशातील वातावरणाचा तेथील सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचा कोणताही अनुभव त्यांच्या पाठीशी नव्हता. पण इंग्लंड येथे गेल्यावर त्यांना प्रकर्षाने एक अत्यंत महत्त्वाची बाब जाणवली, आणि ती म्हणजे त्यांना तिथे अस्पृश्य असण्याचा अनुभव एकदाही आला नाही. या देशात खर्चासाठी म्हणून त्यांच्याकडे केवळ २७० पौड इतकीच रक्कम होती. इतक्या कमी पैशांवर त्यांना तिथे एक महिना पूर्ण करावयाचा होता. पण अत्यंत काटकसरीने केवळ फिंगर चिप्स आणि स्वस्तात मिळणारे बर्गर खाऊन ते आपली दैनंदिन कामे करीत असत. सतत अभ्यास करीत असत. इंग्लंडमध्ये राहूनही त्यांनी भारतीय संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला. इंग्लंडमध्ये त्यांनी सोबत असावी म्हणून भारतीय विद्यार्थ्यांचा शोध घेतला. तिथे त्यांना उल्हासनगरचा एक सिंधी आणि शर्मा हे मित्र भेटले. त्या मित्रांनी सूरज एंगडे यांना कमी खर्चात कशी गुजराण करायची याचे धडे दिले. पण स्कॉलरशिप मिळते म्हणून ते सूरज एंगडे यांचा दुस्वास करायचे. इंग्लंड येथेही आर्थिक विवंचना असूनही कोणत्याही प्रकारची तक्रार न करताही त्यांनी आपले शिक्षण घेण्याचे कार्य अविरत सुरूच ठेवले.

संयुक्त राष्ट्रात निवड : 'आकांशापुढती गगन ठेंगणे', असे म्हटले जाते. सूरज एंगडे याच्याबाबतीही असेच घडले. इंग्लंडमध्ये असतानाच सूरज एंगडे यांनी निश्चित केलं होतं की त्यांना संयुक्त राष्ट्रांमध्ये काम करायचं आहे. संशोधन करण्यापेक्षा त्यांना फिल्ड वर्कमध्ये काम

करण्यात आनंद वाटत होता. मे महिन्याच्या सुट्टीत त्यांनी संयुक्त राष्ट्रांमध्ये अर्ज केला आणि तिथे त्यांची निवड झाली. इंग्लंड येथील विद्यापीठातून त्यांची एकट्याचीच निवड झाली होती. ही निवड सूरज एंगडे यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी होती. संयुक्त राष्ट्रांमध्ये दरवर्षी मानवाधिकाराची जी जागतिक परिषद भरते, तिथे त्यांची 'सेक्रेटरिएट इंटर्न' या पदावर निवड झाली. एवढ्यावरच ते थांबले नाहीत. ते स्वित्झर्लंड येथे गेले. तेथील मंत्रालयात त्यांनी काम केले. तिथे त्यांना संयुक्त राष्ट्रातल्या तज्ज्ञांसोबत, जगभरातल्या मानवाधिकार कायद्यांसंबंधात निर्णण घेण्याऱ्या लोकांसोबत काम करायला मिळालं. या देशात त्यांना डेव्हिड चॅप्लिन हा अत्यंत मनमिळावू मित्र भेटला. या सर्व अनुभवांचे अत्यंत मनस्वी वर्णन सूरज एंगडे यांनी या लेखात केले आहे.

संयुक्त राष्ट्रात गेल्यापासून त्यांची आफिकेविषयीची ओढ वाढली होती. भारतातील दलितांच्या वाट्याचं जीवन आफिकेतील निग्रो लोकांनाही जगावं लागत होतं. हे सारं ध्यानात घेऊन सूरज एंगडे यांनी एका ग्लोबल स्कॉलरशिपसाठी अर्ज केला. तिथेही त्यांची निवड झाली. आफ्रिकेतली मानवमुक्तीची चळवळ त्यांनी समजून घेतली आणि आपल्या देशातील चळवळी त्यांनी आफ्रिकेतील लोकांना समजून सांगण्याचा खूप चांगला प्रयत्न केला. ज्या विद्यापीठात नेल्सन मंडेला शिकले होते त्या विद्यापीठात ते सिनेटवरही निवडून गेले. तिथे त्यांना दिलीप मेनन यांनी पीएच.डी.पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित केले. हे सर्व पाहिले असता सूरज एंगडे यांनी केवळ पदव्या मिळवण्यासाठी परदेशवारी केली असे नसून त्यांची समाजाविषयी, सामाजिक प्रश्नांविषयीची जाणिवही कशी जागृत होती हे दिसून येते.

आफिका ते हार्वर्ड अचंबित करणारा प्रवास : साहित्य, समाज, सामाजिक चळवळी, शिक्षण या क्षेत्रात सक्रीयपणे कार्यरत असतानाच बौद्धिक चौकसपणात अधिक भर पडावी म्हणून सूरज एंगडे यांना हार्वर्ड विद्यापीठात जावं असं मनापासून वाटू लागलं. हार्वर्ड येथे अत्यंत विद्वान असणारे जॉन कॉमरऑफ यांना त्यांनी एक मेल लिहिला. शिवाय दक्षिण आफ्रिकेवर ग्रंथ लिहिलेले थॉमस हॅन्सन या प्राध्यापकांनीही त्यांना 'स्टॅनफर्ड' या विद्यापीठात अध्ययन करण्याकरिता बोलावले होते. सूरज एंगडे यांनी हार्वर्ड विद्यापीठ निवडले, मन लावून अभ्यास केला, थोरामोठ्यांच्या ओळखी करून घेतल्या, विविध समित्यांवर सक्रीय काम केले. हार्वर्ड विद्यापीठातच ते सिनियर फेलो म्हणून कार्यरत आहेत. हार्वर्ड येथे त्यांचे आलिशान कार्यालय आहे. अनेक ग्रंथांसोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माल्कम एक्स, कांशीराम इत्यादी

थोरामोठ्यांची छायाचित्रे त्यांच्या कार्यालयात विराजमान आहेत. या सर्वांपासून प्रेरणा घेऊन सूरज एंगडे विविध क्षेत्रात भरीव योगदान देत आहेत. त्यामुळे आचार, विचार आणि उच्चार या तीनही अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींमध्ये सूरज एंगडे यांचे कार्य कसे प्रेरणादायी आहे, याचा प्रत्यय या लेखातून निश्चितच आपणास येतो.''स्वत:प्रमाणे दुसरी व्यक्तीही स्वतंत्रपणे जगली पाहिजे, त्याच्या जीवनाची गुणवत्ता चांगली असली पाहिजे; त्याचे सामाजिक, मानसिक अधिकार हिरावले जाता कामा नयेत. यासाठी मी प्रयत्न करतो आहे.'' असा निर्धार मनाशी बाळगून सदैव कार्यरत असणारे सूरज एंगडे यांचे आश्वासक व्यक्तिमत्त्व या लेखातून आपणास दिसून येते.

समारोप : अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन एका सर्वसामान्य दलित कुटुंबातील विद्यार्थी शालेय शिक्षणाचे धडे कशाप्रकारे घेतो, पारंपरिक शिक्षणाची चाकोरीबद्धता टाळून यशस्वी जीवनाच्या नव्या वाटा कशा धुंडाळतो, तसेच आपल्या अंगभूत विद्वत्तेच्या जोरावर हार्वर्ड सारख्या नामांकित विद्यापीठात मोठ्या पदावर कसा कार्यरत राहतो; याचे अचंबित करणारे वर्णन या लेखाच्या माध्यमातून आपणास सतत जाणवत राहते. शिवाय शिक्षण घेऊन, नोकरी मिळवून सुखासीन आयुष्याचे स्वप्न पहात न राहता देश-विदेशातील दीन, दलित, वंचित समाजासाठी, सामाजिक प्रश्नांसाठी, चळवळींसाठी सूरज एंगडे कसे कार्यरत रहात आलेले आहेत; या सर्वांचे अतिशय सुंदर शब्दांकन या लेखात करण्यात आले आहे. सूरज एंगडे यांचे एक विचारवंत माणूस, विद्वान प्राध्यापक आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून विद्यार्थांना, अभ्यासकांना प्रेरणादायी ठरेल असा प्रवास या लेखाच्या माध्यमातून आपणास निश्चितच पहावयास मिळतो.

पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

पंच-सरपंच, चटशिरी-पटकन, कामात गर्क-कामात व्यस्त, हाताचा मुटका-हाताची मूठ, गुतापून-गुंतून, हडबडून-पटकन, मंतरलेले दिवस-आनंदाचे किंवा सुखाचे दिवस, दिवेलागण-सायंकाळ, स्वास्थ्यकारक-आनंदी किंवा समाधानकारक, छावणी-राहण्याचे ठिकाण किंवा वस्ती, अजस्त्र-मोठमोठी, पायपीट-प्रवास, अवर्षण-दुष्काळ, ओणावलेलं-झुकलेलं, पक्षाची शीट-पक्षाची विष्ठा, पक्षाचं कूजन- पक्षांचा चिवचिवाट, हतबल-असहाय, आमिष-प्रलोभन, कलापटणी-वेगळं वळण किंवा वेगळी दिशा, सुखद-आनंदाचा, बौद्धिक चौकसपणा-बौद्धिक विकास, पिच्छा-पाठलाग, आलिशान-उच्चभ्रू, निटनेटकं किंवा देखणं.

स्वयं अध्ययनाकरिता प्रश्न व उत्तरे:

योग्य पर्याय निवडा

१. पितळेची नळी तोंडात धरून कोण आपल्या कामात गर्क होऊन गेले होते?

अ)भालू सुतार ब)गणपत माळी क) विकास सुतार ड)भालबा कुंभार

२.सोनाराकडून दागिने घेऊन भल्या सकाळी कोणाला जायचे होते?

अ)सोना मावशी ब)देसायाची आवडाक्का क) सावाक्का ड)जिजा आत्ती

३.दाजिबा देसाई कोणत्या धान्याच्या पोत्याची हलवाहलव करीत होते.

अ)मक्याच्या ब)तांदळाच्या क)गव्हाच्या ड)जोंधळ्याच्या

४.'कोरम भरल्याला हाय; मिटिंग सुरू करा.' असे कोण म्हणाले ?

अ)सरपंच ब)बाळा माळी क)तारा मावशी ड)रामा धायगुडे

५.'डोळे कधीतरी बोलतात का? कायतरीच त्याचं!' असे उद्गार कोणी काढले आहेत?

अ)इंदू ब)प्रभा क)पारू ड)सुंद्रा

६.इंदू हिला अस्वस्थ करणारे स्वप्न केव्हा पडले होते?

अ)पहाटे ब)दुपारी क)सायंकाळी ड)रात्री

७.ओल्या हाताने इंदूने कशाची काच पुसली?

अ)कंदिलाची ब)खिडकीची क)चष्म्याची ड)फोटोची

८.झाडं डोंगरावर पसरू लागली की वारा त्यांना कशाप्रकारे आकार देतो?

अ)शिल्पकाराप्रमाणे ब)कुंभाराप्रमाणे क)चित्रकाराप्रमाणे ड)देवदूताप्रमाणे

९.मारूती चितमपल्ली यांच्यामते, 'वाढत्या वयाबरोबर माणूस कसा दिसतो?'

अ)सुंदर ब)कुरूप क)बेढब ड)हिस्त्र

१०. शोला म्हणजे कोणत्या प्रकारचे जंगल होय?

अ)फळांचे ब)फुलांचे क)सावलीचे ड)पानझडीचे

११.उदमांजरीच्या पिलांना कोणत्या नावानं संबोधलं जातं?

अ)कालवं ब)घबाड क)डेमका ड)तेलमुंडे

१२.कोणत्या देशामध्ये असाइनमेंटला पुस्तकं देतात?

अ)भारत ब)श्रीलंका क)युरोप ड)अमेरिका

१३.सूरज एंगडे यांना मराठी व्यक्तिरिक्त कोणत्या भाषेची आवड आहे?

अ)इंग्रजी ब)संस्कृत क)गुजराथी ड)कन्नड

१४.सूरज एंगडे यांनी कोणत्या देशाला जगातला स्वर्ग असे म्हटले आहे?

अ)चीन ब)जपान क)स्वित्झर्लंड ड)अफगाणिस्थान

१५.सूरज एंगडे यांनी कोणत्या देशातल्या कामगार चळवळींचा अभ्यास केला आहे?

अ)आफिका ब)मॉरिशस क)जिनिव्हा ड)इस्त्राईल

१६. सूरज एंगडे यांना पीएच.डी.करण्याकरिता कोणी प्रोत्साहित केले होते?

अ)थॉमस हॅन्सन ब)डेव्हिड चॅप्लिन क)जॉन कॉमरऑफ ड)दिलीप मेनन

स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१.अ)भालू सुतार २.ब)देसायाची आवडाक्का ३.ड)जोंधळ्याच्या ४.अ)सरपंच ५.अ)इंदू ६. क)सायंकाळी ७.ड)फोटोची ८.अ)शिल्पकाराप्रमाणे ९.ब)कुरूप १०.क)सावलीचे ११.ब)घबाड १२.ड)अमेरिका १३.अ)इंग्रजी १४.क)स्वित्झर्लंड १५.अ)आफिका १६.ड)दिलीप मेनन

सरावासाठी प्रश्न :

१. 'मिटिंग' या कथेतील म्हादू शिपाई या पात्राचे व्यक्तिचित्रण करा.

२. 'मिटिंग ही विनोदी कथा आहे.' तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

३. 'सांज' या कथेतील इंदू या संसारात रमून गेलेल्या स्त्रीचे भावविश्व उलगडून दाखवा.

४. इंदू या व्यक्तिरेखेच्या मनाच्या अस्वस्थतेची कारणे तुमच्या शब्दात लिहा.

५. मारूती चितमपल्ली यांना जंगलात कोणकोणते अनुभव आले, ते लिहा.

६. 'शोला'च्या जंगलाचे वर्णन लेखकाने कशाप्रकारे केले आहे.

७. सूरज एंगडे यांचा 'नांदेड ते हार्वर्ड' हा शैक्षणिक प्रवास कशाप्रकारे झाला, ते स्पष्ट करा.

८. सूरज एंगडे यांचा 'नांदेड ते हार्वर्ड' हा एक प्रेरणादायी प्रवास आहे, या विधानाची सत्यता पटवा.

अधिक वाचनाकरिता ग्रंथ :

१. मराठी साहित्य : रूप आणि गंध – संपा.डॉ.सतीश कामत, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर प.आ.जानेवारी २०२३.

२.ग्रामीण साहित्य आणि संस्कृती : मोहन पाटील, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद सुधारित आवृत्ती २००८.

३.ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा – डॉ.वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद द्वितीय आवृत्ती डिसेंबर २००८.

४.चकवाचांदण एक प्रश्नोपनिषद : मारूती चितमपल्ली, मौज प्रकाशनगृह, मुंबई. पहिली आवृत्ती मे २००५.

५.डॉ.सलीम अली – विणा गवाणकर, राजहंस प्रकाशन, पुणे. सातवी आवृत्ती जुलै २००६.

६.वाचणाऱ्याची रोजनिशी – सतीश काळसेकर, लोकवाङ्मय गृह, मुंबई. दुसरी आवृत्ती जुलै २०१४.

सत्र १ घटक ३ (गद्य)

१. भारतात लोकशाही नांदो : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

२. देवराष्ट्र : यशवंतराव चव्हाण

३. तपस्वी आबालाल रहिमान– माधवराव बागल

४. बाभूळबनातील सोनचाफा : प्रा. एन. डी. पाटील

---

१. भारतात लोकशाही नांदो : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

१.१ उद्दिष्टे (Objectives) :

'भारतात लोकशाही नांदो' हा पाठ अभ्यासल्यानंतर आपणास

१. भारतीय संविधान निर्मिती मागील घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका स्पष्ट होईल.

२. देशाचे स्वातंत्र्य आणि लोकशाही या संदर्भातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मते आपणास समजतील.

३. सामाजिक लोकशाहीचे महत्त्व कळेल.

४. नागरिक म्हणून असणाऱ्या कर्तव्यांची व जबाबदारीची जाणीव होईल.

५. राष्ट्रनिर्मिती मागील व्यापक दृष्टिकोनाची भूमिका कळेल.

६. संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षापर्यंत भारतीय लोकशाहीने काय साध्य केले आहे, याची पडताळणी करता येईल.

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषाशैलीचे विशेष कळतील.

१.२ प्रास्ताविक (Introduction) :

वैचारिक साहित्य हा एकूण साहित्याचा महत्त्वाचा भाग असतो. वैचारिक साहित्य हे नेहमीच बुद्धिप्रधान असते. ते नवा विचार, नवा दृष्टिकोन देते. वैचारिक साहित्य हे मनोरंजनासाठी असत नाही, तर मानवी मनाची व विचारक्षमतेची जडणघडण करण्याकरिता असते. ज्या समाजामध्ये वैचारिक साहित्य मोठ्या प्रमाणात लिहिले व वाचले जाते तो समाज प्रगल्भ मानला जातो. कारण वैचारिक साहित्यातून प्रस्तुत झालेल्या विचारांमधून समाजाची धारणा होत असते, जडणघडण होत असते. आपला समाज व पर्यायाने राष्ट्र कोणत्या दिशेने गेले पाहिजे, याचे सूचन वैचारिक साहित्य करत असते. वैचारिक साहित्यामध्ये निबंध वाङ्मय, भाषणे, मुलाखती, संशोधनपर लेखन, माहितीपर लेखन, प्रबंध लेखन यांचा समावेश होतो.

भारतीय संविधान सभेत दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या भाषणाचा काही भाग 'भारतात लोकशाही नांदो' या शीर्षकाने पाठ्यपुस्तकात घेण्यात आला आहे. २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारतीय संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे समारोपाचे भाषण होऊन भारताचे संविधान संमत झाले. त्याच्या एक दिवस अगोदर संविधान निर्मिती बद्दल सन्माननीय सदस्यांनी आपले विचार संविधान सभेसमोर मांडले. त्याला उत्तर देताना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीर्घ भाषण केले होते. या भाषणाच्या पूर्वार्धामध्ये डॉ. आंबेडकरांनी घटना निर्मितीमध्ये ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला व आभार व्यक्त केले. त्याबरोबरच घटना निर्मितीस लागलेला वेळ व इतर संदर्भात घटना समितीच्या सदस्यांनी जे आक्षेप घेतले होते, त्यांना समर्पक उत्तर देण्याचे अवघड काम केले. या भाषणाच्या उत्तरार्धात त्यांनी भारताचे स्वातंत्र्य, लोकशाही व येथील सामाजिक परिस्थिती यासंदर्भात आपले अत्यंत मूलगामी, दूरदृष्टीचे व राष्ट्रहिताचे विचार मांडले. भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर देखील म्हणजेच संविधानाचा अमृत महोत्सव साजरा होत असताना देखील डॉ. आंबेडकरांच्या विचारांची प्रासंगिकता कायम आहे. या भाषणांमधून त्यांची दूरदृष्टी व राष्ट्रहिताची तळमळ स्पष्टपणे दिसून येते. या देशाचे भवितव्य उज्ज्वल व

सार्वभौम असावे, तसेच या देशाच्या नागरिकांना सामाजिक समतेचा लाभ व्हावा आणि लोकशाही सक्षमपणे टिकून राहावी, याबाबतची त्यांची मांडणी आजही महत्त्वपूर्ण आहे. तरुण पिढीने डॉ. आंबेडकरांचे हे भाषण मुळातून पुन्हा पुन्हा वाचले पाहिजे व समजून घेतले पाहिजे.

१.३ लेखक परिचय

भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१४ एप्रिल, १८९१ - ६ डिसेंबर, १९५६) हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली आणि बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली. तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे निर्माते' असेही म्हणतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या शिक्षण संस्थांमधून अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. पदव्या मिळविल्या; तसेच त्यांनी कायदा, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांवर संशोधन केले. त्यांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत, ते एक अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि वकील होते. त्यानंतर त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रांत काम केले. ते भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रचारामध्ये व चर्चांमध्ये सामील झाले, वृत्तपत्रे प्रकाशित केली, दलितांसाठी राजकीय हक्कांचा व सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला, तसेच आधुनिक भारताच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले. इ.स. १९५६ मध्ये त्यांनी आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. धर्मांतरानंतर लगेचच त्यांचे निधन झाले. इ.स. १९९० मध्ये त्यांना 'भारतरत्न' हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान मरणोत्तर प्रदान करण्यात केला. इ.स. २०१२ मध्ये, "द ग्रेटेस्ट इंडियन" नावाच्या सर्वेक्षणात आंबेडकरांची 'सर्वश्रेष्ठ भारतीय' म्हणून निवड करण्यात आली.

'रुपयाची समस्या: त्याचा उगम व त्याचे निरसन', 'जातिव्यवस्थेचे निर्मूलन', 'पाकिस्तान अथवा भारताची फाळणी', 'रानडे, गांधी आणि जीना', 'शूद्र पूर्वी कोण होते?', 'अस्पृश्य कोण होते? व ते अस्पृश्य का बनले?' , 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म', 'प्राचीन भारतातील क्रांती आणि प्रतिक्रांती', 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे २३ खंड आत्तापर्यंत प्रकाशित केले आहेत.

१.४ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान सभेत दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी केलेल्या भाषणाचा काही भाग म्हणजे प्रस्तुत पाठ आहे. हा या भाषणाचा उत्तरार्ध आहे. या उत्तरार्धामध्ये डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्योत्तर भारतातील स्वातंत्र्य व लोकशाहीचे भवितव्य याविषयी आपले चिंतन व्यक्त केले आहे. डॉ. आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे विद्वान आहेत. त्यांनी जगातील महत्त्वाच्या देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास केला होता. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान या विषयांचा त्यांचा व्यासंग अचंबित करणारा आहे. भारताचा इतिहास आणि वर्तमान याबाबत त्यांचे विश्लेषण वस्तुस्थितीवर आधारित होते. १५० वर्षांच्या गुलामगिरी मधून नव्याने स्वतंत्र झालेल्या आपल्या राष्ट्रासमोर कोणती आव्हाने आहेत, याचे त्यांना नेमके भान होते. भारतातल्या राजकीय पुढाऱ्यांनी आणि विद्वानांनी संकुचित विचार न करता व्यापक व प्रगल्भ विचार केला पाहिजे. दीर्घपल्ल्याचा विचार केला पाहिजे. देशाचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व आणि लोकशाही अखंड राहील, यासाठी एक नागरिक म्हणून आपली कर्तव्ये काय आहेत, हे प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. त्या तळमळी मधूनच त्यांनी प्रस्तुत भाषण केलेले दिसते. या भाषणामधून त्यांच्या जाज्वल्य देशभक्तीचे आणि राष्ट्रनिष्ठेचे दर्शन घडते.

डॉ. आंबेडकरांनी असे नोंदविले आहे की, २६ जानेवारी १९५० रोजी भारत अधिकृतरित्या स्वतंत्र राष्ट्र म्हणून वाटचाल सुरू करेल. परंतु आपल्याला मिळालेले हे स्वातंत्र्य अबाधित राहील की ते पुन्हा गमावले जाईल, याबाबत चिंता वाटते. त्याचे कारण सांगताना डॉ. आंबेडकरांनी असे म्हटले आहे की यापूर्वी भारताने आपले स्वातंत्र्य येथील काही लोकांच्या बेईमानीमुळे आणि विश्वासघातामुळे गमावले आहे. इतिहासात त्याची पुनरावृत्ती होईल काय? या गोष्टीचीचीचीचीचीचीचीचीची डॉ. आंबेडकरांना चिंता वाटते. कारण भारतात जाती धर्म व संप्रदायाचे अनेक छोटे मोठे गट आहेत. त्यासोबतच परस्पर विरोधी विचारसरणी असलेल्या राजकीय पक्षांची भर पडणार आहे. त्यामुळे राष्ट्र विविध गटात विभाजित होण्याचा धोका संभवतो. म्हणूनच ते असा धोक्याचा इशारा देतात की, जर पक्षांनी स्वतःच्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. आणि कदाचित कायमचे

गमाविले जाईल. या संभाव्यते विरुद्ध लढण्यासाठी आपण कटिबद्ध व्हायला हवे. आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण निर्धार केलाच पाहिजे. येथे डॉ. आंबेडकर देशाचे स्वातंत्र्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि त्याच्या रक्षणाची जबाबदारी भारतीय नागरिकांची आहे, असे स्पष्टपणे नोंदविताना दिसतात.

डॉ. आंबेडकर यांनी व्यक्त केलेली दुसरी चिंता म्हणजे भारत 26 जानेवारी, 1950 पासून स्वीकारत असलेल्या लोकसत्ताक संविधानाचे भवितव्य काय? ते टिकून राहील की पुन्हा गमावले जाईल? भारतात लोकशाही कधीच नव्हती असे नव्हे. भारतात पूर्वी अनेक गणराज्ये होती आणि तेथे आजच्या लोकशाही प्रमाणेच कारभार होता. बुद्धांच्या भिख्खू संघामध्ये देखील संसदीय प्रणालीचे उपयोजन केले जात होते. आता नव्याने लोकशाही स्थापन होत आहे. परंतु ती पुन्हा गमावण्याचा धोका देखील आहे. हे स्पष्ट करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, "भारतासारख्या देशात हे सहज शक्य आहे की, "लोकशाही प्रदीर्घकाळपर्यंत उपयोगात नसल्यामुळे ती अगदीच नवीन भासण्याची शक्यता आहे. जिथे लोकशाहीने हुकूमशाहीला स्थान देण्याचा धोका आहे. हे सहज शक्य आहे की, नव्यानेच जन्माला आलेली लोकशाही आपले बाह्य स्वरूप सांभाळेल परंतु प्रत्यक्षात ती हुकूमशाहीला स्थान देईल. जर प्रचंड बहुमत असले तर दुसरी शक्यता वास्तवात येण्याचा मोठा धोका आहे."

पुढे ते असे म्हणतात की, केवळ बाह्य स्वरूपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात आली पाहिजे. त्यासाठी जनतेने काय करायला हवे, तर आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संवैधानिक मार्गांचीच कास धरली पाहिजे. कायदेभंग असहकार रक्तरंजित क्रांती हे मार्ग पूर्णतः दूर सारले पाहिजेत. कारण हे मार्ग म्हणजे दुसरे तिसरे काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे.

डॉ. आंबेडकरांनी पुढे एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट नमूद केली आहे. जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा प्रत्येकाने लक्षात ठेवावा, असे ते म्हणतात. त्यांच्या मते लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये. तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये की, जेणेकरून त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उध्वस्त करण्यासाठी उपयोग करील. भारतामध्ये भक्ती आणि विभूती पूजा याचे प्रमाण फार मोठे आहे. अध्यात्माच्या क्षेत्रात आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग म्हणून त्याकडे पाहिले जाऊ शकते. परंतु राजकारणात भक्ती आणि व्यक्ती पूजा ही अधःपतन आणि अंतिमतः हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो." असा धोक्याचा इशारा डॉ. आंबेडकर देतात.

डॉ.आंबेडकरांनी तिसरी महत्त्वाची गोष्ट अशी सांगितली आहे की, राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुद्धा परिवर्तन करायला हवे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या जीवनतत्त्वांचा स्वीकार केला पाहिजे, ही तीनही तत्त्वे परस्परांवर अवलंबून आहेत. भारतीय समाजात सामाजिक आणि आर्थिक विषमता आहे. ही विषमता कायम राहिली किंवा वाढली तर लोकशाही धोक्यात येऊ शकते. म्हणून लवकरात लवकर सामाजिक समता प्रस्थापित करणे हे शासन व्यवस्था व नागरिक यांचे कर्तव्य आहे.

भारतीयांमध्ये बंधुत्वाची समान भावना असणे गरजेचे आहे. कारण अशी भावना निर्माण झाल्याशिवाय भारत एक राष्ट्र होऊ शकत नाही. भारतात असंख्य जाती आहेत आणि जाती–जातींमध्ये द्वेष व तिरस्काराची भावना आहे. जाती या राष्ट्र विरोधी आहेत. जर आपल्याला वास्तवात एक राष्ट्र व्हायचे असेल, तर बंधुत्वाची भावना सगळ्यांच्या मनात रुजली पाहिजे. कारण बंधुत्वाशिवाय समता आणि स्वातंत्र्य अस्तित्वात राहू शकत नाही. हे काम अतिशय कठीण आहे, असे डॉ. आंबेडकर नमूद करतात.

पुढे जाऊन ते असे म्हणतात की, भारतात नेहमी मुठभर लोकांच्या हातात सत्ता राहिली आहे आणि बहुतांश लोक केवळ ओझे वाहणारे प्राणीच झाले आहेत. आता त्यांच्यावर होत असलेल्या हुकूमतीला कंटाळले आहेत. ते स्वतःच राज्य करण्यास आतुर झाले आहेत. पददलीत समाजातील लोकांमध्ये निर्माण झालेल्या या तीव्र आकांक्षा वर्गसंघर्ष आणि वर्गयुद्ध होण्याइतपत वाढू देता कामा नयेत. त्याचा परिणाम घर दुभंगण्यात होईल. त्यांच्या आकांक्षांच्या पुरतीसाठी जेवढ्या लवकर त्यांना संधी उपलब्ध करून देता येईल. तेवढे ते मुठभरांच्या हिताचे देशाच्या हिताचे असणार आहे. आता लोकांचे राज्य असण्यापेक्षा लोकांच्या हिताकरिता राज्य असायला हवे आहे. त्यासाठी प्रयत्न करणे हीच खरी देशसेवा आहे, असेही डॉ. आंबेडकर यांना वाटते.

हे संपूर्ण भाषण म्हणजे भारताच्या भवितव्याविषयी केलेले प्रदीर्घ चिंतन आहे. स्वतंत्र भारताचे व लोकशाहीचे जतन व संवर्धन करण्यासाठी या राजकारणी लोकांनी तसेच देशाच्या नागरिकांनी कोणती काळजी घेतली पाहिजे, याचे स्पष्ट दिशा दिग्दर्शन या भाषणामधून डॉ. आंबेडकर यांनी केले आहे. ते नेमकेपणाने समजून घेणे आजच्या समकाळात महत्त्वाचे ठरेल.

१.५ समारोप (Summary) :

जागतिक कीर्तीचे विचारवंत असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे भाषण म्हणजे विचारांचा अनमोल खजिना आहे. आपले विचार मुद्देसूदपणे व क्रमवार मांडणे हे त्यांच्या व्याख्यान शैलीचे वैशिष्ट्य होते. ते नेहमी अभ्यासपूर्वक व पूर्ण तयारीनिशी बोलत असत. त्यांच्या प्रस्तुत भाषणात पाश्चात्य विचारवंत तसेच भारताचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास यामधील अनेक संदर्भ आलेले दिसतात. त्यामुळे त्यांच्या मांडणीला वजन प्राप्त झालेले आहे. डॉ. आंबेडकरांचा विचार हा नेहमीच तौलनिक स्वरूपाचा असतो व भविष्यवेधी असतो. म्हणूनच त्यांचे प्रस्तुत भाषण ७५ वर्षानंतर देखील संपूर्ण भारतीयांना मार्गदर्शक ठरणारे झाले आहे.

या भाषणामधून डॉ. आंबेडकरांचा प्रखर देशाभिमान, स्वातंत्र्याची उच्च लालसा, राजकीय तसेच सामाजिक लोकशाहीचा आग्रह अशा अनेक गोष्टी दिसतात. त्यांच्या मते कोणतीही तत्त्वप्रणाली देशापेक्षा मोठी असत नाही. प्रदीर्घ स्वातंत्र्यलढा उभारल्यानंतर देशाला मिळालेले स्वातंत्र्य ही अनमोल गोष्ट आहे. देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखणे ही राज्यकर्त्यांची तसेच जनतेची जबाबदारी आहे. हे स्वातंत्र्य कोणत्या ही महान व्यक्तीच्या पायाशी अर्पण करता येणार नाही. त्या सोबतच सामाजिक लोकशाही तितकीच महत्त्वाची आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तीन महान तत्त्वे नागरिकांनी मनःपूर्वक स्वीकारली पाहिजेत व तसे आचरण केले पाहिजे. अन्यथा या देशाचे स्वातंत्र्य व येथील लोकशाही याला धोका संभवू शकतो, असा महत्त्वपूर्ण इशारा त्यांनी दिलेला आहे.

१.६ वाचनीय उतारा (Terms to Remember)

इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय? याच विचाराने मी चिंताग्रस्त झालो आहे. जातींच्या आणि संप्रदायांच्या स्वरूपातील आपल्या जुन्या शत्रुसोबतच भिन्न आणि परस्परविरोधी विचारप्रणाली असणाऱ्या बऱ्याच राजकीय पक्षांचीही भर पडणार आहे. या वास्तवाच्या जाणीवेने मी अधिकच चिंतातूर झालो आहे. भारतीय लोक आपल्या तत्त्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की देशापेक्षा तत्त्वप्रणालीला मोठे मानतील ? मला माहित नाही. परंतु एवढे मात्र

निश्चित की जर पक्षांनी स्वतःच्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवाय राहाणार नाही. आणि कदाचित कायमचे घालविले जाईल. या संभाव्यतेविरुद्ध लढण्यासाठी आपण कटिबद्ध व्हायला हवे. आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण निर्धार केलाच पाहिजे. (हर्षध्वनी)

लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवावा लागेल. त्यांच्या मते, "लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये. तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये की जेणे करुन त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उध्वस्त करण्यासाठी उपयोग करील." संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरूषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत.

राजकारणात भक्ती किंवा व्यक्ती पूजा ही अधःपतन आणि अंतिमतः हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.

सामाजिक लोकशाही म्हणजे काय ? तो एक जीवन मार्ग आहे. जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्त्वे म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या तत्त्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही. ते त्रयीचा एक संघ निर्माण करतात, ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे होय. समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही, समता स्वातंत्र्यापासून वेगळी करता येत नाही, तसेच स्वातंत्र्य आणि समता ही बंधुभावापासून वेगळी करता येत नाहीत. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होयः स्वातंत्र्याशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्वाला मारक ठरेल. बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य आणि समता स्वाभाविकरित्या अस्तित्वात राहाणार नाहीत, त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलीस यंत्रणेची गरज भासेल.

२६ जानेवारी १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारित राहाणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहाणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत ? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहाणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उध्वस्त करतील.

३.७ शब्दार्थ :

हर्षोल्लास = श्रोत्यांनी आनंद व्यक्त करणारे सहमतीदर्शक उद्गार काढणे

निःपात = संपूर्ण पराभव

संप्रदाय = धर्मातील विविध विचार प्रवाह, भक्तीच्या पद्धती

कटिबद्ध असणे = तयार असणे

अनिर्बंध = बंधन रहित

पक्ष प्रतोद = स्वपक्षातील लोकनियुक्त प्रतिनिधींना नियंत्रित करणारा प्रमुख

संवैधानिक = संविधानाने आखून दिलेले

त्रयी = तीन गोष्टींचा संच

वर्गसंघर्ष = (गरीब–श्रीमंत अशाप्रकारच्या) दोन वर्गांतील संघर्ष

वर्गयुद्ध = दोन वर्गांतील युद्ध

१.८ स्वाध्याय :

अ) योग्य पर्याय निवडा.

१. भारतात लोकशाही नांदू या शीर्षकाचे भाषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी कधी केले होते

अ) २५ नोव्हेंबर, १९४९ ब) २६ नोव्हेंबर, १९४९ क) २६ जानेवारी, १९४९ ड) २६ जानेवारी, १९५०

२. महम्मद बीन कासीमने सिंध प्रांतावर आक्रमण केले, त्यावेळी कोणत्या राजाच्या सैनिक अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारली?

अ) जयचंद ब) दहार क) कैकतेय ड) बिंब

३. महंमद घोरीला भारतावर आक्रमण करण्याचे निमंत्रण कोणी दिले होते?

अ) सोळंकी ब) अकबर क) जयचंद ड) बहादूर शाह जफर

४. जेव्हा इंग्रज शीख राज्यकर्त्यांचा निःपात करण्याचा प्रयत्न करीत होते, तेव्हा त्यांचा कोणता सेनापती शांत बसला होता?

अ) कर्तार सिंग ब) सुखविंदर क) शेखावत ड) गुलाब सिंग

५. लोकांनी कोणत्या गोष्टीला देशापेक्षा मोठे मानले तर स्वातंत्र्य धोक्यात येईल, असे डॉ. आंबेडकरांना वाटते?

अ) तत्त्वप्रणाली ब) स्वतःचा पक्ष क) नेता ड) धर्म

६. संसदीय कार्यप्रणालीचे सर्व नियम प्राचीन काळी कोणाला माहीत होते?

अ) राजाला ब) भिक्खू संघ क) जनतेला ड) मुस्लिमांना

७. लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला, तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये, असे कोण म्हणाले होते?

अ) नेपोलियन ब) अब्राहम लिंकन क) डॅनियल ओ कॉनेल ड) जॉन स्टुअर्ट मिल

८. राजकारणातील भक्ती किंवा व्यक्ती पूजा ही अंतिमतः कोठे घेऊन जाते, असे डॉ. आंबेडकर म्हणतात?

अ) हुकूमशाहीकडे ब) उज्ज्वल भवितव्याकडे क) द्वेषाकडे ड) प्रगतीकडे

९. प्रत्येक व्यक्तीला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य, हे तत्त्व कधीपासून लागू होणार होते?

अ) २६ जानेवारी, १९५० ब) २५ जानेवारी, १९५० क) २५ नोव्हेंबर, १९४९ ड) १५ ऑगस्ट, १९४७

१०. हे प्रभू आमच्या राष्ट्राला आशीर्वाद दे, या प्रार्थनेतील कोणता शब्द नंतर बदलण्यात आला?

अ) प्रभू ब) आमच्या क) आशीर्वाद ड) राष्ट्र

११. समाजातील कोणती गोष्ट राष्ट्र विरोधी आहे, असे डॉ. आंबेडकरांना वाटते?

अ) जाती ब) पंथ क) पक्ष ड) धर्म

१२. दुभंगलेले घर अधिक काळ पर्यंत टिकू शकत नाही, असे कोण म्हणाले होते?

अ) नेपोलियन ब) जॉन स्टुअर्ट मिल क) डॅनियल ओ कॉनेल ड) अब्राहम लिंकन

उत्तरे :

१. अ) २५ नोव्हेंबर, १९४९

२. ब) दहार

३. क) जयचंद

४. ड) गुलाब सिंग

५. अ) तत्त्वप्रणाली

६. ब) भिक्खू संघ

७. ड) जॉन स्टुअर्ट मिल

८. अ) हुकूमशाहीकडे

९. अ) २६ जानेवारी, १९५०

१०. ड) राष्ट्र

११. अ) जाती

१२. ड) अब्राहम लिंकन

ब. दीर्घोत्तरी प्रश्न

१. देशाच्या स्वातंत्र्याच्या भवितव्याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोणती चिंता वाटते व त्यावरील कोणता उपाय ते सुचवितात, ते लिहा.

२. राजकीय लोकशाही विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणती भूमिका मांडलेली आहे, ते विशद करा.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोणत्या प्रकारची सामाजिक लोकशाही अभिप्रेत आहे, ते स्पष्ट करा.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषाशैलीचे गुणविशेष सांगा.

१.९ संदर्भ ग्रंथ

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग ३, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासनशासन, २००२.

२.

२. देवराष्ट्र : यशवंतराव चव्हाण

२.१ उद्दिष्टे (Objectives) :

'देवराष्ट्र' हा पाठ अभ्यासल्यानंतर आपणास

१. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मगाव व तेथील परिसर यांचा परिचय होईल.

२. यशवंतराव चव्हाण यांच्यावर बालपणी कोणते संस्कार झाले, ते समजून घेता येईल.

३. खेडेगावातील सामाजिक रचना कशी असते, ते समजेल.

४. यशवंतराव चव्हाण यांच्या लेखनशैलीचे गुणविशेष समजतील.

२.२ प्रास्ताविक (Introduction) :

चरित्रपर लेखनाने गद्य साहित्याचा मोठा प्रांत व्यापलेला आहे. यामध्ये अनुभव व आठवणी, आत्मचरित्रे, इतरांनी लिहिलेली चरित्रे, व्यक्तिचित्रे यांचा समावेश होतो. यशवंतराव चव्हाण यांचे 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र अत्यंत गाजलेले आहे. या पुस्तकांमधून त्यांनी आपल्या बालपणापासून झालेल्या जडणघडणीचा मागवा घेतला आहे. यशवंतराव चव्हाण हे कराड येथे शिक्षणानिमित्त गेले व पुढे तेथेच राहू लागले. कराड येथे कृष्णा व कोयना या नद्यांचा संगम आहे. या संगमावरच यशवंतराव चव्हाण यांची समाधी बांधण्यात आली आहे. त्याला 'प्रीतीसंगम' असे म्हणतात. कृष्णा नदीच्या काठी वसलेल्या कराड शहरात त्यांचे दीर्घकाळ वास्तव्य असल्यामुळे त्यांनी आपल्या आत्मचरित्रास 'कृष्णाकाठ' असे नाव दिलेले आहे.

यशवंतराव चव्हाण यांचे बालपण मात्र देवराष्ट्र (ता. कडेगाव, जि. सांगली) या छोट्या गावी गेले. तिथे त्यांचे चौथीपर्यंतचे शिक्षण झाले. या गावातील अनेक आठवणी त्यांनी प्रस्तुत पाठात मांडलेल्या आहेत. माणूस कितीही मोठा झाला आणि देशविदेशात फिरून आला तरी त्याला मातृभूमीची मोठी ओढ असते. त्याचे मन बालपणी अनुभवलेल्या आपल्या गावाकडे धावते. तेथील निसर्ग, लोकजीवन, सवंगडी व अनुभव यांचे आयुष्यभर स्मरण होते. 'देवराष्ट्र' या पाठामध्ये आपणास याचा प्रत्यय येतो.

२.३ लेखक परिचय

यशवंतराव बळवंतराव चव्हाण (१२ मार्च, १९१३ – २५ नोव्हेंबर, १९८४) संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व राष्ट्रीय नेते. काही काळ भारताचे उपपंतप्रधान व संरक्षणमंत्री. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील बळवंतराव हे बेलीफ म्हणून नोकरी करत होते. १९१७ मध्ये प्लेगच्या साथीत त्यांचे निधन झाले. यशवंतरावांच्या आईचे नाव विठाबाई असे होते. शालेय शिक्षण घेत असताना २६ जानेवारी, १९३२ रोजी शाळेच्या प्रांगणातल्या झाडावर तिरंगा लावल्यामुळे इंग्रजांनी त्यांच्यावर खटला भरला. त्यांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. ते राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथून बी. ए., तर पुणे येथून एल. एल. बी. झाले. यशवंतराव चव्हाण प्रागतिक विचारसरणीचे होते. उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती आहे. ते राजकारणी, रसिक व उत्तम साहित्यिक होते. त्यांच्यावर महात्मा गांधी यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी काँग्रेसच्या माध्यमातून असहकार चळवळीत सहभाग घेतला. त्यांचे कृष्णाकाठ (१९८४) हे आत्मचरित्र प्रसिद्ध

आहे. याशिवाय ऋणानुबंध (१९७५) हा लेखसंग्रह, विचारधारा (१९६०), शिवनेरीच्या नौबती (१९६१), सह्याद्रीचे वारे (१९६२), युगांतर (१९७०) हे भाषणांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांची भूमिका (१९७९), आपले नवे मुंबई राज्य (१९५७), विदेश दर्शन (१९८८), विरंगुळा ही पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांच्या चरित्रावर आधारित 'यशवंतराव चव्हाण – बखर एका वादळाची' (मार्च २०१४) हा जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट प्रदर्शित झालेला आहे.

२.४ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

साहित्यिक यशवंतराव चव्हाण यांच्या 'कृष्णाकाठ' या आत्मकथनांमधून 'देवराष्ट्र' हा गद्य पाठ घेण्यात आलेला आहे. या पाठामध्ये त्यांच्या बालपणीच्या आठवणी चित्रित झाल्या आहेत. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म देवराष्ट्रे येथे झाला. त्या काळात सांगली हा स्वतंत्र जिल्हा नव्हता. सांगली व सातारा मिळून एकच सातारा जिल्हा होता. देवराष्ट्रे हे सागरोबाच्या डोंगर कुशीत वसलेले एक छोटे गाव होते. या गावाच्या आठवणी, तेथील देवदेवता, निसर्ग, सवंगडी, गावाची सामाजिक रचना, तत्कालीन ग्रामीण लोकांची मानसिकता या सगळ्या गोष्टींचे बोलके चित्रण या पाठात आलेले आहे.

देवराष्ट्र : भौगोलिक वर्णन

लेखकाने प्रारंभीच देवराष्ट्र या गावाचे भौगोलिक वर्णन केलेले आहे. तेव्हाच्या सातारा जिल्ह्याच्या टोकावरील डोंगराच्या कुशीत वसलेले ते लहानसे गाव होते. गावाच्या जवळपास अनेक देवळे व लेणी होती. गावाच्या नैऋत्येस महादेवाची पुरातन मंदिरे होती. सर्वात जुने देऊळ समुद्रेश्वराचे होते. त्यालाच लोक सागरोबा म्हणत असत. हे ग्रामदैवत होते. आसपासच्या डोंगरांमध्ये ऋषीमुनींच्या काही गुहा होत्या. सातवाहन राज्याच्या कारकिर्दीनंतर देवराष्ट्र हे छोटे राज्य उदयास आले होते व त्याची राजधानी कौंडण्यपूर म्हणजेच आजचे कुंडल होती, असे लोक म्हणतात. देवराष्ट्रच्या राजाचे नाव कुबेर होते. त्यामुळेच येथे कुबेरेश्वराचे देऊळ आहे, असे म्हटले जात असे.

सागरेश्वराची खिंड ओलांडून पलीकडे खाली गेल्यावर कृष्णेचे खोरे लागते. तेथे पूर्वीपासून सुबत्ता होती. त्यामुळेच तेथील गावांची नावे दही, दूध, तूप यावरून तयार झालेली दह्यारी, तुपारी, ताकारी, दुधारी अशी होती. महाबळेश्वरात उगम पावलेल्या कृष्णा नदीचा काठ लेखकाला फार प्रिय होता. कारण या परिसरातच त्याची जडणघडण झालेली होती. येथील परिसर निसर्गरम्य व शेतीवाडीने समृद्ध होता.

देवराष्ट्र गावाची सामाजिक रचना

लेखक यशवंतराव चव्हाण यांच्या बालपणीच्या चार–पाच वर्षांच्या आठवणी देवराष्ट्र, मोहित्यांचे वडगाव, कुंडल, ताकारी या गावांशी निगडित आहेत. त्यामुळे देश विदेशात फिरूनही त्यांना आपल्या गावाबद्दल, परिसराबद्दल ममत्व आहे. त्या काळात देवराष्ट्र गावची लोकसंख्या अंदाजे दीड–दोन हजार होती. गावात पाटलांची दोन घरे होती. तर मराठ्यांची वीस पंचवीस घरे होती. धनगरांची दहा–पंधरा घरे होती. तसेच मुसलमान आणि रामोशी यांचीही मोठी वस्ती होती. काही लिंगायत व दोन–तीन गुजराती कुटुंबे होती. गावात पाच–दहा मंदिरे होती. तशाच एक दोन मशिदी होत्या. बेरेचसे लोक शेती व शेतीपूरक उद्योग करीत होते. गावात रामोशी समाज संख्येने मोठा होता व त्यांचा दबदबा होता. त्यांचा निश्चित कामधंदा नव्हता. ते कधी शेतात तर कधी मिळेल त्या कामात रोजंदारी करत असत. गावात एक–दोन घरेच अत्यंत व्यवस्थित बांधलेली होती. बाकी इतर घरे म्हणजे दगडावर दगड रचून उभ्या केलेल्या कमी उंचीच्या भिंती अशीच होती. गावात सुस्थितीत असणारी दहा–पंधरा ब्राह्मण कुटुंबे होती. त्यांची मुले बाळे शिक्षणासाठी परगावी जात. त्यांना गावात आदर होता, परंतु गावापासून थोडे अंतर राखून असणारा हा समाज होता. एकंदर अनेक वेगवेगळ्या स्तरांवरचे जीवन जगत असणारा वेगवेगळ्या संस्कृतीच्या पाकळ्या असणारा छोटा समाज या गावांमध्ये नांदत होता.

गावाकडील माणसे

लेखक यशवंतराव चव्हाण यांनी गावाकडील काही माणसांचे वर्णन केले आहे. त्यामध्ये बाबू तेली हे एक मोठे नमुनेदार व्यक्तिमत्त्व होते. पन्नाशीच्या घरात असलेला बाबू तेली तेलाचा घाणा चालवत असे. यशवंतरावांच्या घराशी त्याचे चांगले स्नेहसंबंध असल्यामुळे तो लहान यशवंतरावाला मोठ्या प्रेमाने वागवत असे. त्याला शेंगा खायला देत असे. विनोदी मजेदार बोलणे बोलून त्याचे मन जिंकत असे. त्या तेलाच्या घाण्यावर बसून गोल गोल फिरण्यात लेखकाने बराच काळ व्यतीत केला होता.

याशिवाय गावातील दुसरी व्यक्ती म्हणजे सखाराम मस्के होय. ते यशवंतरावाला नेहमी काही प्रश्न विचारीत असत. त्यांना वाटे यशवंताने मामलेदार होण्याइतके शिक्षण घ्यावे. त्यानंतर विटा येथे बदली करून घ्यावी. मग गावाकडे देवराष्ट्राला भेट देण्यासाठी यावे आणि गावातील सगळी माणसे जमलेली असताना मामलेदार झालेल्या यशवंतरावांनी नाव घेऊन त्यांना हाक मारावी. जवळ बोलवून घ्यावे. त्यामुळे स्वतःची इज्जत व पत वाढेल असे त्यांना वाटत होते. परंतु यशवंतराव पुढे राजकारणात गेले. मंत्री झाले. मात्र ते मामलेदार झाले नाहीत. याचे सखाराम म्हस्के यांना थोडे वाईटच वाटले. अशा प्रकारच्या दोन महत्त्वाच्या व्यक्तिरेखा यशवंतराव चव्हाण यांनी चित्रित केल्या आहेत.

जीवावर बेतलेले संकट

यशवंतराव कराड येथे असताना कोयना नदीस पोहण्यासाठी जात असत. परंतु अन्यत्र पोहण्याचा त्यांना सराव नव्हता. एकदा रामोशी आळीतील काही सवंगड्यांसोबत यशवंतराव करवंदे काढण्यासाठी डोंगरावर गेले होते. तेथे त्यांना हे लक्षात आले की आपण शहरी होत चाललो आहोत. आपल्यावरील संस्कार शहरी संस्कृतीचे आहे.

एकदा सोनहिरा ओढ्याला अनपेक्षितपणे ज्यादा पाणी आले. मुले त्या पाण्यात पोहत होती. यशवंतरावांना देखील असे वाटले की आपण कोयना नदीत पोहतो, त्यामुळे येथे आपल्याला पोहणे सहज शक्य होईल. परंतु पात्राच्या मध्यापर्यंत गेल्यानंतर यशवंतराव गटांगळ्या खाऊ लागले. बुडून जाणार या कल्पनेने त्यांचा धीर खचला. त्याने ओरडून काठावरील मित्रांना वाचविण्यासाठी हाक मारली. मग दोन-तीन मुलांनी त्याला धरून किनाऱ्यावर आणले. अशाप्रकारे गावाकडील मुले असल्यामुळे यशवंतरावांचा जीव वाचला. जणू त्यांचा पुनर्जन्म झाला. कृष्णा कोयनेपेक्षा सोनहिऱ्याच्या पाण्याला जास्त ओढ होती, असे त्यांच्या लक्षात आले.

एकंदर यशवंतराव चव्हाण यांनी गावाचे भौगोलिक वर्णन, सामाजिक वर्णन, सवंगडी व वैशिष्ट्यपूर्ण माणसे यांचे शब्दचित्र येथे रेखाटले आहे.

२.५ समारोप (Summary) :

यशवंतराव चव्हाण हे सहज सोप्या शैलीत भूतकाळातील आठवणी रेखाटत आहेत. आपले गाव , तेथील निसर्ग, शेती, जनजीवन, मंदिरे व मशिदी, खेळ गडी आणि वैशिष्ट्यपूर्ण माणसे या सगळ्याचे चित्र 'देवराष्ट्र' पाठात येते. जरी पुढे यशवंतराव चव्हाण उपपंतप्रधान झाले असले, तरी त्यांचे मन गावाकडेच रमते. गावातील अनेक आठवणी त्यांच्या नजरेसमोर उभ्या राहतात. त्यातील मोजक्याच आठवणींना व व्यक्तींना त्यांनी येथे शब्दबद्ध केलेले आहे. स्वतःच्या जन्मभूमीबद्दल व तेथील ग्राम संस्कृती बद्दल त्यांना असणारे प्रेम येथे दिसून येते. गावात अनेक जाती असल्या तरी त्या परस्परांवर अवलंबून होत्या. मुस्लीम समुदाय देखील गावाचा अविभाज्य घटक होता. तो व्यापार व्यवसायात होता. या सगळ्याचे चित्रण यशवंतराव प्रस्तुत पाठात करतात.

२.६ वाचनीय उतारा (Terms to Remember)

संपूर्ण कृष्णाकाठ हा माझ्या प्रेमाचा, आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. महाबळेश्वरात उगमापासून निघावे आणि कृष्णामाईच्या काठाकाठाने थेट राजमहेंद्रीपासून तिच्या मुखापर्यंत जावे, असे मला नेहमी वाटते. बदलत्या पात्राची भव्यता पाहावी, निसर्गाचे सुंदरपण मनात साठवावे, तीरावरच्या गावांना भेटी द्याव्यात, लोकांच्या ओळखी करून घ्याव्यात, पिकांनी डोलणारी शेते पाहावीत, असे अजूनही मनात येते. देवराष्ट्र हे माझे जन्मगाव आणि आजोळ असल्यामुळे माझ्या अगदी लहानपणच्या आठवणी ह्या देवराष्ट्रच्या आठवणी आहेत.

माझ्या जीवनातल्या पहिल्या पाच–चार वर्षांच्या ज्या आठवणी आहेत, त्या देवराष्ट्र, वडगाव, कुंडल, ताकारी या गावांशी निगडित आहेत. ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी हा माझ्या जीवनाचा श्रीगणेशा आहे. पुढे मी राजकीय कामानिमित्त आणि सरकारी कामासाठी देशांतर्गत आणि सर्व जगातही खूप फिरलो, तरी पण या परिसराची ओढ माझ्या मनात कायमची राहिली आहे. असे का होते, ते मला माहिती नाही; पण वस्तुस्थिती ही अशी आहे

रामोशी गल्लीतील काही मुलांच्याबरोबर देवराष्ट्रच्या माळावर केलेल्या उनाडक्या मला आजही आठवतात. एके दिवशी दुपारनंतर देवराष्ट्रपासून दोन मैलांवर असलेल्या डोंगरावर करवंदे खाण्याकरिता म्हणून चार–सहा मुलांची टोळी गेली होती. त्या मुलांचा डोंगर चढण्याचा सराव व करवंदे काढण्याची कुशलता पाहून मी काहीसा शहरी झालो आहे, याची जाणीव वयाच्या आठव्या– दहाव्या वर्षी झाली. पण मला करवंदांपेक्षाही या मुलांच्या संगतीत एक वेगळीच चव आली होती. मी कराडसारख्या मोठ्या गावातून सुट्टीसाठी तेथे येत असल्यामुळे मला ते थोडे अदबीने आणि प्रेमाने वागवीत असत. ते ज्या गोष्टी करू शकतात, त्या करण्यात आपण मागे नाही, हे दाखवण्याचा माझा प्रयत्न असे. पण तो नेहमीच यशस्वी होत नसे.

२.७ शब्दार्थ :

अवशेष = जुने वाडे, मंदिरे यांचे भग्न स्वरूपात असणारे अस्तित्व

लेणी = बौद्ध, जैन लोकांनी डोंगरात अध्ययन व ध्यानधारणा करिता करून निर्माण केलेल्या जागा व शिल्पे

श्रीगणेशा = प्रारंभ

उदीम = उद्योग

लिंगायत = श्री बसवेश्वरांनी सांगितलेला संप्रदाय मानणारे लोक

मामलेदार = तहसीलदार

२.८ स्वाध्याय :

अ) योग्य पर्याय निवडा.

१. देवराष्ट्र गावाच्या नैऋत्येस असणारे सर्वात जुने देऊळ कोणत्या देवाचे आहे?

अ. समुद्रेश्वर ब. कपिलेश्वर क. माणकेश्वर ड. वेताळेश्वर

२. समुद्रेश्वर मंदिराला देवराष्ट्रे परिसरातील लोक कोणत्या नावाने ओळखतात?

अ. म्हसोबा ब. सागरोबा क. मानकोबा ड. ज्योतिबा

३. प्राचीन काळातील देवराष्ट्र राज्याची राजधानी कोणती होती?

अ. पलूस ब. देवराष्ट्रे क. कौडिण्यपूर ड. रामानंद नगर

४. जुन्या काळातील कौंडण्यपूर हे गाव आज कोणत्या नावाने ओळखले जाते?

अ. ताकारी ब. तुपारी क. दह्यारी ड. कुंडल

५. सागरेश्वराची खिंड ओलांडून खाली गेल्यावर कोणत्या नदीचे खोरे लागते?

अ. कृष्णा ब. कोयना क. पंचगंगा ड. इंद्रायणी

६. कृष्णा नदी कोठे उगम पावते?

अ. हिमालय ब. महाबळेश्वर क. कराड ड.

क्षेत्र माहुली

७. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मगाव आणि आजोळ कोणते?

अ. कराड ब. भाळवणी क. देवराष्ट्र ड. कुंडल

८. लहानपणी यशवंतरावांना कोणाच्या घरी जायला आवडत असे?

अ. मामाच्या ब. मावशीच्या क. आत्याच्या ड. बाबू तेली

९. बाबू तेली कोणता व्यवसाय करीत असत?

अ. लाकडी घाण्याने तेल गाळणे ब. शेती क. व्यापार ड. व्यापार

१०. यशवंतरावांना स्वतःचा पुनर्जन्म कुठे झाला असे वाटते?

अ. पंचगंगा ब. सोनहिरा क. कृष्णा ड. कुंडल

११. यशवंतरावांना 'मोठा शिकून मामलेदार हो' असे कोण म्हणाले?

अ. गंगाराम कांबळे ब. आबालाल रहेमान क. सखाराम म्हस्के ड. कुंडल

१२. आमचा सोनहिरा कृष्णा कोयनेपेक्षा जबरदस्त आहे हे लक्षात आलं का? असे उद्गार कोणी काढले?

अ. शिक्षकांनी ब. सहकाऱ्यांनी क. वडिलांनी ड. यशवंतरावांना वाचवणाऱ्या मुलांनी

उत्तरे :

१. अ. समुद्रेश्वराचे

२. ब. सागरोबा

३. क. कौडिण्यपूर

४. ड. कुंडल

५. अ. कृष्णा

६. ब. महाबळेश्वर

७. क. देवराष्ट्र

८. ड. बाबू तेली

९. अ. लाकडी घाण्याने तेल गाळणे

१०. ब. सोनहिरा

११. क. सखाराम म्हस्के

१२. ड. यशवंतरावांना वाचवणाऱ्या मुलांनी

ब. दीर्घोत्तरी प्रश्न

१. यशवंतराव चव्हाण यांनी देवराष्ट्र गावाची भौगोलिक रचना व तेथील दैवते यांचे वर्णन कसे केले आहे, ते विशद करा.

२. यशवंतराव चव्हाण यांनी बाबू तेली व सखाराम म्हस्के यांच्या विषयी व्यक्त केलेल्या भावना स्पष्ट करा.

३. यशवंतराव चव्हाण यांचे बालपणीच्या सवंगड्यांसोबतचे अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.

४. यशवंतराव चव्हाण यांच्या लेखनशैलीचे गुणविशेष स्पष्ट करा.

२.९ संदर्भ ग्रंथ

१. कृष्णाकाठ – यशवंतराव चव्हाण, रोहन प्रकाशन, पुणे, २०१२

२. कृष्णाकाठचा माणूस – अरुण शेवते, ऋतुरंग प्रकाशन, मुंबई. १९९८

३. यशवंतराव चव्हाण, व्यक्तित्व व कर्तृत्त्व – गोविंद तळवलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई

४. यशवंतराव चव्हाण : व्यक्ती व कार्य – कृ.भा. बाबर, ठोकळ प्रकाशन, पुणे १९६०

५. यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक – डॉ. प्रकाश दुकळे , ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

३. तपस्वी आबालाल रहिमान – माधवराव बागल

३.१ उद्दिष्टे (Objectives) :

'तपस्वी आबालाल रहिमान' हा पाठ अभ्यासल्यानंतर आपणास

१. चित्रकार आबालाल रहिमान यांच्या जीवनकार्याचा परिचय होईल

२. कलावंताची कलासाधना कशी असते ते तुम्हास उलघडेल

३. राजर्षी शाहू महाराजांच्या काळातील कोल्हापूर मधील कलासंस्कृतीची जाणीव होईल

४. भाई माधवराव बागल या लेखकाचा परिचय होईल

५. एका चित्रकाराने दुसऱ्या चित्रकाराविषयी व्यक्त केलेला आदरभाव स्पष्ट होईल

३.२ प्रास्ताविक (Introduction) :

व्यक्तिचित्रे हा गद्य वाङ्मय प्रकार आहे. मराठीत अनेक लेखकांनी सुंदर व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. त्यामध्ये वि. स. खांडेकर, रणजीत देसाई, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, प्र. के. अत्रे, जयवंत दळवी यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. व्यक्तिचित्र म्हणजे त्या व्यक्तीची संपूर्ण जीवन कहाणी नसते, तर व्यक्तीच्या जीवनातील काही पैलूंचे दर्शन घडविलेले असते. जीवनशैली, राहणीमान, वेशभूषा, बोलण्याची विशिष्ट ढब, विचार करण्याची पद्धती, त्या व्यक्तीची विशेषत्वाने उठून दिसणारे गुणवैशिष्ट्ये, व्यक्तीचे वेगळेपण आणि महत्त्व या सगळ्यांचे दर्शन व्यक्तिचित्रांमधून घडविले जाते. ज्या पद्धतीने सुप्रसिद्ध व प्रभावी माणसांची व्यक्तिचित्रे असतात, तशीच सामान्य माणसांची देखील व्यक्तिचित्रे असतात. मोठ्या माणसांची व्यक्तिचित्रे वाचल्यानंतर आपल्याला त्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्यपूर्णतेचा परिचय घडतो, तर सामान्य माणसांची व्यक्तिचित्रे वाचताना जीवनदर्शन घडते.

भाई माधवराव बागल हे व्यक्तिचित्रकार म्हणून देखील प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'बहुजन समाजाचे शिल्पकार' (१९६६), या पुस्तकांमधून महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार केशवराव ठाकरे या महान व्यक्तिमत्त्वांचा परिचय घडतो. याशिवाय त्यांनी स्वतःची पत्नी सौ. रमाबाई, स्वातंत्र्यसैनिक व संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. पी. नाईक, साहित्यिक वि. स. खांडेकर, विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्यिक आचार्य अत्रे अशा अनेक मोठ्या माणसांची व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. ते सिद्धहस्त लेखक होते. त्यांची लेखनशैली प्रवाही व ललितरम्य होती. त्यांच्या लेखनात वीर, अद्भुत व करूण रसांचा परिपोष झालेला आढळतो.

भाई माधवराव बागल हे स्वतः उत्तम चित्रकार होते. त्यांनी 'तपस्वी आबालाल रहिमान' या लेखामध्ये कोल्हापुरातील एका ऋषितुल्य चित्रकाराचे व्यक्तिचित्र साकारले आहे. त्यांचा हा लेख यापूर्वी 'कला आणि कलावंत' या पुस्तकामध्ये प्रकाशित झालेला होता. मराठी अभ्यास मंडळांने 'भाई माधवराव बागल निवडक लेखसंग्रह'(१९९८) या पुस्तकातून प्रस्तुत लेख घेतला आहे.

३.३ लेखक परिचय

भाई माधवराव बागल (जन्म: २८ मे, १८९६ – मृत्यू ६ मार्च, १९८६) प्रसिद्ध लेखक, चित्रकार, समाजसुधारक, स्वातंत्र्यसैनिक. भाई माधवराव बागल यांची कोल्हापूर ही जन्मभूमी तसेच कर्मभूमी होती. त्यांचे प्रारंभिक शिक्षण राजाराम हायस्कूल, कोल्हापूर येथे झाले. पुढे त्यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टस, मुंबई येथून चित्रकला, मॉडेलिंग व भित्तिचित्र सजावट अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांना हे शिक्षण घेण्यास राजर्षी शाहू महाराजांकडून शिष्यवृत्ती मिळाली होती. त्यांचे वडील खंडेराव बागल हे सत्यशोधक समाजाचे कट्टर कार्यकर्ते होते. तसेच 'हंटर' या वृत्तपत्राचे संपादक होते. वडिलांचा मोठा प्रभाव माधवराव बागल यांच्यावर होता. ते लढाऊ वृत्तीचे सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांना लोक प्रेमाने भाई असे म्हणत असत. त्यांनी अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. ते म. फुले व डॉ. आंबेडकर यांना आदर्श मानत असत. डॉ. आंबेडकर हयात असताना त्यांचा पहिला पुतळा कोल्हापूरच्या बिंदू चौकात दि. ९ डिसेंबर, १९५० रोजी उभारला. ते भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात लढणारे स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांनी १९३९ मध्ये कोल्हापूरात प्रजापरिषदेची स्थापना केली. त्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रबोधन करून अन्यायी महसूलाविरुद्ध लढा उभारला.

चित्रकार म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी चित्रशैली निर्माण केली. कमीत कमी रंगांचा वापर करून छाया–प्रकाशाचा सुंदर सुरेख ताळमेळ साधून त्यांनी चित्रे रेखाटली. तसेच कोल्हापूरातील कला व कलावंत यांच्याबद्दल माहिती देणारी 'आर्टिस्ट ऑफ कोल्हापूर' आणि 'आर्ट ॲण्ड आर्टिस्ट' ही दोन पुस्तके लिहिली. लेखक म्हणून त्यांनी ३०–३५ पुस्तकांची निर्मिती केली. त्यांपैकी कलाविहार (१९६६), बहुजन समाजाचे शिल्पकार (१९६६), सिंहावलोकन (१९७०), नास्तिक व्हा ( ) ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांनी काही कथा देखील लिहिल्या होत्या. त्यांचे 'जिव्हाळा', 'संसार', 'जुलूम', 'अशी होती संस्थानी राजवट' हे चार कथासंग्रह प्रकाशित झाले होते.

३.४ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

गद्य साहित्यात चरित्रात्मक लेखन असा स्वतंत्र विभाग केला जातो. त्यामध्ये चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथने, व्यक्तिचित्रे, अनुभव व आठवणी, मृत्युलेख (व्यक्तीच्या मृत्यूनंतर लिहिण्यात आलेला अग्रलेख) यांचा समावेश होतो. व्यक्तिचित्रे ही आकाराने छोटी असतात. संक्षेपाने लिहिलेली असतात. व्यक्तिचित्रांमध्ये मोजक्याच घटना प्रसंगांच्या माध्यमातून विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून दिलेला असतो. व्यक्तीचे स्वभाव विशेष, राहणीमान, बाह्यदर्शन यांचे वर्णन केलेले असते.

भाई माधवराव बागल यांनी अनेक असामान्य व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. मुळात ते चित्रकार होते. त्यामुळे सभोवतालची दृश्ये अत्यंत बारकाईने पाहणे, ती स्मरणात ठेवणे आणि त्याचे तपशीलवार रेखाटन करणे त्यांना साधले होते. 'जे जे स्कूल ऑफ आर्ट्स' मध्ये कलेचे औपचारिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना कलाकार म्हणूनच स्थिरस्थावर व्हायचे होते. परंतु एकदा गांधीजी कोल्हापूरच्या दौऱ्यावर असताना माधवरावांच्या वडिलांनी गांधीजींना मुलाचा परिचय करून दिला व 'हा चित्रकार आहे', असे सांगितले. तेव्हा गांधीजी उद्गारले, "अशी चित्रे काढा की ज्यामुळे जनसेवा घडेल." गांधीजींचे हे बोल माधवराव बागल यांच्या अंत:करणात रुजले. नंतर त्यांनी 'हंटर' साप्ताहिकात अनेक लेख लिहिले. शब्दचित्रे लिहिली. ज्या पद्धतीने चित्रकार कुंचल्याच्या माध्यमातून व्यक्तींचे चित्र

साकार करतो, त्याच पद्धतीने लेखक शब्दांच्या माध्यमातून व्यक्तिचित्र रेखाटतो. माधवराव बागल यांच्या व्यक्तिचित्रामध्ये सामान्य दृश्यांचेही सौंदर्यपूर्ण वर्णन आलेले दिसते

चित्रमहर्षी आबालाल रहिमान हे कोल्हापुरातील अव्वल दर्जाचे चित्रकार होते. त्यांच्याबद्दल मराठी विश्वकोशात देण्यात आलेली माहिती खालील प्रमाणे आहे :

आबालाल रहिमान : (जन्म १८५६ ते १८६० दरम्यान – मृत्यू २८ डिसेंबर १९३१). महाराष्ट्रातील ⇨ आधुनिक चित्रकलेच्या कलापरंपरेतील एक श्रेष्ठ चित्रकार. संपूर्ण नाव अब्दुल अजीज रहिमान; परंतु 'आबालाल' या नावाने अधिक परिचित. त्यांच्या जन्माची निश्चित तारीख व सन ज्ञात नाही. कोल्हापूरमध्ये पारंपरिक मुस्लिम घराण्यात त्यांचा जन्म झाला. वडील अब्दुल रहिमान बाबाजी हे कोल्हापूर संस्थानात कारकून होते. ते शेती करीत. कुराणाच्या हस्तलिखित प्रतीही ते तयार करीत असत. त्यांतील प्रत्येक पानाभोवतीचे नक्षीकाम वडिलांबरोबर आबालालही करीत असत. त्यांच्या घराजवळ असलेल्या जिनगर कारागिरांची सोन्या-चांदीवरील कलाकुसर त्यांच्या पाहण्यात येत असे. त्यामुळे कौशल्य आणि कारागिरीचे संस्कार आबालाल यांच्यावर नकळत झाले. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापुरातील राजाराम सोन्या-चांदीवरील कलाकुसर त्यांच्या पाहण्यात येत असे. त्यामुळे कौशल्य आणि कारागिरीचे संस्कार आबालाल यांच्यावर नकळत झाले. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापुरातील राजाराम हायस्कूलमध्ये सहाव्या इयत्तेपर्यंत (सध्याच्या दहावीपर्यंत) झाले. त्यांना मराठी, संस्कृत, अरबी व इंग्रजी या भाषा अवगत होत्या. एकदा ब्रिटिश रेसिडेन्टच्या पत्नीने आबालाल यांची चित्रे पाहिली आणि त्यांच्यातील कलागुण ओळखून आबालाल यांनी ⇨ सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये रीतसर कलाशिक्षण घ्यावे, म्हणून त्यांच्या आई-वडिलांना प्रोत्साहित केले.

आबालाल यांनी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये १८८०-८८ दरम्यान शिक्षण घेतले. तेथे शिक्षण घेणारे ते कोल्हापूरचे पहिले विद्यार्थी होत. रीजन्सी काउन्सिल व ⇨ छ. शाहू महाराज यांच्याकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमधून त्यांच्या शिक्षणाची आर्थिक तरतूद झाली. त्या वेळी जॉन ग्रिफिथ्स हे प्राचार्य होते. आबालाल यांचा अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून नावलौकिक होता. त्यांच्या चित्रांच्या एका संचासाठी १८८८ मध्ये त्यांना व्हाइसरॉय सुवर्णपदक मिळाले. विद्यार्थिदशेतील त्यांची काही व्यक्तिचित्रे जे. जे. च्या संग्रहात आहेत. या चित्रांतून त्यांचे चित्रकलेवरील प्रभुत्व लक्षात येते.

त्यांचे रेखाचित्रे या प्रकारावर इतके प्रभुत्व होते की युरोपियन चित्रकार आश्चर्याने थक्क होत असत. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते कोल्हापूरला परत आले. दरम्यान त्यांच्या आईचे निधन झाले होते. त्यांना आवडणाऱ्या मुलीशी त्यांचे लग्न होऊ शकले नाही. त्यामुळे आबालाल आयुष्यभर अविवाहित राहिले. त्यांनी चित्रकलेमध्ये असंख्य प्रयोग केले.

पुढे छ. शाहू महाराजांनी त्यांची दरबारी चित्रकार म्हणून नियुक्ती केली (१८९७). शिवाय त्यांची टेक्निकल स्कूलमध्ये कलाशिक्षक म्हणूनही नेमणूक केली. त्यांचा पगार दरमहा पंचवीस रुपये इतका होता. टेक्निकल स्कूलमधील मुले सरदार घराण्यांतील होती. त्यांना आबालाल यांचा अभ्यासक्रम व शिस्त डाचू लागली. परिणामतः त्यांची मास्तरकी बंद झाली; पण पगाराचे २५ रुपये आयुष्यभर देण्याची आज्ञा छ. शाहू महाराजांनी केली. तेव्हापासून 'आबालाल मास्तर' म्हणूनही ते ओळखले जाऊ लागले.

त्यांनी हजारो चित्रे काढली असली, तरी त्यामधील मोजकीच चित्रे आज उपलब्ध आहेत. रंकाळा, संध्यामठ, कोल्हापुरातील वास्तू, उंट-घोडे असे प्राणी, ऐतिहासिक-पौराणिक प्रसंग आणि राजघराण्यातील व्यक्ती यांची अनेक चित्रे त्यांनी रेखाटली. राजर्षी शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर 'कलेचा चाहता राजा हरपला', या भावनेने ते इतके दुःखी झाले की त्यांनी स्वतःची अनेक चित्रे रंकाळ्याच्या पाण्यात सोडून दिली.

अशा या महान चित्रकाराचे वेगळेच दर्शन भाई माधवराव बागल यांनी आपल्या व्यक्तिचित्राच्या माध्यमातून करून दिले आहे. प्रस्तुत व्यक्तिचित्र म्हणजे व्यक्तिचित्र लेखनाचा अभिजात नमुना आहे. व्यक्तिचित्राच्या पहिल्या भागात आबालाल रहिमान यांच्या रंगसाहित्य आणि चित्रे अस्ताव्यस्त पडलेल्या छोट्याशा खोलीचे वर्णन येते. त्यानंतर पंचगंगेच्या घाटावर एका देवळाजवळ चित्र काढण्यात तल्लीन झालेल्या मनस्वी चित्रकाराचे अत्यंत सुरेख वर्णन येते. त्यानंतर अबालाल रहिमान या कलंदर कलावंताचा परिचय आलेला दिसतो. त्यानंतर या महान चित्रकाराच्या मनाचा मोठेपणा दर्शवणारा एक अनुभवाचा तुकडा बागल यांनी शब्दबद्ध केलेला दिसतो. तर लेखाच्या समारोपामध्ये आबालाल रहिमान यांच्या अंत्यकाळाचे वर्णन आलेले दिसते. आबालाल रहिमान यांनी मृत्यूच्या आदल्या दिवशी स्वतःचे व्यक्तिचित्र (सेल्फ पोर्ट्रेट) चित्रित केले होते. त्यांची ही कलासाधना रसिकांना थक्क करून सोडणारी होती.

प्रस्तुत व्यक्तिचित्रामधून माधवराव बागल यांचे लेखनसामर्थ्य दिसून येते. शब्दांच्या माध्यमातून दृश्य साक्षात नजरेसमोर उभे करण्याची चित्रमय शैली त्यांना साधली आहे. आबालाल रहिमान यांचे राहते घर म्हणजे एक छोटीशी खोली होती. या खोलीमध्ये

अनेक प्रकारचे रंग, खडू, ब्रश, पुस्तके, वाट्या, चित्राच्या मोडक्या फ्रेम, अपूर्ण किंवा पूर्ण असलेली चित्रे, असा पसारा अस्ताव्यस्त पडलेला असे. तिथेच त्यांची झोपण्याची एक साधी गादी होती. क्वचितच कुणीतरी तेथे जात असे. या खोलीचे वर्णन लेखकाने अतिशय सौंदर्यपूर्णरित्या केलेले दिसते. उदाहरणार्थ,

भिंतीवर तीन चार उत्कृष्ट चित्रे आपल्याला कोणी चाहते नाहीत म्हणून हिरमुसली झाली होती. एकाची काच फुटली होती, तर दुसऱ्याची फ्रेम मोडली होती. एक तर दोन्ही बंधनातून मुक्त होऊन एका मोकळ्या आधारावर जीव कंठीत होते.

जमिनीवर काही पुस्तके, पेले, वाट्या व ब्रश पडले होते. स्वच्छता म्हणजे नखरा असे समजून त्यांनी मुद्दाम तिकडे दुर्लक्ष केले होते.

हे ठिकाण म्हणजे एका चित्रकाराची राजधानी, अशा शब्दांत बागल यांनी वर्णन केले आहे. पुढे हा चित्रकार आपल्याला पंचगंगा नदीच्या घाटावर एका देवळाच्या आड बसून तल्लीन होऊन चित्र रेखाटताना दिसतो. ती तल्लीनता, ती दृश्याशी झालेली एकरूपता याचे वर्णन लेखकाने अतिशय नेमक्या शब्दात केले आहे. खरे तर कलावंत जेव्हा कला निर्मितीत दंग असतो, तेव्हा त्याला भावतंद्रा असे म्हणतात. तो जणू रंगरेषांच्या माध्यमातून प्रतिसृष्टी निर्माण करत असतो. त्यामुळे आपल्या आजूबाजूला काय चालले आहे, याकडे त्यांचे फारसे लक्ष नसते? याचे वर्णन करताना माधवराव बागल लिहितात,

ती पहा, तीच ती व्यक्ती पंचगंगेच्या घाटावर एका देवळाच्या आड बसली आहे.

कोण महात्मा तरी नसेल?

वेष बावळटच होता. दाढी वाढलेली होती. कपडे दरवेशाचे होते, कफनी काही, नव्हती पण होते ते फाटके तुटकेच होते आणि मळकट !

स्वारी कामात गुंग होती !

मागे पोरांचा घोळका जमला होता. पण त्याचे त्यांना भानही नव्हते. साधूमहाराज तल्लीन झाले होते. तल्लीन पण डोळे मिटले नव्हते. डोळे उघडेच होते. पण पाहण्यांत व विचारांत गुंग !

डोळे उघडे, पण ध्यानस्थ !

सृष्टीशी तादात्म्य झाले होते. समोरचा देखावा आणि हाताखालचा कागद, एवढ्यात त्यांची सृष्टी एकवटली होती.

डोळे आणि हात एवढींच जणू त्या व्यक्तीची अवयवे !

समोरचे पहावे आणि खाली कागदावर उतरावे. कोण घाई ! कोण जिवाची धडपड ! आकाशात जरा बदल झाला की हातचे पारध सुटल्यासारखे वाटावे !

हातात कागद तरी केवढा ? तीन इंच रुंद, पांच इंच लांब असेल फार तर ! पण त्या विश्वकर्त्याने पुढील दिसणारी सर्व सृष्टी त्या तेवढ्या कागदावर कशी खेचून आणली होती !

चित्र पुरे होत चालले होते.

महान चित्रकार स्वतःच्या कामात इतका हरवून जातो, की त्याला स्थळ काळ वेळ याचे भानच राहत नाही. त्याची कला ही एकाच वेळी गुरे राखणारी मुले आणि मोटार गाडीतून आलेला श्रीमंत माणूस यांना आनंद देत राहते. कला ही सुशिक्षतांना तशीच अशिक्षितांनाही आनंद देत राहते. श्रीमंत माणूस ते चित्र विकत घेण्याची इच्छा व्यक्त करतो. परंतु आबालाल रहिमान ते पैसे नाकारतात. मला फकिराला पैसा घेऊन काय करायचा? असे म्हणतात. खरे तर घरी अत्यंत गरिबी, उपासमारी असते. तरीही आपली कला चार

पैशांसाठी विकणे हे त्यांच्या स्वभावात नसते. म्हणूनच माधवराव बागल यांनी असे म्हटले आहे की, उत्कृष्ट काव्य, उत्कृष्ट चित्र यांची पैशाने किंमत कशी करता येणार? त्याला ते लाखाच्या मोलाचे असते.

लेखकाने आबालाल रहिमान यांच्या विषयी असे म्हटले आहे की, त्यांनी कधीच स्वतःच्या कलेला चरीतार्थाचे साधन बनविले नाही. कोल्हापुरातील अनेकांनी प्रेमाची पाखर घालून त्यांच्याकडून सुंदर चित्रे मिळविली. परंतु पैसे देऊन त्यांच्याकडून एखादे चित्र घ्यायचे म्हटले तर ते शक्य होत नसे. आबालाल मास्तर हे अखेरपर्यंत विद्यार्थीच राहिले. निसर्गाकडे ते नेहमी संशोधकाप्रमाणे पाहत असत. त्यांची चित्रे एकसाची नव्हती. प्रत्येक चित्रामध्ये ते विविध प्रयोग करून पहात असत. चित्राची आऊटलाईन रेखाटण्यात त्यांचा हात धरणारा दुसरा क्वचितच कोणी सापडेल, असे लेखकाला वाटते. आबालाल रहिमान यांना स्वतःच्या मोठेपणाचा गर्व किंवा अभिमान नव्हता. दुसऱ्याच्या कलेचे कौतुक करण्याचा मनाचा मोठेपणा व उमदेपणा त्यांच्याजवळ होता. माधवराव बागल हे त्यांच्यापेक्षा कितीतरी लहान होते. तेही चित्रे काढत असत. एकदा त्यांनी स्वतःची काही चित्रे आबालाल यांना दाखवण्यासाठी नेली. तेव्हा त्यातील दोन चित्रे त्यांनी बाजूस काढून ठेवली आणि ते माधवरावांना म्हणाले, "ही कामे माझ्याकडे असू देत. मी त्यांची कॉपी करावी म्हणतो. फार सुंदर आहेत कामे ही." इतक्या ज्येष्ठ चित्रकाराने अशा पद्धतीने आपल्या चित्रांची तारीफ करावी, याचे लेखकाला आश्चर्य वाटले आणि त्यांच्याबद्दलचा आदर दुणावला.

आबालाल रहिमान यांच्या मृत्यूपूर्वी झालेल्या शेवटच्या भेटीचे वर्णन लेखाच्या शेवटी माधवराव बागल यांनी केले आहे. लेखक सहज भेटीसाठी आबालाल यांच्याकडे गेले असता ते काहीतरी रेखाटत होते. लेखकांना पाहून त्यांनी उठण्याचा प्रयत्न केला व ते शेजारच्या पेटीवर आपटले. खरे तर आबालाल थकले होते. लेखकाने त्यांना विश्रांती घ्यायला सांगितले. परंतु आबालाल यांनी जुमानले नाही. दुसऱ्या दिवशी म्हणजे २८ जून १९३२ रोजी आबालाल यांच्या मृत्यूची बातमी त्यांच्या घरातील एका मुलाने लेखकांना कळवली. मरणाच्या द्वारी जाईपर्यंत हा निसर्गाचा वेडा पीर हातात कुंचला घेऊन सृष्टीला जिंकू पहात होता, असे लेखकाला वाटले. राजा रविवर्मा यांच्या तोडीचे हे कलारत्न होते, असे लेखकाने येथे नमूद केले आहे.

एकंदर एका मनस्वी चित्रकाराचे दर्शन या व्यक्तिचित्रामधून आपणास घडते. छोटे छोटे प्रसंग त्यातील दृश्यात्मकतेमुळे आखीव रेखीव झाले आहेत. उत्कंठा आणि आश्चर्य यांचे बेमालुम मिश्रण या व्यक्तिचित्रामध्ये आढळते. व्यक्तीचा गुणगौरव करण्याची लेखकाची हातोटी विलक्षण आहे. आबालाल रहिमान हे उच्च दर्जाचे चित्रकार होते हा आशय लेखकाने अत्यंत ललितरम्य शैलीत आपल्यासमोर व्यक्त केलेला आहे.

३.५ समारोप (Summary) :

'तपस्वी आबालाल रहिमान' या व्यक्तिचित्रांमधून असामान्य प्रतिभेच्या चित्रकाराचा परिचय होतो. कला आणि कलावंत यांचे विश्व अनोखे असते. कलेची पारख नसणारा मनुष्य कलेची किंमत पैशात करू पाहतो. परंतु चांगले चित्र आणि चांगला चित्रकार यांची पैशात किंमत करता येत नाही, असा संदेश या लेखांमधून देण्यात आलेला आहे. कला निर्मिती आणि कलास्वाद या दोन्ही गोष्टी उत्कट आनंद प्राप्त करून देणाऱ्या असतात. माधवराव बागल यांनी नाट्यमय शैलीत प्रसंग चित्रण केले आहे. वाचकांची उत्कंठा वाढविणे व खिळवून ठेवणे त्यामुळे साधले आहे. म्हणूनच हे व्यक्तिचित्र मनाचा ठाव घेणारे, तसेच कला व कलावंत यांच्या विषयी नवी दृष्टी देणारे झाले आहे.

३.६ वाचनीय उतारा (Terms to Remember)

प्रस्तुत पाठामध्ये लेखकाने वैश्विक सत्य ठरावे असे आपले चिंतन व निरीक्षण अनेक ठिकाणी मांडले आहे. उदाहरणादाखल काही भाग आपण पाहू.

खरी उत्कृष्ट चित्रकला सुशिक्षितांना तशीच अशिक्षितांना आनंद देऊ शकते ती केवळ चार शिलक्या लोकांसाठी नाही हेच खरे

त्यांना काय माहीत की खऱ्या कलावंताला पैशाचा मोह कधीच नसतो ! लागलाच पैसा तर पोट चालावे म्हणून लागतो. कलेला वाहिलेल्या जीविताला पैशाची काय मातब्बरी ? पैसा नसला म्हणजे हात बंद पडतात म्हणून त्याला पैसा हवा. उत्कृष्ट काव्य, उत्कृष्ट चित्र यांची पैशाने किंमत कशी करता येणार ? त्याला ते लाखाच्या मोलाचे असते !

ज्यांनी ध्येयापुढे संपत्तीला कः पदार्थ मानले, जगाने आपली पंचाईत करू नये म्हणून ज्यांनी फकीराचा वेष पत्करला, जिच्या प्रेमात कधीही अंतर पडू नये म्हणून एकपत्नीव्रत स्वीकारले व कलेशी जन्माची गाठ बांधून घेतली, तिलाच सहधर्मचारिणी बनविली तेच हे महाराष्ट्रातील कलावंतांचे सद्गुरू आबालाल रहिमान ! !

राजा रविवर्मा यांच्या जोडीतील, त्यांच्याच तोडींतील हे रत्न रानावनांत सौन्दर्याला वेडावून अखेर जगाच्या दृष्टीआडच सुकून गेले. मरणाच्या द्वारी जाईपर्यंत हा निसर्गाचा वेडा पीर हातात कुंचला घेऊन सृष्टीला जिंकू पहात होता. अलेक्झांडरप्रमाणे याला सृष्टी जिंकता आली नाही म्हणून वाईट वाटे !

३.७ शब्दार्थ :

तपस्वी = एखादी विद्या प्राप्त करण्याकरिता दीर्घकाळ परिश्रम करणारा

सुदामजी = गरीब माणूस, श्रीकृष्णाच्या कथेतील सुदामा

विश्वकर्मा = विश्वाची रचना करणारा, येथे चित्रकार

शोकी कुबेर = शौकीन श्रीमंत

चरितार्थ = उपजीविका

कलाव्यासंगी = कलेचा अभ्यास असणारा

कॉपी करणे = हुबेहूब नक्कल करणे

दुराभिमान = व्यर्थ गोष्टीचा अभिमान

कलाराधन = कलेची आराधना

३.८ स्वाध्याय :

अ) योग्य पर्याय निवडा.

१. 'तपस्वी आबालाल रहिमान' या पाठाचा वाङ्मय प्रकार कोणता आहे?

अ) कथा ब) ललित लेख क) निबंध ड) व्यक्तिचित्र

२. करवीर म्हणजे कोणते गाव आहे?

अ) कोल्हापूर ब) पुणे क) कराड ड) औंध

३. आबालाल रहिमान किती आकाराच्या कागदावर निसर्ग चित्र रेखाटत होते?

अ) ३० ×५० इंच ब) ३×५ इंच क) १३ ×१५ इंच ड) ३ ×५ फूट

४. "मला फकीराला पैसा घेऊन काय करायचा?" असे उद्गार कोणी काढले?

अ) गरीब फकीर ब) भिकारी क) आबालाल रहिमान ड) माधवराव बागल

५. आबालाल रहिमान यांच्या पोटापाण्याची कायमची सोय कोणी केली होती?

अ) त्यांच्या वडिलांनी ब) इंग्रजांनी क) शाहू महाराजांनी ड) श्रीमंत जहागीरदारांनी

६. आबालाल रहिमान कोणाच्या बरोबरीचे चित्रकार होते, असे लेखकास वाटते?

अ) राजा रविवर्मा ब) गायतोंडे क) पिकासो ड) एम एफ हुसेन

७. आबालाल रहिमान यांचा मृत्यू कधी झाला?

अ) 28 जुलै 1932 ब) 28 जून 1932 क) 18 जून 1932 ड) 18 जुलै 1932

८. 'तपस्वी आबालाल रहिमान' हा लेख प्रथम कोणत्या पुस्तकांमधून प्रकाशित झाला होता?

अ. जीवन प्रवाह ब) माझ्या आवडत्या पाच व्यक्ती क) कलाविहार ड) कला आणि कलावंत

उत्तरे : १.ड) व्यक्तिचित्र

२.अ) कोल्हापूर

३.ब) ३×५ इंच

४.क) आबालाल रहिमान

५.क) शाहू महाराजांनी

६.अ) राजा रविवर्मा

७.ब) 28 जून 1932

८. ड) कला आणि कलावंत

ब. दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'तपस्वी आबालाल रहिमान' या पाठाच्या आधारे चित्रकार आबालाल रहिमान यांचा परिचय करून द्या.

२. चित्रकार आबालाल रहिमान यांचे कलंदर व्यक्तिमत्त्व दर्शविणारे दोन प्रसंग तुमच्या शब्दात लिहा.

३. 'तपस्वी आबालाल रहिमान' या पाठाच्या आधारे चित्रकार आबालाल रहिमान यांचे गुणविशेष स्पष्ट करा.

४. 'तपस्वी आबालाल रहिमान' या पाठाच्या आधारे भाई माधवराव बागल यांच्या लेखन शैलीचे विशेष सांगा.

५. व्यक्तिचित्र लेखनाचे कोणते गुणविशेष 'तपस्वी आबालाल रहिमान' या पाठात आढळतात ते स्पष्ट करा.

३.९ संदर्भ ग्रंथ

१. भाई माधवरावजी बागल निवडक लेखसंग्रह, संपादक प्राचार्य डॉ. मा. गो. माळी व इतर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९९८.

२. मराठी विश्वकोश

३. विश्रब्ध शारदा : भारतातील चित्रकला व शिल्पकला (खंड तिसरा), संपादक ह.वि.मोटे, १९६३.

४. https://youtu.be/zaL9oP_gMD8?si=GQpxdd7OjLk-gu_Q

४. बाभूळबनातील सोनचाफा : प्रा. एन. डी. पाटील

४.१ उद्दिष्टे (Objectives) :

'बाभूळबनातील सोनचाफा' हा पाठ अभ्यासल्यानंतर आपणास

१. भाई गणपतराव पाटील या व्यक्तिमत्त्वाचा परिचय होईल.

२. संसदीय कार्यप्रणाली कशी असते, ते कळेल.

३. लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधीने कसे असले पाहिजे, याची जाणीव होईल.

४. प्रा. एन. डी. पाटील यांच्या लेखनशैलीचे गुणविशेष कळतील.

४.२ प्रास्ताविक (Introduction) :

समाजाच्या विविध क्षेत्रात स्वतःच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणारे अनेक लोक असतात. त्यांचा जीवनसंघर्ष व त्यांनी केलेले कार्य, हे प्रेरणादायी असते. अशी व्यक्तिमत्त्वे आदर्श दीपस्तंभ असतात. त्यामुळेच अशा व्यक्तिमत्त्वांचा कार्यगौरव करणारे लेख लिहिले जातात. त्यामुळे समाजाला त्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय होतो. तसेच आपणही तशा प्रकारचे काम करावे, अशी प्रेरणा मिळते. वर्तमान काळात आदर्श व्यक्तिमत्त्वांचा, आदर्श राजकारणी लोकांचा लोप होत आहे. तसेच दुसऱ्यांचा गुणगौरव करावा ही वृत्ती कमी होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रा. एन. डी. पाटील यांनी आमदार गणपतराव देशमुख यांच्यावर लिहिलेला हा लेख अत्यंत महत्त्वाचा मानावा लागेल. हा लेख २०१२ मध्ये कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी अंकामधून प्रसिद्ध झाला होता. एका ज्येष्ठ विचारवंताने दुसऱ्या ज्येष्ठ राजकारणी व्यक्तीवर अशा प्रकारचा लेख लिहिणे, हे मोठे गौरवाचे मानावे लागेल. जुन्या काळातील तत्त्वनिष्ठ राजकारणी लोक व वर्तमान राजकीय स्थिती याबाबत गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. राजकारणात तत्त्व, बांधिलकी, विचार यांना खूप महत्त्व असते, हे प्रस्तुत लेखामधून आपणास कळू शकेल.

४.३ लेखक परिचय

प्रा. एन. डी. पाटील म्हणजेच नारायण ज्ञानदेव पाटील (१५ जुलै १९२९ – १७ जानेवारी, २०२२)

शिक्षण : एम. ए. (अर्थशास्त्र), एल. एल. बी.

काही काळ प्राध्यापक. नंतर पूर्ण वेळ सामाजिक चळवळींमध्ये सहभाग. ज्येष्ठ विचारवंत, शिक्षण तज्ज्ञ, पुरोगामी चळवळीतील लढाऊ व्यक्तिमत्त्व, शेतकरी कामगार पक्षाचे नेते. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन. काही काळ शिवाजी विद्यापीठाचे अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विद्वत परिषदेचे सदस्य. महात्मा फुले शिक्षण संस्था इस्लामपूरचे अध्यक्ष. शिवाजी विद्यापीठाकडून डॉक्टरेट पदवी प्रदान. महाराष्ट्र विधान परिषद व विधानसभा मध्ये चार वेळेला आमदार. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सक्रिय सहभाग. १९७२ च्या दुष्काळग्रस्तांच्या लढ्याचे नेतृत्व. जागतिकीकरण, खाजगीकरण विरोधी लढ्याचे नेतृत्व. शिवाजी विद्यापीठात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन सुरू करण्यात पुढाकार. भाई माधवराव बागल पुरस्कार, राजर्षी शाहू गौरव पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशन जीवनगौरव पुरस्कार, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार, दिनकरराव जवळकर पुरस्कार असे अनेक पुरस्कार प्राप्त. समाजवादी जर्मनीतील लोकजीवन (१९८७), शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी (१९९२), महर्षी विठ्ठल रामजी शिंदे चरित्र अशी अनेक पुस्तके प्रकाशित.

२.४ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

प्रस्तुत लेख म्हणजे एका विचारवंताने राजकारणातील दीपस्तंभ ठरलेल्या भाई गणपतराव देशमुख या व्यक्तीच्या कार्याला केलेले अभिवादन आहे ही दोन्ही माणसे तत्त्वनिष्ठ होते शेतकरी कष्टकरी कामगार चळवळीत अग्रभागी राहून नेतृत्व करणारी होती त्यांच्यावर समाजवादी विचारांचा मोठा पगडा होता दोघेही शेतकरी कामगार पक्षाचे नेते होते येथे लेखक प्रा एन डी पाटील यांनी आमदार भाई गणपतराव देशमुख यांचे संपूर्ण जीवन चरित्र दिलेले नाही तर दुष्काळी भागातील जनतेचे आमदार म्हणून दहा वेळा निवडून आलेल्या व्यक्तीच्या कार्याचा हा गौरव आहे

भाई गणपतराव देशमुख (१० ऑगस्ट १९२६ – ३० जुलै २०२१) हे डाव्या विचारसरणीचे राजकारणी होते. महाराष्ट्र विधानसभेवर ५४ वर्षे ते सांगोला विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून गेले. त्यांना लोक प्रेमाने आणि आपुलकीने "आबासाहेब" म्हणत. समानतेच्या तत्त्वाचे पालन करणारे आदर्श व्यक्ती असे त्यांना मानले जायचे. शेतकरी आणि कामगारांकडून त्यांना "भाई" म्हणले जाते. गरीब जनता, सामान्य कष्टकरी स्त्रिया, मागासलेले लोकसमूह, शेतकरी, कामगार यांच्यासाठी त्यांनी अनेक लढाया लढल्या.

देशमुख हे सांगोल्यात सर्वप्रथम १९६२ च्या निवडणुकीत विजयी झाले. त्यानंतर १९७२ आणि १९९५चा अपवाद वगळता प्रत्येक निवडणुकीत सांगोल्यातील मतदारांनी त्यांनाच निवडून दिले. २०१२ मध्ये आमदार म्हणून विधानसभेतील त्यांच्या सहभागास ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सभागृहाने तसेच सरकारने त्यांचा गौरव केला होता. अभ्यासक्रमात असलेला प्रस्तुत लेख त्यानिमित्तानेच लिहिण्यात आला आहे.

गणपतराव देशमुख हे बहुतांश काळ विरोधी बाकांवर होते. १९७८ मध्ये शरद पवार यांनी पुलोद सरकार स्थापन केल्यावर आणि १९९९ मध्ये शेतकरी कामगार पक्षाने काँग्रेस आघाडी सरकारला पाठिंबा दिला तेव्हा, अशा दोन वेळा गणपतराव देशमुख यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला होता. ३० जुलै, २०२१ रोजी त्यांचे निधन झाले.

सांगोल्यातील जनतेने त्यांच्यावर भरभरून प्रेम केले, कारण ते निस्वार्थी राजकारणी होते. त्यांनी कधीही भ्रष्टाचार केला नाही. साधी राहणी व उच्च विचारसरणी असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. ते आमदार असतानाही एसटी बसने प्रवास करीत असत. आपला मतदारसंघ हेच आपले कार्यक्षेत्र असे त्यांनी मानले होते. ते मतदारसंघातील प्रत्येक गावात वर्षातून दोन वेळेला जात असत व विधानसभेतील निर्णय, धोरणे, कामकाज याबाबत जनतेला माहिती देत असत. त्यांनी घराणेशाही निर्माण केली नाही. त्यांची मुले राजकारणात आली नाहीत. २०१९ मध्ये त्यांचा नातू निवडणुकीत उभा राहिला, परंतु त्याचा पराभव झाला .त्यांनी दुष्काळी भागातील ग्रामीण विकासावर भर दिला. दुग्ध उत्पादन, फळबागा लागवड व सूतगिरणीची स्थापना हे त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

प्रा. एन. डी. पाटील यांनी प्रस्तुत लेखाला 'बाभूळबनातील सोनचाफा' असे नाव दिले आहे. ते अत्यंत अर्थपूर्ण आहे. कारण सांगोला हा कायम दुष्काळी भाग असलेल्या माणदेशात येतो. तेथे पाऊसमान कमी असते. त्यामुळे सगळी शेती जिरायती आहे. त्यामुळे पडीक जमिनीचे माळरानांचे प्रमाण जास्त आहे. कमी पर्जन्याच्या प्रदेशात काटेरी झाडे वाढतात व टिकून राहतात. त्यामुळे माणदेशातील सर्व जिल्ह्यांमध्ये आपणास बाभळीची असंख्य झाडे दिसतात. अनेक ठिकाणी बाभूळबन तयार झालेले दिसते. म्हणजे अनुकुचीदार काटे असलेल्या बाभळीच्या बनामध्ये गणपतराव देशमुख हे मंद सुगंध देणाऱ्या सोनचाफ्यासारखे आहेत, असे लेखकास वाटते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे गणपतराव देशमुख यांचा स्वभाव ऋजू व मनमिळावू होता. दुष्काळी भागासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा सुगंध संपूर्ण सांगोला भूमीत दरवळत होता. त्यामुळेच या लेखाला लेखकाने 'बाभूळबनातील सोनचाफा' असे शीर्षक दिलेले आहे.

या लेखाच्या सुरुवातीला १८ मार्च १९९० ते २१ मार्च १९९० या तीन दिवसांमध्ये घडलेल्या गौरवपूर्ण प्रसंगाचे वर्णन लेखकाने केलेले आहे. नव्याने निवडून आलेल्या आमदारांना शपथ देण्याचा कार्यक्रम या चार दिवसात होता. अशावेळी नवनिर्वाचित आमदारांना शपथ कोण देणार, असा प्रश्न उपस्थित झाला. विधानसभेचे हंगामी सभापती कोण होणार, याबाबत सर्वांनाच उत्सुकता होती. परंतु सभागृहाच्या कामकाजाच्या नियमावलीत असे नमूद करण्यात आलेले होते की, सभागृहातील सर्वात ज्येष्ठ सदस्यास सभापती बनवावे. त्यानुसार गणपतराव देशमुख यांना हंगामी सभापती बनविण्यात आले. कारण तोपर्यंत ते सांगोला विधानसभा मतदार संघातून तब्बल आठ वेळेला विधानसभेवर निवडून गेले होते. दुष्काळग्रस्त भागातील आमदाराला अशा पद्धतीचा बहुमान मिळणे, हाच त्यांचा एक प्रकारचा गौरव आहे. असा हंगामी सभापती बनण्याचा मान पुढे २००४ व २००९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर गणपतराव देशमुख यांना मिळाला व त्यांनी हॅट्रिक साधली. ते सांगोला या मतदारसंघातून तब्बल दहा वेळेला विजयी झाले होते.

सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले गणपतराव बी. ए., एल. एल. बी. झाले होते. त्यांनी काही काळ वकिली केली. त्यादरम्यान त्यांना दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे कर्जबाजारीपणाचे व हलाखीचे दर्शन घडले. या काळात बुद्धिहाळ तलावाचा एक प्रश्न निर्माण झाला होता. सरकारने शेतकऱ्यांची शेकडो एकर जमीन सक्तीने संपादित केली होती. परंतु त्याचा मोबदला दिलेला नव्हता. गणपतरावांनी कायद्याच्या कलमांचा किस काढून गरीब शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. त्यामुळे सांगोला परिसरातील शेतकऱ्यांच्या तोंडी अॅड. गणपतराव देशमुख यांचे नाव झाले. या दरम्यानच संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन सुरू झाले. त्यामध्येही गणपतराव हिरीरीने पुढे झाले. त्यामुळे हळूहळू या भागातून त्यांचे नेतृत्व उदयास आले. शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून ते आमदार झाले.

आमदार झाल्यानंतर त्यांनी माणदेशी माणसांना सन्मानाने जगता यावे यासाठी पाच तपे म्हणजे साठ वर्षे जीवाचे रान केले. या भागात फुलझाडे, द्राक्षे, बोरे आणि डाळिंबाच्या फळबागा बहरू शकतात, असा विचार करून त्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले व यश मिळविले. ज्याप्रमाणे मार्टिन ल्युथर किंग यांनी जगातील वेगवेगळ्या वंशाची व रंगाची मुले एकत्र खेळत बागडत आहेत, असे स्वप्न

पाहिले होते; त्याप्रमाणे गणपतरावांनी माणदेशी माणसाच्या विकासाचे स्वप्न पाहिले होते या. त्यांच्या स्वप्नातील माणदेशी मूल दूध दुभत्या अभावी खुरटलेले नसेल. ते कुपोषण मुक्त असेल. बालमजूर म्हणून ते कोणा बड्या जमीनदाराची गुरे राखायला गेलेले नसेल. ऊसतोड मजूर म्हणून महिनोन महिने स्थलांतर करून पोट भरत नसेल. त्या ऐवजी स्वतःच्या शेताची बांध बंदिस्ती करून शिवारातले पाणी शिवारात आणि शेतातले पाणी शेतात, या तंत्राचा वापर करत फळबाग फुलविणारे असेल. गावातील डेरीत दूध घालून आपल्या नगदी गरजा पूर्ण करणारे असेल, असे उदात्त स्वप्न त्यांनी पाहिले होते व सत्यात उतरविले होते.

गणपतराव देशमुख यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून केली आणि सलग साठ वर्षे ते याच पक्षात राहिले. स्वतःच्या पक्षाचा त्याग करून ते सत्ताधारी पक्षात गेले असते, तर त्यांना स्वतःला मोठा लाभ झाला असता. सातत्याने मंत्री होता आले असते. सत्तेत राहता आले असते. परंतु असा विचारही त्यांच्या ध्येयनिष्ठ मनाला शिवला नाही. त्यांनी शेकाप पक्षाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी काम केले. महाराष्ट्र राज्य शेतकरी सभेचे सरचिटणीस म्हणून समर्थपणे जबाबदारी सांभाळली.

लेखक एन. डी. पाटील पुढे असे लिहितात की, दुष्काळाच्या काळात महाराष्ट्रात अन्नटंचाईचा प्रश्न अतिशय गंभीर झाला होता. सरकार मुंबई शहराला दरडोई बारा किलो धान्य रेशन दुकानातून पूरवीत होते. तर ग्रामीण भागात दरडोई तीन किलो धान्य द्यायला देखील तयार नव्हते. शेकापने इतर डाव्या पक्षांना एकत्र करून 'उपासमार विरोधी कृती समिती' स्थापन केली. त्या माध्यमातून कोल्हापूर येथे विराट मोर्चा काढला. परंतु पोलिसांनी या मोर्चावर अमानुष गोळीबार केला. त्यामध्ये सहा लोक ठार झाले. सरकारने नेहमीप्रमाणे या मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांना पकडून तुरुंगात टाकले. परंतु चळवळ थांबली नाही. येरवडा तुरुंगात असताना गणपतराव नियमित नियमितपणे व्यायाम करीत असत. योगासने करीत असत. त्यांनी वयाच्या ८५ व्या वर्षी देखील व्यायाम व पहाटे नियमित फिरण्याची सवय जोपासली होती. पुढे सरकारने या नेत्यांना तुरुंगातून सोडले. उपासमार विरोधी कृती समितीच्या मागण्या मान्य झालेल्या नसल्यामुळे वेगवेगळ्या मार्गांनी लढा चालूच होता. त्यामध्ये काही निवडक आमदारांनी बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये गणपतराव देशमुख व लेखक प्रा. एन. डी. पाटील सहभागी झाले होते. हे उपोषण कौन्सिल हॉलच्या इमारतीत केले होते. अकरा दिवस हे पोषण चालले.

गणपतराव देशमुख यांनी विधानसभेत अत्यंत लक्षणीय कामगिरी केलेली आहे. अनेक हरकतीचे मुद्दे उपस्थित करून विरोधी पक्षाच्या हिताचे होतील असे निर्णय करून घेतले आहेत. विधिमंडळाच्या अनेक समित्यांवर सदस्य म्हणून प्रभावीपणे काम केले आहे. अधिकृत विरोधी पक्षनेता म्हणून तसेच पब्लिक अकाउंट्स कमिटीचे अध्यक्ष म्हणून देखील त्यांनी जबाबदारी केलेली आहे.

ते पुलोद मंत्रिमंडळात कृषी, ग्रामविकास, विधी व न्याय खात्याचे मंत्री होते. त्यावेळी त्यांनी नाला बंडिंगची शेतकऱ्यांच्या डोक्यावर असणारे कर्जे माफ केली. तसेच भातावर पडणाऱ्या खोडकिडीचा बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना म्हणून शेतकऱ्यांची भातशेते सरकारी खर्चाने नांगरून देण्याची योजना गणपतरावांनी अमलात आणली.

त्या पुलोद सरकारमध्ये प्रा. एन. डी. पाटील सहकार मंत्री होते. तेव्हा त्यांनी राज्यातल्या सहकारी सूतगिरण्यांसाठी शासनाचा भाग भांडवलाचा हिस्सा लक्षणीय प्रमाणात वाढविण्याचा निर्णय घेतला. पूर्वी तो एकास दोन प्रमाणात होता. त्या ऐवजी एकास नऊ अशा प्रमाणात केला. म्हणजेच शेतकऱ्यांनी तीस लाख रुपये भाग भांडवल जमविले की त्यांना दोन कोटी सत्तर लाख रुपये शासनाकडून मिळून सूतगिरणी उभी राहणार होती. या योजनेचा फायदा घेऊन गणपतराव देशमुख यांनी शेतकरी सहकारी सूतगिरणी सांगोला येथे उभी केली. या सूतगिरणीने पुढे व्यवस्थापन क्षेत्रातले अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळविले. तसेच त्यांनी महिला सूतगिरणी देखील स्थापन केली. शासनाच्या अनेक योजना सांगोला तालुक्यात लागू केल्या. जर्शी गाई पालन सुरू करून दूध उत्पादनाच्या क्षेत्रात आघाडी घेतली.

लेखक पुढे लिहितात की, गणपतरावांनी पाणीटंचाई दूर करण्याचा ठोस प्रयत्न म्हणून अनेक तलाव पाझर तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, नाला बंडिंग व पाणलोट क्षेत्राचा विकास यांची कामे सुरू केली. ती वेळेत पूर्ण केल्यामुळे पाण्याची उपलब्धी वाढली. सगळ्या शासकीय योजनांचा सखोल अभ्यास करून लोकांना त्यांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

लेखक एन. डी. पाटील यांनी लिहिलेल्या 'शेतीमालाच्या किफायतशीर किमतीची कैफियत' या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य शेतकरी सभेच्या १९७० साली झालेल्या अधिवेशनात गणपतराव देशमुख यांच्या हस्ते परभणी येथे झाले होते. गणपतराव स्वभावाने सरळ आणि अंतःकरणांनी निर्मळ आहेत. त्यांचे चारित्र्य निष्कलंक आहे. सामाजिक बांधिलकी बाळगून ते राजकारण व समाजकारण करतात. त्यांचा स्वभाव अतिशय ऋजू असल्यामुळे ते सर्वांना हवेहवेसे वाटतात. म्हणून ते तब्बल दहा वेळेला विधानसभेत आमदार झाले. तरीही ते साध्या कौलारू घरात रहात होते. याची नोंद लेखकाने घेतली आहे

लेखक एन. डी. पाटील पुढे लिहितात की, आता काळ बदलला आहे. शिक्षण महाग झाले आहे. सरकारने शिक्षण व आरोग्यासह अनेक क्षेत्रे खाजगी क्षेत्राच्या हातात दिली आहेत. ही गंभीर बाब आहे. कारण त्यामुळे गरिबांच्या मुलांना शिक्षण मिळणार

नाही. तसेच गरिबांना योग्य औषध उपचार मिळणार नाहीत. म्हणून पुन्हा एकदा संसदीय आघाडी व रस्त्यावरची लढाई अशा दोन्ही गोष्टी कराव्या लागतील. त्यासाठी मातब्बर नेत्यांनी रस्त्यावर उतरले पाहिजे. काळाची हाक ऐकून कृती केली पाहिजे.

या संपूर्ण लेखांमधून दुष्काळी भागाच्या समृद्धीचा ध्यास घेतलेल्या भाई गणपतराव देशमुख यांच्या कार्याचा परिचय घडतो. त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे होते, ते कळते. निस्वार्थी राजकारणी कसा असतो आणि तो आपल्या भागाचा विकास आणि जनतेचे हित कसे साधतो याचा उत्तम वस्तुपाठ आमदार गणपतराव देशमुख यांच्या रूपाने पहावयास मिळतो.

२.५ समारोप (Summary) :

प्रा. एन. डी. पाटील यांनी आमदार गणपतराव देशमुख यांचे संपूर्ण सामाजिक व राजकीय जीवन जवळून पाहिलेले होते. गणपतराव देशमुख हे शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते व नेते होते. साठ वर्षे त्यांनी एकाच पक्षातून काम केले. दहा वेळेला विधानसभेची निवडणूक जिंकून आमदार झाले. इतका जनतेचा विश्वास व प्रेम जिव्हाळा त्यांनी मिळविला होता. त्यांनी आमदारकीचा फायदा स्वतःच्या कुटुंबाला होईल असा विचार केला नाही. भ्रष्टाचार केला नाही. घराणेशाही जोपासली नाही. याउलट दुष्काळी भागात सूतगिरण्या स्थापन केल्या. फळबागा निर्माण व्हाव्यात यासाठी प्रयत्न केले. जलसिंचनाचे अनेक प्रयोग राबविले. विधानसभेत जनतेचे प्रश्न मांडणारे आमदार व विरोधी पक्षनेते म्हणून प्रभावी काम केले. त्यामुळेच त्यांना सलग तीन वेळेला हंगामी सभापती पदाचा मान मिळाला. त्यांच्या कार्याचा गौरव या लेखाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

२.६ वाचनीय उतारा (Terms to Remember)

सांगोला मतदारसंघ हा भौगोलिकदृष्ट्या पश्चिम महाराष्ट्राचा भाग असला, तरी पश्चिम महाराष्ट्र हा काही एकजिनसी भू–प्रदेश नाही. पश्चिम महाराष्ट्रातील बागायती क्षेत्राचे जिल्हे आणि सांगोला, जत, आटपाडी, कवठेमहांकाळ, तसेच सातारा जिल्ह्यातील माण तालुका यांची चेहरेपट्टी एकसारखी नाही. त्यांची प्रकृती मूलतः भिन्न आहे. सांगोला तालुका ज्या माणदेशात मोजला जातो, तो प्रदेश सातत्याने दुष्काळाच्या सावटाखाली झाकोळलेला आहे. वर्षानुवर्षे सात वर्षांपैकी किमान तीन वर्षे दुष्काळाचा तडाखा सोसावा लागणाऱ्या या तालुक्यात कोणताही नाव घेण्यासारखा उद्योगधंदा नाही. शेतीशिवाय रोजगाराचा अन्य पर्याय नाही. उपासमारीवर माल करण्याचा भाग म्हणून तालुक्यातील शेतकऱ्यांना व शेतमजुरांना ऊसतोडणी मजूर म्हणून राज्यातल्या वेगवेगळ्या साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात आपले घरदार सोडून स्थलांतर करावे लागते. वर्षानुवर्षे अशा खडतर वाटेवरून रखडपट्टी करणाऱ्या माण देशातील या सुपुत्राने 'हंगामी स्पीकर' म्हणून नियुक्ती खेचून आणण्याची किमया साम्य केलेली होती. ती एक अपूर्वाईच म्हटली पाहिजे. ती संधी माणदेशाला प्रथमच प्राप्त झालेली होती. या गोष्टीचे कोणालाही अप्रूपच होते.

सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या फारच थोड्या मुलांना महाविद्यालयापर्यंत मजल मारण्याची संधी मिळत असते. तथापि, गणपतराव त्या दृष्टीने भाग्यचानच म्हटले पाहिजेत, कारण त्यांना पुण्यासारख्या विदभेच्या माहेरघरात महाविद्यालयीन शिक्षण घेण्याची संधी मिळाली. त्यांनीही त्या संधीचे सोने केले. बी.ए.ची पदवी प्राप्त केल्यानंतर त्या वेळच्या रिवाजाप्रमाणे त्यांनी एल. एल. बी. ची पदवी मिळवून अंगावर वकिलीचा अगाही चढविला, अभ्यासू वृत्ती, कायद्याच्या कलमाकलमांचा कीस काढण्याचा त्यांचा चिवटपणा व हातात घेतलेल्या कामात यश मिळावे म्हणून कमरेचा टाका तुटेपर्यंत मेहनत करण्याचा त्यांचा स्वभाव या गुणांवर त्याही क्षेत्रात त्यांनी

आपले नाव केले असते. तथापि, ॲडव्होकेट गणपतराव देशमुख या नावाने ओळखले जाण्यापेक्षा आमदार

गणपतराव देशमुख या नावाने त्यांनी ख्यातकीर्त व्हावे, अशी परिस्थिती आकार घेत होती. जी गोरगरीब शेतकरी

मंडळी त्यांच्याकडे कोर्टाच्या कामकाजाच्या निमित्ताने येत असत त्यामधून त्यांना शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे,

कर्जबाजारीपणाचे व हलाखीपणाचे दर्शन घडत होते. भरीसभर म्हणून सावकारांनी 'पूज्यांचा फटका' देऊन त्यांना कसे गारद केलेले असायचे याचे जे ज्ञान त्यांना मिळत गेले, तेवढे ज्ञान त्यांना विद्यापीठाच्या पदव्या प्राप्त करूनही मिळाले नसेल.

याच ओघात बुद्धिहाळ तलावाचा प्रश्न त्यांच्यापुढे आला. तो प्रश्न म्हणजे एक आव्हान होते; तथापि गोरगरीब शेतकऱ्यांच्या अंतःकरणात आपले स्थान कोरण्याची ती संधीही होती. त्या तलावासाठी ब्रिटिश सरकारने शेतकयांच्या शेकडो एकर जमिनी सक्तीने संपादन केलेल्या होत्या. तलावाचे काम अपूर्ण अवस्थेत पडून होते हे तर खत्व; मात्र संबंधित जमिनीच्या मोबदल्याची रक्कमही त्यांना देण्याची तसदी त्या सरकारने घेतली नव्हती. १८९४ सालबा कायदाच असा होता की, ज्या शेतकऱ्याची जमीन सरकार कायदद्याचा बडगा उगारून आपल्या ताब्यात घेत होते, त्या संदर्भात त्याला न्याय मिळण्याची कसलीही संधी नव्हती. विशेष म्हणजे स्वातंत्र्यानंतरही त्यात काही सकारात्मक बदल करण्याची भूमिका स्वराज्यातले सरकार स्वीकारीत नव्हते, गणपतरावांनी त्या कायद्याच्या कलमांचा कीस काढून शेतक–यांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार केला. त्यासाठी त्यांनी आपले सारे बुद्धिवैभव आणि वकिलीचे कौशल्य पणाला लावले. त्यांच्या या संघर्षात त्यांना त्यांचे सहकारी भाई एस्. एम्. पाटील, सर्जेराव सगर अशा बिनीच्या कार्यकर्त्यांचे बहुमोल सहकार्य मिळाले. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा नोषदला मिळवून देशात त्यांना यश आले. यशासारखे यशोदाबी दुसरे काहीच नसते! गावागावांतील शेतकयांच्या तोंडी गणपतरावांचे नाव झाले.

मार्टिन ल्यूथर किंग या महामानवाने आयुष्यभर एक भव्यदिव्य स्वप्न पाहिले. 'आय हॅव अ ड्रीम' या मथळ्याखाली त्यांनी ते शब्दबद्ध केलेले आहे. साऱ्या नीग्रो समाजामध्ये त्या काव्याने एक अभूतपूर्व चैतन्य सळसळले. हा स्वप्नांचा सौदागर कोणते स्वप्न पाहत होता? "माझे एक स्वप्न आहे. जगभरातल्या वेगवेगळ्या वंशांची व रंगांची मुले एकमेकांच्या हातात हात घालून गुण्यागोविंदाने नांदत आहेत, बागडत आहेत, एकाच बाकावर बसून विद्येची आराधना करीत आहेत, एकाच खेळाच्या मैदानावर ती खेळत आहेत. सर्वांनाच सुख व शांती लाभलेली आहे."

गणपतराव हे राजकारणात इतकी वर्षे राहूनही अजातशत्रू आहेत. 'स्वभावाचा सरळ आणि अंतकरणाचा निर्मळ' अत्याचार निष्कलंक आहे. सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या काही पोष्टसाध्य करता आली आहे. सामायिक बांधिलकी बाळगून राजकारण समाजकारण करणाऱ्या अतिक्रम असल्यामुळे ते सर्वांनाच हवेसे वाटतात, त्यांच्या बागण्या–बोलण्यातही आक्रस्ताळेपणाच्या माणसाशी बोलताना गणपतरावांनी आवाज बविल्याचे उदाहरणसतेथे चांदने शिंपीत जातात. गणपतरावांचा बहुतांश वेळ वैधानिक आघाडीवर आहे०च्या निवडणुकीत त्यांनी यश खेचून आपलेसे आहे सभागृहात त्यांचं आहे त्यांच्यामो वजन प्राप्त झालेले आहे. परंतु वासर्व गोष्टी विचारात घेऊनही वैधानिक आघाडीवरील कामाबरोबरच राज्यभर श्रमिक जनतेच्या ज्या लहानमोठ्या आहेत त्यांनी त्यानैष्ठिक अधिष्ठानाचे उपलब्ध करून देण्याची गरज आहे

२.७ शब्दार्थ :

अधोरेखित करणे = ठळकपणे लक्षात आणून देणे

नवनिर्वाचित = नव्याने निवडून आलेले

सोपस्कार = नियम किंवा रूढी म्हणून करावयाची गोष्ट

नवलाई = नवेपणाचे कौतुक

स्पीकर = सभापती

हंगामी = गरजेनुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमलेला

नामदार = राज्यपाल किंवा मंत्री यांना उद्देशून वापरला जाणारा आदरार्थी शब्द

हॅट्रिक = सलग तीन वेळेला घडलेली गोष्ट

पूजांचा फटका = कर्ज म्हणून घेतलेल्या रकमेवर एक/दोन /तीन शून्ये मांडून फुगवलेली रक्कम

अग्रभागी राहणे = पुढाकार घेणे

कुपोषण = योग्य आहार न मिळाल्यामुळे निर्माण झालेली शारीरिक दुर्बलता

दमनशक्ती = बळाचा वापर करून केलेली दडपशाही

विराट = खूप मोठा

चांदणे शिंपीत जाणे = सुखद अनुभूती देणे

समाजकंटक = समाजविघातक काम करणारे

आयुध = शस्त्र

४.८ स्वाध्याय :

अ) योग्य पर्याय निवडा.

१. लेखक प्रा. एन. डी. पाटील यांनी 'बाभूळबनातील सोनचाफा' या शब्दांनी कोणाचा गौरव केला आहे?

अ. गणपतराव देशमुख ब. विलासराव देशमुख क. गणपत पाटील ड. अनिल देशमुख

२. १८ मार्च १९९० रोजी राज्यपालांनी हंगामी स्पीकर म्हणून कोणाची निवड केली होती?

अ. रत्नप्पा कुंभार ब. गणपतराव देशमुख क. विलासराव देशमुख ड. शरद पवार

३. आमदार गणपतराव देशमुख कोणत्या मतदारसंघांमधून निवडून आले होते?

अ. जत ब. आटपाडी क. सांगोला ड. पंढरपूर

४. सांगोला हा तालुका महाराष्ट्रातील कोणत्या भूप्रदेशात येतो?

अ. खानदेश ब. विदर्भ क. मराठवाडा ड. माणदेश

५. गणपतराव देशमुख यांचे शिक्षण किती झाले होते?

अ. बी. ए.,एल. एल. बी. ब. बी. ए. क. एम. ए. ड. बी. कॉम. एल. एल. बी.

६. कोणत्या तलावाच्या प्रश्नात गणपतराव देशमुख यांनी लक्ष घातले होते?

अ. आंधळी ब. बुद्धिहाळ क. येरळवाडी ड. राजेवाडी

७. स्वातंत्र्योत्तर काळातील कोणत्या महत्त्वाच्या आंदोलनामध्ये गणपतरावांनी हिरीरीने भाग घेतला?

अ. एक गाव एक गणपती ब. एक गाव एक पाणवठा क. संयुक्त महाराष्ट्र चळवळ ड. भूदान चळवळ

८. राज्यकर्त्यांना मुंबईचे काय करण्याची घाई झाली आहे, असे लेखक म्हणतो?

अ. बीजिंग ब. टोकियो क. सिंगापूर ड. शांघाय

९. 'आय हॅव अ ड्रीम' या मथळ्याखाली शब्दबद्ध केलेले भव्य दिव्य स्वप्न कोणी पाहिले होते?

अ. मार्टिन ल्युथर किंग ब. जूनियर ल्युथर किंग क. अब्राहम लिंकन ड. जॉर्ज वॉशिंग्टन

१०. गणपतरावांनी त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात कोणत्या पक्षाच्या माध्यमातून केली?

अ. काँग्रेस ब. शेतकरी कामगार पक्ष क. कम्युनिस्ट पार्टी ड. लाल निशान पक्ष

११. १९६९ ते १९७५ या काळात गणपतराव देशमुख यांनी महाराष्ट्र राज्य शेतकरी सभेचे कोणते पद भूषविले?

अ. अध्यक्ष ब. उपाध्यक्ष क. सरचिटणीस ड. खजिनदार

१२. महाराष्ट्रात अन्नटंचाईचा अतिशय गंभीर स्वरूपाचा प्रश्न उभा ठाकला होता, तेव्हा शेतकरी कामगार पक्षाने कोणती समिती स्थापन केली होती?

अ. भ्रष्टाचार विरोधी कृती समिती ब. बेरोजगारी विरोधी कृती समिती क. दुष्काळ विरोधी कृती समिती ड. उपासमार विरोधी कृती समिती

१३. उपासमार विरोधी कृती समितीच्या नेत्यांना कोणत्या तुरुंगात बंद करण्यात आले ?

अ. नाशिक व येरवडा ब. कळंबा क. मुंबई ड. तिहार

१४. नामदार विलासराव देशमुख यांच्या कारकीर्दीत गणपतराव देशमुख यांनी कोणत्या खात्याच्या मंत्रीपदाची धुरा सांभाळली?

अ. कृषी ब. पणन आणि रोजगार हमी योजना क. सहकार ड. मत्स्यपालन

१५. 'शेतीमालाच्या किफायतशीर किमतीची कैफियत' हे पुस्तक कोणी लिहिले आहे?

अ. गणपतराव देशमुख ब. शरद जोशी क. प्रा. एन. डी. पाटील ड. राजू शेट्टी

उत्तरे :

१. अ. गणपतराव देशमुख

२. ब. गणपतराव देशमुख

३. क. सांगोला

४. ड. माणदेश

५. अ. बी. ए., एल. एल. बी.

६. ब. बुद्धिहाळ

७. क. संयुक्त महाराष्ट्र चळवळ

८. ड. शांघाय

९. अ. मार्टिन ल्युथर किंग

१०. ब. शेतकरी कामगार पक्ष

११. क. सरचिटणीस

१२. ड. उपासमार विरोधी कृती समिती

१३. अ. नाशिक व येरवडा

१४. ब. पणन आणि रोजगार हमी योजना

१५. क. प्रा. एन. डी. पाटील

ब. दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'बाभूळबनातील सोनचाफा' या लेखामध्ये भाई गणपतराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाचा कसा परिचय घडविण्यात आला आहे, ते स्पष्ट करा.

२. गणपतराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणते गुणविशेष 'बाभूळबनातील सोनचाफा' या पाठामध्ये कसे व्यक्त झाले आहेत, ते लिहा.

३. सामाजिक जाणिवेचे राजकारणी म्हणून भाई गणपतराव देशमुख यांच्या कार्याचा परिचय करून द्या.

४. 'बाभूळबनातील सोनचाफा' या लेखाच्या आधारे प्रा. एन. डी. पाटील यांच्या लेखनशैलीचे गुणविशेष स्पष्ट करा.

४.९ संदर्भ ग्रंथ

१. पाटील, एन. डी. : बाभूळबनातील सोनचाफा, कालिनिर्णय, सांस्कृतिक दिवाळी अकं, २०१२

घटक - ४

कविता

*संत ज्ञानेश्वर: १. पैल तो गे काऊ कोकताहे २. रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा

*सावित्रीबाई फुले:१. तयास मानव म्हणावे का? २. राणी छत्रपती ताराबाई

*बहिणाबाई चौधरी:१. मन २. अरे संसार संसार

*भालचंद्र नेमाडे :१. रांगोळ्या २.आजी

—----------

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ कवी परिचय

४.३ विषय विवेचन

४.३.१ संत ज्ञानेश्वर

४.३.२ सावित्रीबाई फुले

४.३.३ बहिणाबाई चौधरी

४.३.४ भालचंद्र नेमाडे

४.४समारोप

४५. कठीण शब्दांचे अर्थ

४.६ स्वाध्याय / सरावासाठी प्रश्न

४.७. उपक्रम

४.८ अधिक वाचन

४.९संदर्भ ग्रंथ

—----------

४.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो बी.ए.भाग १ 'रुजुवात' या पुस्तकातील मराठी विषयाच्या दुसऱ्या सत्रांमधील अभ्यासक्रमामध्ये कविता या वाड.मय प्रकारातील संत ज्ञानेश्वर,सावित्रीबाई फुले,बहिणाबाई चौधरी,भालचंद्र नेमाडे यांच्या प्रत्येकी दोन कवितांचा अभ्यास आपण करणार आहोत.यामुळे तुम्हांस

१. संत वाड. मयातील महत्त्वाचे कवी ज्ञानेश्वर यांचा परिचय होईल.

२. संत ज्ञानेश्वरांच्या अभंगाचे स्वरूप लक्षात येईल.

३. सावित्रीबाई फुले यांची माणुसकीबद्दलची भूमिका आणि छत्रपती ताराराणी यांच्या कार्याचा परिचय होईल.

४. बहिणाबाई चौधरी यांच्या मानवी मनाच्या संवेदना आणि संसाराबद्दलची विविध मते जाणून घेण्यास मदत होईल.

५. भालचंद्र नेमाडे यांच्या रांगोळ्या आणि आजी यासारख्या कवितेतून स्त्रीच्या विविध आयामांचे वर्णन, तिचे माणूस असणे किती महत्त्वाचे आहे, याचे स्वरूप लक्षात येईल.

४.१. प्रस्तावना :

मराठी साहित्याची परंपरा खूप मोठी आहे. महानुभव संप्रदायापासून ते आजच्या आधुनिक एआयच्या काळापर्यंत मराठी भाषेने आपल्याला समृद्ध असे बनवलेले आहे. नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जाही मिळालेला आहे. यामुळे दोनहजार वर्षापूर्वीचा इतिहास असलेल्या आपल्या भाषेबद्दलची जाणीव आणखीनच विस्तारत जाणार आहे.येणाऱ्या काळात मराठी भाषा विविध क्षेत्रात मोठ्या आदबीने स्वीकारली जाणार हे निश्चित! अशाच या मराठी भाषेत कथा, काव्य, कादंबरी,नाटक,चरित्र,आत्मचरित्र इत्यादी विविध प्रकारातून लेखन झाल्याचे दिसते.

यातील काव्य हा साहित्यप्रकार अल्पाक्षरी जरी असला तरी त्यातील आशय मात्र दीर्घ अशा स्वरूपाचा असतो. कवी आपले विचार, भावना,कल्पना, संवेदना याबद्दल नेमकेपणाने मांडणी करतो. कवितेची निर्मिती होत असताना अनेक मानसिक तणावातून कवीला जावे लागते. तेव्हाच उत्तम कवितेची निर्मिती होते. प्रारंभी संत कवीने आपल्या कवितेची नाळ माणसाची जुळवलेली आहे.तेव्हापासून ते आजतागायत 'माणूस' या विषयाच्या भोवताली आणि आसपास आपल्याला कविता दिसते. कवीचे व्यक्तिमत्व समजून घेत असताना कवी हा कोणी वेगळा आहे असे नाही. त्याने स्वतःला तसे समजूही नये.कवीचे व्यक्तिमत्व त्याच्या कवितेतून दिसायला पाहिजे. नाहीतर आपण कोणतर थोर व्यक्ती आहोत असा फाजील आत्मविश्वास कवीने बाळगता कामा नये. माणसांच्या वेदना फक्त जाणून उपयोग नाही तर त्या वेदना जगताना होणारी जीवाची घालमेल त्यातून सावरण आणि आपलं जीवन जगणं या सगळ्यात त्याचे व्यक्तिमत्व आपोआप कवितेतून येत असते.

पंढरीचे महात्म्य आणि विठ्ठलभक्ती ही संतांच्या अनेक अभंगातून,रचनेतून पाहावयास मिळते.'विठ्ठल' हे आपले तीर्थक्षेत्र असल्याने तिथे विठ्ठलाचे दर्शन होणे यात साऱ्या जीवनाचे सार्थक झाल्याचे चित्रण संतांच्या अभंगतून येते. संत ज्ञानेश्वर यांच्या अभंगातून विठ्ठल भक्तीची ओढ दिसून येते.विठ्ठल भक्तीसाठी जीव आतुर झाल्याचे चित्रण करताना अनेक प्रकारचे दाखले इथे पहावयास मिळतात. काही संकेत दिसतात.

थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून मानव कोणास म्हणावे? याचे चित्रण आले आहे. प्रबोधनात्मक मांडणी या कवितेत येते.तर राणी छत्रपती ताराबाई यामधून ताराराणीचा पोवाडाच आलेला आहे. ही कविता म्हणजेच स्त्री सामर्थ्याचा गौरव आहे.एखादी स्त्री आपल्या कार्यातून किती मोठी होऊ शकते याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे ताराराणी होय. बहिणाबाई चौधरी यांच्या 'मन' या कवितेतून मानवी मनाचा वेध घेतलेला आहे. मनाची चपळता विविध उदाहरणे देऊन त्यांनी वर्णन केलेले आहे. 'अरे संसार संसार' यामधून संसार म्हणजे दोन जीवांचा विचार. त्यातून सुखदुःखही आलेच. अशा संसारातून माणूस आपली जीवन जगत असतो. नवी आशा आपल्याला नेहमीच प्रज्वलित करील यामध्ये संसाराची सगळे बंध सामील असल्याचे चित्रण येते. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते भालचंद्र नेमाडे यांच्या 'रांगोळ्या' या कवितेमधून भारतीय कुटुंब

व्यवस्थेतील प्रत्येक स्त्री म्हणजे एक घरंदाज व्यथा आहे असे कवीला वाटते. या कवितेतून अनेक प्रतिमा आलेल्या आहेत.'आजी' ही कविता एक शब्दचित्र आहे. आजी आणि नातवाचे निर्मळ नाते, आजीसोबत लहानपणापासूनचे घालवलेले क्षण याची आठवण यामध्ये येते.

४.२. कवी परिचय :

* संत ज्ञानेश्वर (ज्ञानदेव विठ्ठलपंत कुलकर्णी इ. स.१२७५-१२९६) ज्ञानेश्वरांचा जन्म इसवी सन १२७५ मध्ये आपेगाव (ता. पैठण)येथे झाला तर त्यांनी आळंदी येथे इ. स.१२९६ मध्ये समाधी घेतली. ज्ञानेश्वर हे भागवत संप्रदायाचे प्रवर्तक म्हणून ओळखले जातात. त्यांनी ज्ञानेश्वरी हे
भगवदगीतावरील भाष्य रचले आहे. त्याचबरोबर अमृतानुभव,चांगदेव पासष्टी,हरिपाठाचे अभंग इत्यादी रचना लिहिलेल्या आहेत. विठ्ठलभक्तीची ओढ आणि समर्पक भावनेने विठ्ठलाप्रती असणारी श्रद्धा त्यांच्या अभंगातून चित्रित होते.

* सावित्रीबाई फुले (३ जानेवारी १८३१ ते १०मार्च १८९७)
भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून त्यांना ओळखले जाते. समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या.सावित्रीबाई आणि त्यांचे पती जोतिराव फुले हे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत.
त्यांचे काव्यफुले (१८५४) आणि बावन्नकशी सुबोध रत्नाकर (१८९१)हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या
काव्यफुले या संग्रहात एकूण ४१ कविता आहेत. या कवितांचे विषय निसर्ग तसेच सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणाऱ्या कविता आहेत.' बावन्नकशी सुबोध रत्नाकर ' या संग्रहामध्ये ५२कडव्यांचे काव्य आहे. जोतिबांच्या विचारांची समीक्षा करणारे हे सुबोध टीकाकाव्य आहे. यामधील चौदा कडव्यांमध्ये जोतिबांचे चरित्र आले आहे.

*बहिणाबाई चौधरी :

खानदेशामधील जळगाव जिल्ह्यातील असोदे या गावी २४ ऑगस्ट १८८० मध्ये बहिणाबाईंचा जन्म झाला. त्यांचा विवाह नथूजी चौधरींशी वयाच्या तेराव्या वर्षी झाला. वयाच्या तिसऱ्या वर्षी त्यांना वैधव्य आले. त्यांच्या कवितेमधून ग्रामीण परिसरातील कुटुंबव्यवस्था, संसारी स्त्रीची सुख -दुःखे, सण,वार,उत्सव,परंपरा, सासर- माहेर यांच्यातील नातेसंबंधाचे चित्रण आलेले आहे. त्यांचे निधन जळगाव येथे ३ डिसेंबर १९५१ मध्ये झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी यांनी आचार्य यात्रे यांच्या पुढाकाराने आईच्या कविता 'बहिणाबाईंची गाणी 'या नावाने पुस्तक रूपाने प्रसिद्ध केल्या. संत परंपरेशी जवळचे नाते सांगणारी बहिणाबाईंची कविता आहे.

* भालचंद्र नेमाडे : (जन्म :२७ मे १९३८ सांगवी, खानदेश)

मराठी साहित्याला ज्ञानपीठ पारितोषिक मिळवून देणारे भालचंद्र नेमाडे हे महत्त्वाचे साहित्यिक आहेत. १९६० नंतरचे मराठीतील श्रेष्ठ लेखक अशी भालचंद्र नेमाडे यांची ओळख आहे.त्यांनी खानदेशातून मॅट्रिक (१९५५), पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजा तून बी.ए. (१९५९), डेक्कन कॉलेज येथून भाषाशास्त्र या विषयात एम. ए.

(१९६१) केले आहे. त्यांनी इंग्रजी साहित्यात मुंबई विद्यापीठातून एम.ए. (१९६४)केले आहे. त्यांना जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून डी. लिट ही सन्माननीय पदवी बहाल करण्यात आलेली आहे. व्यवसायाने प्राध्यापक असलेले भालचंद्र नेमाडे यांनी अहमदनगर, धुळे,औरंगाबाद, मुंबई विद्यापीठ, गोवा विद्यापीठ या ठिकाणी कार्य केलेले आहे. त्यांचे प्रकाशित साहित्य कोसला (१९६३) ही कादंबरी वयाच्या २५ व्या वर्षी प्रकाशित झाली. नंतर बिढार (१९६७), जरीला (१९७७), व झूल (१९७९)या 'चांगदेव पाटील ' या नायकाच्या जीवनावरील कादंबरी आलेल्या.'हिंदू ' ही कादंबरी २०१०मध्ये पॉप्युलर प्रकाशन तर्फे प्रकाशित झाली आहे. याशिवाय त्यांचे देखणी आणि मेलेडी (१९७०) हे कवितासंग्रहही प्रसिद्ध आहेत. समीक्षात्मक लेखनामध्ये टीकास्वयंवर,तुकाराम,मुलाखती,साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण,साहित्याची भाषा हे ग्रंथही प्रकाशित आहे.

विद्यार्थी मित्रहो, या ठिकाणी आपण संत ज्ञानेश्वर,सावित्रीबाई फुले,बहिणाबाई चौधरी आणि भालचंद्र नेमाडे यांच्या अभ्यासाला असणाऱ्या कविता पाहूयात…

४.३. विषय विवेचन :

४.३.१ * संत ज्ञानेश्वर-

१. पैल तो गे काऊ कोकताहे

पैल तो गे काऊ कोकताहे । शकुनगे माये सांगताहे ॥१॥
उडरे काऊ तुझे सोन्याने मढीन पाऊ । पाहुणे पंढरी-रावो घरा कै येती ॥२॥
दहिभाताची उंडी लाविन तुझ्या तोडीं । जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगीं ॥३॥
दुधे भरूनि वाटी लावीन तुझे वोंठीं । सत्य सांगें गोठी विठो येईल कायी ॥४॥
आंबया डाहाळीं फळे चुंबी रसाळीं । आजिचेरी काळीं शकून सांगें ॥५॥
ज्ञानदेव ह्मणे जाणिजे ये खुणें । भेटती पंढरीराणे शकुन सांगें ॥६॥

संत ज्ञानेश्वरी हे वारकरी पंथाचे संस्थापक होय. मुळचे नाथपंथीय. वयाच्या १८व्या वर्षी त्यांनी 'ज्ञानेश्वरी' लिहून पूर्ण केली. ज्ञानेश्वरी म्हणजे भगवद्गीतेवरील मराठीमध्ये केलेली टीका होय. आळंदी याठिकाणी वयाच्या २१व्या वर्षी त्यांनी समाधी घेतली.

'पैल तो गे काऊ कोकताहे' हा ज्ञानेश्वरांनी लिहिलेला एक सुंदर अभंग आहे. तसेच ही एक विरहिणी आहे. विरहिणी म्हणजे परमेश्वराच्या भेटीची आर्तता होय. यामध्ये पलीकडे जो कावळा ओरडत आहे तो मला काहीतरी शुभ शकुन देत आहे. असे सांगितले आहे. कारण घराजवळ कावळा ओरडला म्हणजे घरी कोणीतरी पाहुणा येणार असल्याचा संकेत असतो. जर तो ओरडून पुन्हा उडून गेला तर पाहुणा नक्कीच येणार असाही समज रूढ आहे. म्हणून संत ज्ञानेश्वर त्या कावळ्याला सांगतात की,' हे काऊ,तू उडून जा आणि माझे पाहुणे पंढरीराया माझ्या घरी केव्हा येणार आहेत ते सांग.' हे जर तू सांगितलेस तर मी तुझ्या ओठाला दुधाची वाटी लावीण. परंतु माझा विठू कधी येईल याबद्दल मला खरे खरे काय ते सांग.

पुढे ज्ञानेश्वर म्हणतात, तू आता आंब्याच्या फांदीवर जा. तिथली गोड गोड फळे चाख आणि मला हा शुभ संकेत सांग. म्हणजे माझा जिवलग सखा विठ्ठल मला आज भेटेलच अशी खात्री तू दे! संत ज्ञानेश्वरांनी कावळा हा शब्द उच्चारायला जरा जड वाटत असल्याने 'काऊ ' हा शब्द वापरलेला आहे. या शब्दामागे एक जिव्हाळाआहे.

२. रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा!

रुणुझुणु रुणुझुणुरे भ्रमरा । सांडी तूं अवगुणुरे भ्रमरा ॥१॥
चरणकमळदळुरे भ्रमरा । भोगीं तूं निश्चळुरे भ्रमरा ॥२॥
सुमनसुगंधुरे भोंवरा । परिमळ विदुरे भोंवरा ॥३॥
सौभाग्य सुंदरे भ्रमरा । बापरखुमादेवीवरे भ्रमरा ॥४॥

ज्ञानेश्वरांनी रचलेला हा एक रूपकात्मक अभंग आहे. रुणुझुणु म्हणजे गुंजारव करणारा भ्रमर होय. हा भ्रमर म्हणजे माणसाचे चंचल मन आहे.त्याचा एकाच ठिकाणी ठावठिकाणा असत नाही. ते सतत कोणत्या ना कोणत्या विचारात असते. काही अभ्यासाकाच्या मते जीवाला 'भुंगा 'असे म्हटले आहे.

संत ज्ञानेश्वरांनी आपल्या मनाला उपदेश देताना असे म्हटले आहे की, तू आपल्यातील अवगुण सोडून दे. विठ्ठलाच्या पायी मनात आढळ अशी श्रद्धा ठेव. त्याच्या भक्तीचा परिपूर्ण असा सुगंध घे. जो भक्ती प्रेमाचा परिमळ मला संतरुपी सहवास लाभला तो मी पसरवला आहे. हे भ्रमरा तू स्वतः नादब्रह्म आहेस. तुझे जे रूप आहे ते पाहणे म्हणजे सौभाग्यापेक्षा सुंदर आहे. या तेजामध्ये न्हन मला आत्मसुख भोगायचे आहे. हा आत्मरुपी विठ्ठल म्हणजे नादरूपी भ्रमर आहे. त्यामुळे तुमच्या तेजाचे दर्शन व्हावे अशी मनाला आस लागली आहे. या अभंगातून मनाचा निर्मळपणा आणि भक्तीचा आनंद याला खूप महत्त्व असल्याचे सांगितले आहे.

४.३.२. सावित्रीबाई फुले:

१९ व्या शतकातले स्त्री जीवन हे अनेक प्रकारच्या रूढीत जखडलेले होते. स्त्रीला या काळात स्त्रीला स्वातंत्र्य नव्हते. तिला पारतंत्र्यावरच कायमचे शिक्कामोर्तब करून ठेवले होते. याच काळात समाज सुधारणेची चळवळ मूळ धरू लागली होती.सर्व समाजसुधारकांनी स्त्री सुधारणा आणि शिक्षण यांना या चळवळीत अग्रस्थान दिले. त्यामध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या पत्नी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या खांद्याला खांदा लावून केलेले कार्य भावी काळातील स्त्रियांसाठी महत्त्वपूर्ण ठरलेले दिसते. त्यामुळे त्या शिकलेल्या पहिल्या स्त्री,पहिली शिक्षिका ठरतात. स्त्री ही माणूस असून पुरुषाप्रमाणेच तिला प्रतिष्ठा मिळायला हवी हे त्यांनी आपल्या कृतीतून सांगितले.

सावित्रीबाई फुले यांच्या कार्याकडे प्रकाश टाकल्यावर त्यांनी महात्मा फुले यांच्या बरोबरीने मुलींसाठी व अस्पृश्यासाठी शाळा काढणे,बालहत्या प्रतिबंधे गृह चालवणे,गोरगरिबांसाठी रात्र शाळा काढणे, दुष्काळात गरिबासाठी अन्नछत्र सुरू करणे, केशवपन, विधवा विवाह बंदी,देवदासी प्रथांचे उच्चाटन करणे अशी महत्वपूर्ण कार्ये केलेली आहेत. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळील त्या अग्रभागी होत्या. त्यांचे साहित्य वाचताना सात्विक,सोज्वळ,घरंदाज सावित्रीबाई, समाजशिक्षिका विद्रोही कार्यकर्त्या,सत्यशोधक सावित्रीबाई असे विविध पैलू त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून दिसून येतात .

१.तयास मानव म्हणावे का?

१. तयास मानव म्हणावे का?

ज्ञान नाही विद्या नाही
ते घेणेचि गोडी नाही
बुद्धी असुनि चालत नाही
तयास मानव म्हणावे का? ॥ १ ॥

दे रे हरी पलंगी काही
पशुही ऐसे बोलत नाही
विचार ना आचार नाही
तयास मानव म्हणावे का? ॥ २ ॥

पोरे घरात कमी नाहीत
तयांच्या खाण्यासाठीही
ना करी तो उद्योग काही
तयास मानव म्हणावे का? ॥ ३ ॥

सहानुभूती मिळत नाही
मदत न मिळे कोणीचीही
पर्वा न करी कशाचीही
तयास मानव म्हणावे का? ॥ ४ ॥

जोतिष रम सामुद्रिक हो
स्वर्ग नरकाच्या कल्पनाही
पशुत नाही त्या जो पाही
तयास मानव म्हणावे का? ॥ ५ ॥

बाईल काम करीत राही
ऐतोबा हा खात राही
पशू पक्षात ऐसे नाही
तयास मानव म्हणावे का? ॥ ६ ॥

संसारी दारिद्र्य राही
पांघरून तयावर नाही
निंदिती सगळे लोकही
तयास मानव म्हणावे का? ॥ ७ ॥

लिहीणे वाचणेही नाही
उपदेश पटायचा नाही
पशुंना कळे ते न कळेही
तयास मानव म्हणावे का ॥ ८ ॥

पशुत्वाची लज्जा नाही
त्यालाच मानीतो सुखही
पशुजीवाची लक्षणे ही
तयास मानव म्हणावे का? ॥ ९ ॥

दुसऱ्यास मदत नाही
सेवा त्याग दया माया ही
जयापाशी सद्गुण नाही
तयासा मानव म्हणावे का? ॥ १० ॥

गुलामगिरीचे दुःख नाही
जराही त्यास जाणवत नाही
माणुसकीही समजत नाही
तयास मानव म्हणावे का ॥ ११ ॥

पशुपक्षी माकड माणुसही
जन्ममृत्यू सर्वांनाही
याचे ज्ञान जराही नाही
तयास मानव म्हणावे का? ॥ १२ ॥

या कवितेत एकूण बारा कडवे असून समाज चिंतन पर त्याची मांडणी येते. ज्या माणसाजवळ ज्ञान,विद्या याची गोडी नाही आणि ज्याला बुद्धी आहे पण त्याचा तो जर वापर करत नसेल तर त्याला मानव म्हणावे का? असा प्रश्न त्या विचारतात.' दे रे हरी पलंगावरी ' अशी पशुपक्षीही बोलत नाहीत घरामध्ये मुले बाळे भरपूर आहेत पण त्यांच्या खाण्यासाठी काहीच उद्योग तुम्ही जर करत असाल तर तुम्हास मानव म्हणावे का? जोतिष, स्वर्ग, नरक या कल्पना घेऊन तुम्ही जर या विश्वात जगत असाल तर तुम्हाला काय म्हणावे असा सवालही त्या करतात.

जो व्यक्ती काही वाचत नाही,लिहीत नाही आणि त्याला कुणी सांगितलेला विचार जर पटत नसेल किंवा पशुपक्षासमान लक्षणे ज्याच्या गुणात आहेत अशा माणसांना माणूस म्हणावे का हा प्रश्न त्या नेमकेपणाने विचारतात. जी व्यक्ती आडल्या नडलेल्यास मदत करत नाही, दयामाया दाखवत नाही त्याच्याजवळ थोडी तरी विवेकबुद्धी आहे की नाही. त्याचबरोबर आपण गुलामगिरीत आहोत हे ज्यास जराही जाणवत नाही, माणसातली

माणुसकी ज्याला समजत नाही त्याला मानव म्हणावे का? शेवटी त्या म्हणतात पशुपक्षी,माकड किंवा माणूस यांना जन्म मृत्यू कुणालाही चुकलेला नाही. त्यामुळे याचे ज्ञान ज्याला अजिबात नाही त्याला मानव म्हणावे का? असा प्रश्न त्या उपस्थित करतात. या कवितेतून थेट उपदेश करण्यापेक्षा माणसाने विवेकवादी कसे असावा याची मांडणी येते. तसेच सत्यशोधकी प्रबोधनाचा विचार यातून प्रस्तुत होतो.

२. राणी छत्रपती ताराबाई

छत्रपती सिंहासनीची एक राणी ताराबाई
कोल्हापूरची जगदंबा महिराष्ट्राची अंबाई
शत्रुवर घाली छापा काळ तयाची ती होई
जेरीस शत्रूला करून करी बेफाम चढाई

न्हाऊन टाकी रणभूमी
शत्रु रक्तानी सारी
चपलता विजेची जैसी
तशीच कडाडे संहारी

ही एकच शूर रणगाजी छत्रपती ताराबाई
शिवधनू प्रतापी माझी वीरांची रणदेवाई
जयभवानी जयजयकार जय ताराराणी ललकार
तिज करी मी नमस्कार शूर देवीचा जयजयकार

चाल कटाव.....

कोल्हापूरची महान राणी
छत्रपती शोभते भूषणी
शुभहस्ते तलवार भवानी
ताराबाई असुरमर्दीनी ॥ १ ॥

ताराबाई माझी मर्दीनी
भासे चंडिका रणांगणी
रणदेवी ती श्रद्धास्थानी
नमन माझिये तिचिया चरणी ॥

छत्रपती ताराराणी ह्या करवीर राज्याच्या म्हणजे कोल्हापूरच्या राजगादीची ज्यांनी स्थापना केली आहे त्या होय. छत्रपती राजाराम महाराज यांच्या त्या पत्नी होत. तर छत्रपती शिवाजी महाराज यांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या त्या कन्या होत.

सावित्रीबाई फुले यांनी राणी छत्रपती ताराबाई यांच्यावरती रचलेले हे काव्य म्हणजे ताराराणीचा पोवाडाच होय. आपल्या समाजातील मुलींना शिक्षण घेत असताना त्यांच्या नजरेसमोर इतिहासातील शूर आणि लढवय्ये पात्रे असली पाहिजेत याची जाणीव सावित्रीबाईना होती. म्हणून त्यांनी वीररसातील ही कविता लिहिली आहे. ताराबाईंचा गौरव करताना प्रारंभीच त्या म्हणतात, " छत्रपती सिंहासनीची एक राणी ताराबाई कोल्हापूरची जगदंबा महिराष्ट्राची अंबाई" विजेची चपळता जशी आहे तशी ही ताराराणी असून शत्रूला ती रणभूमीवरती युद्धात जेरीस आणते. ही एक रणरागिणी असून शूर आहे. मी जर कुणाचा जयजयकार करणार असेल तर ह्या ताराराणीचा करणार आहे. कारण तिने आपले कर्तृत्व या इतिहासात सिद्ध केले आहे.

कवितेतील शेवटची तीन कडवी ही कटाव छंदामध्ये आहेत. त्यामध्ये कोल्हापूरच्या राणी छत्रपतीचा गौरव केलेला आहे. ती मर्दानी आहे त्यामुळे तिच्या चरणाला आपण नमस्कार करतोय मांडणीही याठिकाणी येते. या कवितेतून स्त्री सामर्थ्याचा गौरव आणि छत्रपती ताराबाईंनी गाजवलेले कर्तृत्व याची नेमकी माहिती तसेच एक स्त्री किती अलौकिक कार्य करू शकते याचा आदर्श वस्तूपाठच आपणासमोर मांडला आहे.

४.३.३.बहिणाबाई चौधरी

१. मन

मन वढाय वढाय
उभ्या पीकातलं ढोर
किती हाकला हाकला
फिरी येतं पिकांवर
मन मोकाट मोकाट
त्याले ठायी ठायी वाटा

जशा वाऱ्यानं चालल्या
पान्यावऱ्हल्यारे लाटा
मन लहरी लहरी
त्याले हाती धरे कोन?
उंडारलं उंडारलं
जसं वारा वाहादन
मन जह्मरी जह्मरी
याचं न्यारं रे तंतर

अरे, इचू, साप बरा
त्याले उतारे मंतर!
मन पाखरू पाखरू
त्याची काय सांगू मात?
आता व्हतं भुईवर
गेलं गेलं आभायात
मन चप्पय चप्पय
त्याले नही जरा धीर
तठे व्हयीसनी ईज
आलं आलं धर्तीवर
मन एवढं एवढं
जसा खाकसचा दाना
मन केवढं केवढं?
आभायात बी मायेना
देवा, कसं देलं मन
आसं नही दुनियात
आसा कसा रे तू योगी
काय तुझी करामत!
देवा आसं कसं मन?
आसं कसं रे घडलं
कुठे जागेपनी तूले
असं सपन पडलं !

बहिणाबाईंनी 'मन' या कवितेत माणसाच्या मनाचे वर्णन केलेले आहे. आपल्याला माणसाचा सगळा अंदाज येईल पण मनाचा काही अंदाज येणार नाही.ही काही काव्यप्रतिभा नाही तर त्यांच्या मर्मदृष्टीचे निदर्शक म्हणून या कवितेकडे पाहता येते. रानामध्ये उभ्या पिकात ढोर गेल्यानंतर तिथून परत येत नाही. त्याला किती जरी हाकलले तरी ते तिथेच थांबते. तसे मनाचे आहे. एकदा जर एखाद्या गोष्टीवर माणसाने लक्ष केंद्रित केले तर तो त्यापासून बाजूला जात नाही. त्याला तुम्ही कितीही समजावून सांगितले तर तो विशिष्ट एका गोष्टीत स्वतःला हरवून बसलेला असतो.

मन हे अत्यंत विस्तृत आणि मोकाट असते.त्याला अनेक वाटा आहेत. मनाला पाण्याच्या धारेसारखी ओढ असते. नावाडी जेव्हा नाव चालवतो तेव्हा लाटा या वाऱ्याच्या वेगापेक्षाही जास्त येतात.तशाच लाटा मनातही येतात. त्यामुळे मनात अनेक वाटा असून त्या मोकाट वाऱ्यासारख्या लहरताना दिसतात. मन हे लहर आल्यावानी आहे.त्याला हातामध्ये कोणीही धरू शकत नाही.आता इथे आहे असे वाटते पण वाऱ्याच्या वेगापेक्षाही जास्त वेगाने ते उडून जाते.ही वस्तुस्थिती आहे. मनाची आघाध महिमा सांगताना बहिणाबाई म्हणतात, मन हे विंचू,सापाहून जहरी आहे.निदान त्याच्या चाव्यानंतर उतारा तरी असतो. मात्र याच्या जहरावर उतारा नाही. कारण ते क्षणार्धात जमिनीवर असते तर क्षणार्धात आभाळात जाते. मन हे पाखरासारखे आहे ते या

ठिकाणाहून त्या ठिकाणी जाते. आता ते जमिनीवर असते तर लगेच आभाळात देखील जाते.मन हे अतिशय चपळ आहे.त्याला थोडा देखील धीर नाही.

मन एवढं बारीक आहे की, जसा खाकसाचा तुकडा आहे.पण एवढं मोठं आहे की,ते आभाळात देखील मावत नाही. त्यामुळेच बहिणाबाई देवाला म्हणतात, देवा हे मन कसं दिल, मनासारखं जगात दुसरं कोणी नाही. तू असा कसा योगी आहेस आणि ही करामत तू कशी केली आहेस. देवा असं कसं तू मन दिलं आहे.हे कसं काय घडलं आहे आणि कुठे जागेपणी तुला असं स्वप्न पडले आहे. इतकी मनाची तरल भावावस्था बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे.

२. अरे संसार संसार

अरे, संसार संसार
जसा तावा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके

तव्हा मियते भाकर !

अरे, संसार संसार
खोटा कधी म्हनू नही
राऊळाच्या कयसाले
लोटा कधी म्हनू नही

अरे, संसार संसार
नही रडनं कुढनं
येड्या, गयातला हार
म्हनू नको रे लोढनं।

अरे, संसार संसार
खीरा येलावन्हे तोड
एका तोंडा मधी कडू
बाकी सर्वा लागे गोड

अरे, संसार संसार
म्हनू नको रे भीलावा
त्याले गोड भीमफूलं
मधी गोडंब्याचा ठेवा

देखा संसार संसार
शेंग वरतून काटे
अरे, वरतून काटे
मधी चिक्ने सागरगोटे !

ऐका, संसार संसार
दोन्ही जीवाचा इचार
देतो दुःखाले होकार
अन सुखाले नकार

देखा, संसार संसार
दोन्ही जीवाचा सुधार
कधी नगद उधार
सुखादुःखाचा बेपार!
अरे, संसार संसार
असा मोठा जादूगार
माझ्या जीवाचा मंतर
त्याच्यावरती मदार

असा संसार संसार
आधी देवाचा ईसार
माझ्या दैवाचा जोजार
मंग जीवाचा आधार!

बहिणाबाई या अशिक्षित,खेड्यात राहणा-या आहेत. त्यांची श्रद्धा पारंपरिक आहे. मुळात त्यांची जीवनावर श्रद्धा आहे. त्या खेड्यात जगल्या, वाढल्या. खेड्यातील माणसांचे सारे जीवनचक्र शेताच्या जीवनचक्राशी बांधलेलं आहे याची माहिती त्यांच्या कवितेतून येते.

'अरे संसार संसार' या कवितेतून सुखदुःखाचा सामना करताना माणसाच्या मनाची होणारी घालमेल इथे चित्रित केली आहे. ज्याप्रमाणे तवा चुलीवर ठेवल्यानंतर भाकरी भाजताना हाताला चटके बसतात,मग भाकरी मिळते.तसा संसार देखील आहे.आयुष्यात अनेक दुःखे पचवल्यानंतर सुखाचे दिवस येतात.या संसाराला कधीच कुणी खोटे म्हणायचे नाही आणि मंदिराच्या कळसाला लोटा म्हणायचे नाही असे साधे तत्वज्ञान बहिणाबाई सांगते. या संसारामध्ये रडणं - कुढणं हे असणारच पण त्याला तुम्ही गळ्यातलं
लोढनं समजू नका. संसारामध्ये दोन्ही जीवांचा विचार असतो. त्यामध्ये एक सुखाला होकार देतो तर दुसरा दुःखाला नकार देतो. या संसारालाच आलेले गोड फळ म्हणजे भीमफुल आहे. या संसारामध्ये दोघांनी मिळून एकमेकांना आधार,साथसोबत द्यायची असते. जसे दुकानात रोख उधार व्यवहार असतो,तसेच संसारात सुख दुःखही असतं. कारण मानवी जीवनाचा संसार हा मोठा जादूचाच भाग आहे. अशी उपमा त्या संसाराला देतात.

असा हा संसार असून यात कधीकधी देवाला देखील आपण विसरतो. पण शेवटी आपणच आपल्या जीवनाचा आधार असतो हे विसरून चालणार नाही. अशी नात्याची वीण घट्ट करणारी मांडणी येते. या कवितेतून माणसाने निर्माण केलेली कुटुंबव्यवस्था,समाजव्यवस्था यातील ताणेबाणे यांचे चित्रण नेमकेपणाने आले आहे.

४.३.४.

भालचंद्र नेमाडे

१. रांगोळ्या

कशा रांगोळ्या काढता तुम्ही, घरंदाज व्यथांनो !
कसा सडा घालता माझ्या अंगणाचा कोपरा कोपरा खुलेल
कशी सजवता तुळशीवृंदावनाची दर्शनी बाजू,
खुडता मंजिऱ्या दुपारच्या सुकलेल्या मऊ नखांनी,
रोज नव्या हातावर केलेल्या कापसाच्या वार्तीनी लावता
माझ्या पाताळघरातला अंधार प्रार्थणारी
देवघरातली आंदणाची उभी समई,
आतबाहेर येता जाता कसल्या गुणगुणता आरत्या
पुसट शब्दांच्या सुरांच्या वेणीत अर्थ गुंफून टाकून
– तो अर्थ मी चाचपू पाहतो, पाहतो
तेव्हा भिंतीला खेटून उभा असलेल्या माझ्या
डोक्यावरच्या पिंपळाची फांदी फांदी ओरडणाऱ्या
कावळ्यांनी काळीकुट्ट लदलेली असते.

कुणासाठी ही अबोल संथ वाटपाहणी?
उंबरठ्यात रुतवलेल्या बांगड्यांच्या नक्षीलाच कळणारी
तुमच्या आंगठ्यांची लवलव कुणासाठी?
किती दिवस... हे आरशालाच माहीत असलेले तुमचे

कोरीव कुंकवाच्या चांदणीखालचे पहाटचे फटफटीत कपाळ ?

मलाही कळू द्या तुमची उभार दृष्टिघोळ जवळीक...
न्हाणीपासून आतपर्यंत उमटलेल्या पावलांची
आणि परकरांच्या किनारीवर भरलेल्या बिनपायांच्या मोरांची भुलावण
मलाही कळू द्या.

कां पदर घालून असता माझ्यासमोरही सकाळ संध्याकाळ
सदा कपाळापर्यंत...ह्या आपल्याच आपल्याच घरात?

चेहराच नसलेल्या अपुऱ्या शिल्पासारख्या बेसूर बायांनो!
माझे अंगण पांढरे झाले तुमच्या रांगोळ्यांनी.

मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते भालचंद्र नेमाडे हे कादंबरीकार आणि समीक्षक या नात्याने परिचित आहेत. पण नेमाडे हे श्रेष्ठ दर्जाची कवी देखील आहेत हे महत्त्वाचे आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महत्त्वाचे साहित्यिक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. गेल्या पन्नास वर्षापासून ते लेखन करत असून जीवन आणि साहित्याचा एक संबंध मांडणारे स्वाभिमानी लेखक आहेत. प्रारंभी त्यांनी साहित्य लेखनाचा प्रवास कवितेपासून केलेला दिसतो.फेब्रुवारी १९५६ मध्ये फर्ग्युसन कॉलेजच्या नियतकालिकात त्यांची 'निळे मनोरे' ही पहिली कविता प्रकाशित झालेली आहे. त्यानंतर छंद, रूप,अथर्व,शब्द,प्रतिष्ठान, रहस्यरंजन,युगवानी अशा काही लघुपत्रिका व नियतकालिकातून कविता प्रकाशित झाल्या आहेत.१९५६ ते १९६८ या वर्षांमध्ये लिहिलेल्या व प्रकाशित झालेल्या २४ कवितापैकी १७ कविता 'मेलडी' या संग्रहात आहेत. कविता हा शुद्ध आणि सर्वोत्कृष्ट वाड.मयप्रकार आहे असे नेमाडे म्हणतात. नेमाडेंनी कवितेच्या निर्मिती प्रक्रियेत भाषिक सर्जनाला अतिशय महत्त्व दिले आहे. एकूणच नेमाडेंच्या कवितांचा विचार करत असताना मराठीमधील काव्य परंपरा, वाड. मयीन चळवळ,सामाजिक,सांस्कृतिक पर्यावरण, मानवी जीवनाला व्यापणाऱ्या व्यवस्थांचे विविध स्वरूपाचे स्तर समजून घ्यावे लागतील.

'रांगोळ्या' या कवितेमधून स्त्रीविषयक जाणीव व्यक्त होते. या कवितेत कुटुंबातील व्यवस्थेमध्ये स्त्री असण्याचे काही संकेत स्पष्ट होतात. स्त्री ही सोशिक,इच्छा,आकांक्षा यांना मारून जगत असते. जगण्याच्या या धबडग्यात स्त्रीबद्दल कवीच्या मनामध्ये अनेक प्रश्नांचे वादळ उठले आहे. सामाजिक, कौटुंबिक जीवनात स्त्री किती दुःखी,कष्टी असली तरी आपला नियमित्ता दिनक्रम चुकवत नाही. सगळं दुःख स्वतः पचवून घराचे 'घरपण' आबाधित ठेवते. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत तिच्या शरीराला,मनाला शांततेचा अजिबात थारा नसतो. घरासमोर रांगोळी काढणे, तुळशीच्या मंजिऱ्या खुडून आणि स्वतः तयार केलेली कापसाची वात समईत लावून आरतीची गुणगुण असे त्या सबंध दिवसभर काम करत असतात. कविला अनेक स्त्रिया अशा जवळपास दिसत आहेत. त्यामुळे प्रत्येक स्त्री म्हणजे एक घरंदाज व्यथा आहे असे त्याला वाटते. या सर्वांमध्ये पुरुष आपल्या सरंजामशाहीची वागणूक स्त्रीच्या जगण्यात नेहमीच दाखवतो.

स्त्रीच्या सूक्ष्म दुःखाचे वर्णन करताना ती सुकलेली, मऊ नखे,अबोल संथ,वाटपाहणी,कोरीव कुंकवाच्या चांदणी खालचे फटफटीत कपाळ, अंगठ्याची लवलव इ. दिसते. स्त्रीच्या रांगोळ्यांनी अंगण पांढरे झाल्याची जाणीवही येते. कवीला घरंदाज स्त्री जशी रांगोळ्या काढत असताना जगण्यातील वेदनेमुळे अपुऱ्या शिल्पासारखी दिसते. म्हणजे या सगळ्या स्त्रिया चेहरा नसलेली अपुरी शिल्पे आहेत हे ते नेमकेपणाने सांगतात.

२. आजी

आजी तुझ्या ओच्यात तोंड खुपसून ओक्साबोक्सी रडणारं माझं लहानपण
तुझ्याबरोबर सृष्टीआड झालं. गेलं माझ्या आयुष्याचं केंद्र, माझं मर्म
तुझ्या पदराखाली झाकून ठेवलेलं. आता हे उरल्या आयुष्याचं रिंगण
मी किती दिवस वाहू? तुझी दीर्घायुषी आनुवंशिकता सांभाळत
वार्धक्याच्या क्रूर भीतीची ही विसर्जनपूर्व खाट
माझ्या पाठीवर किती दिवस घेऊन फिरू?

कवठाचा मधुर वास दिवसभर ओटीत सांभाळून माझ्यासाठी आणलेल्या
आयुष्याच्या दुखऱ्या जखमांभोवतून फिरत राहिलेला तुझा कष्टी हात
माझ्या वेळी सुईण तूच होतीस तूच माझ्या तोंडात पहिला श्वास भरून
ह्या आयुष्याचं शिंग फुंकलं. सटी घातली कान टोचले बाशिंग बांधलं
भाजलेल्या पायावर तुझ्या तळहाताची फुंकर टाळूवरच्या जखमेवर
आसवांची पाखर तुझे
अधोरी उपचार तापल्या पळीचे चर्रर्रे डाग, उसळत्या ऊरफुट्या
किंचाळीवर
तुझ्या निव्वळ करुणेचा वारा घालत फडफडणारा प्रदीर्घ पंख.

नव्वद वर्षांच्या तुला माझ्याकडे टाकून गेले आईबाप, म्हणत -
मेली तर इकडेच जाळून टाक कळवूसुद्धा नको. तू म्हणालीस -
ठेवसान तथी राहीन, मरेन तोवर जगेन. ते एक वर्ष तू माझी पाठीराखी झालीस
अभ्यासाच्या खुर्चीमागे माझ्या उभ्या पाठदुखीला आडवा आधार तुझी खाट
अमृतांजनचा वास आणि विठ्ठलाचा घोष किरकिरे पाठपोट रातदिवस

प्रसंगोपात्त ओव्या – *असं सासर द्वाड बाई कोंडून मारीलं,*
लेकी तुह्या माहेरपणासाठी मी हे सासर सोशीलं
नव्वद पावसाळ्याचं उत्खनन मृत्यूच्या प्रदेशात गेलेले पिढ्यांचे नकाशे
लेकी जावई नातवंडं सासूसासरे नणंदाजावा आजेपणजे जे जे गेले ते ते
तू तुझं आयुष्य जगत होतीस मी माझं - एकाच स्थळकाळात
ते माझेही कडू दिवस होते अपमानाचे ठोकरांचे टकरांचे जखमांचे
चळवळीचे तत्त्वाचे जिद्दीचे संसाराचा दोर वळण्याचे
पगाराच्या ताळ्यात झोप न येण्याचे पुढे पाहाण्याचे जागरणांचे.

आजी, तुला मी दुसरं काहीच देऊ शकलो नाही -
ऐकवली फक्त माझ्याबरोबर फिल्मी गीतं लोकगीतं जगभराच्या रेकॉर्डी टेप
कूट चर्चा संशोधनाच्या साहित्याच्या. दिली जेवणं आधार आसरा
भिंत धरून चालता चालता हात फिरवू दिला डोक्यावरून रडवा
खोडाचा पालवीला स्पर्श, आणि शेवटी पुरवला हट्ट घरी परत जाण्याचा
आंधळ्या हातांनी रोज तयारी करत होतीस,
महिनाभर लांबवत शेवटी मेटाकुटीनं पोचवलं
लहानपणी तू मला तसं मी तुला कडेवर घेत घरी.
पुन्हा भेटणं जमलं नाही कारकुनानं फोन आलेला कळवला,
आप की ग्रॅण्डमदर गुजर गयी कल शाम, बहुत याद कर रही थी बोले हैं.

आजी, तू मेलीस तेव्हा कोणी रडलं नाही कोणाचा गळा भरून आला नाही
दिसली तुझी तुटकी खाट परकर चोळ्या जस्ताची ताटली
जिच्यातली पोळी मांजराची पिलं ओढून खायची बिनधास्त
आणि गोखल्यात अनेक वर्षांच्या वैधव्याला साजेशी दाततुटकी लाकडी फणी
जिच्यातले न निघणारे शुभ्र धवल केस माझ्या बोटांना घट्ट बिलगले.

आजी, एक्क्याण्णव वर्षांची तुझी गोवरी गेली राख होऊन आमच्या भडाड
कुटुंबाच्या भानचुलीत
तुझा तळतळाट लागो माझ्या अपेशी कपाळाला जे वेळोवेळी जीवघेण्या क्षुद्र
मोहिमांपूर्वी

तुझ्या कष्टकरी पायांवर ठेवून ठेवून जी मी झिजवली मागत यश
जे तुला कधीच दिसलं नाही आणि हयाती राहो - एवढाच तुझा वर
जो मला मिळाला पण ज्याचं मोल हयातभर कळलं नाही.

या कवितेतून भालचंद्र नेमाडे यांनी एक शब्दचित्र रेखाटले आहे. त्यामध्ये आजीचे व्यक्तिमत्व, तिच्या जगण्यातील अनेक बारकावे मांडले आहेत. आयुष्यातील अनेक मधुर क्षण आजीच्या साक्षीने अनुभवल्यामुळे आजीबद्दल आदर आणि प्रेम आहे. आजीचे शब्दचित्र रेखाटताना दुःखावेगात

सुचलेल्या आशयघन प्रतिमांनी कवितेत स्त्री जीवनाचे घनव्याकुळ रूप साकार होते. विसर्जनपूर्व खाट, नव्वद पावसाळ्याचं उत्खनन, कुटुंबाची भडाड, भानचूल इत्यादी नवीन प्रतिमाबंधानी कवितेतील चिंतनाला महत्त्व प्राप्त करून दिले आहे.

आपल्या भारतीय समाजव्यवस्थेत अशा वय झालेल्या स्त्रियांच्या नशिबात आणि हाल अपेष्टा येतात. या स्त्रिया

निसंदिग्धपणे सर्वांवर प्रेम करतात. त्यामुळे कवीला आजीचे हे रूप करुण वाटत असले तरी ही अजित आपल्या संस्कृतीचे यथार्थ रूप आहे असे वाटते.नव्वद उन्हाळे,पावसाळे पचवलेली आजी खरंतर स्वतःसाठी जगलेलीच नसते. कायम ती घरदार,मुलं, नातवंडे यांचाच विचार करत असते. आजीच्या मृत्यूनंतर किती समृद्ध वारसा तिने आपल्याला दिला आहे याची जाणीव कवीला होते.

आजीचे हे आजन्म ऋण आपल्यावर आहेत हे कवी विसरू शकत नाही. शेवटी त्याला असे वाटते की, आपल्या जगण्यालाच आजीचा तळतळात लागलेला आहे. कारण आपण आजीच्या पायावरती डोकं ठेवून क्षुद्र गोष्टींमध्ये यश मागत गेलो. म्हणूनच कवी म्हणतो, तुला माझं क्षुद्र यश दिसलं नाही आणि मला तुझ्या जगण्याच्या आशीर्वादाचा मोल कळलं नाही. त्यामुळे तुझ्यासारखे दीर्घायुष्य मला लाभू नये? असा प्रश्नच कवी स्वतःला विचारतो. खेड्यामध्ये अनेक वर्षाचे वेदनांकित जीवन जगणाऱ्या आजीचे वास्तववादी चित्रण या कवितेतून आले आहे.

४.४.समारोप:

मराठी साहित्यामध्ये कवितेची परंपरा ही प्राचीन काळापासून आजपर्यंत विकसित होत गेलेली आपणास दिसून येते. संतांच्या साहित्यातून विठ्ठल भक्तीची ओढ दिसते. पंढरपूर हे आपले माहेर असल्याची जाणीव त्यांच्या अभंगातून व्यक्त होते. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या अभंगातून विठ्ठल भक्तीचा महिमा चित्रित केला आहे. सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून माणूस कोणाला म्हणायचे याचे नेमके दाखले दिले आहेत. तर राणी छत्रपती ताराबाई या कवितेतून ताराराणीचा पोवाडा आणि महात्म्य याचे वर्णन केलेले आहे. निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी यांनी मानवी मनाच्या विविध पैलूंची चित्रण 'मन'या कवितेतून केले आहे. त्याचबरोबर 'अरे संसार संसार'या कवितेत मानवी जीवन सुखी व समृद्ध होण्यासाठी संसारात दोन जीवांचा विचार महत्त्वाचा असतो असे सांगितले आहे. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक भालचंद्र नेमाडे यांनी रांगोळ्या आणि आजी या कवितेतून घरंदाज स्त्रियांच्या

कुटुंबव्यवस्थेतील वेदनांचे चित्रण केले आहे. 'आजी' सारख्या कवितेतून शब्दचित्रांद्वारे आजीच्या आठवणी जाग्या केल्या आहेत. एकूणच संत साहित्य, आधुनिक साहित्य यांचा मिलाप आत्ताच्या काळात मराठी कवितेत कसा साधला गेला आहे. याची मांडणी संत ज्ञानेश्वर,सावित्रीबाई फुले,बहिणाबाई चौधरी आणि भालचंद्र नेमाडे यांच्या कवितेतून आलेली आहे.

४.५.कठीण शब्दांचे अर्थ :

उंडी - नैवेद्य

निश्चळू - आढळ

विद्रे - पसरवणे

विरहिणी - देवाच्या विरहाने आर्त झालेल्या भक्ताच्या अवस्थेचे वर्णन असणारी काव्यरचना

कोकताहे - ओरडणे

सद्रूण - विवेकबुद्धी

भीमफुल - बिब्याला आलेले गोड फळ

जोजार - संसाराचा धबडगा

वाहादान - वावटळ

खाकस -खसखस

४.६. स्वाध्याय/ सरावासाठी प्रश्न :

अ)वस्तुनिष्ठ प्रश्न

१. संत ज्ञानेश्वरांना कोणाच्या भेटीची ओढ लागली आहे.

अ.आई बं.विठ्ठल क.वडील ड.देव

२. ज्ञानेश्वरांनी कावळ्याला काय म्हटले आहे.

अ.काऊ बं.कावळा क.चिमणी ड.पोपट

३. कोणत्या शब्द योजनेतून भ्रमराचा सूचित होतो.

अ. कोकताहे बं. नाथा क. रुणुझुणु ड. विठ्ठल

४. सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून कोणता आदर्श पाठ आला आहे.

अ.माणुसकीचा बं.प्रबोधनाचा क.तळमळीचा ड.तुमचा आमचा

५. स्त्री सामर्थ्याचा गौरव कोणत्या कवितेतून आला आहे.

अ.कणा ब. संसार क. आजी ड.राणी छत्रपती ताराबाई

६. निसर्गकन्या कोणास म्हटले आहे.

अ.सावित्रीबाई फुले बं.मुक्ताबाई क.बहिणाबाई चौधरी ड.जनाबाई

७. परमेश्वराने माणसाला दिलेली आगाध देणगी कोणती आहे.

अ. मन ब.तन क.धन ड.संसार

८. संसारामध्ये कोणाचा विचार असतो.

अ.स्वतःचा ब..दोन जीवांचा क.पोरा बाळांचा ड.संपत्तीचा

९. भालचंद्र नेमाडे हे मराठीतील ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे कितवे लेखक आहेत.

अ.पहिले बं.दुसरे क.तिसरे ड.चौथे

१०. आजी ही कविता म्हणजे काय आहे.

अ. आठवण बं.भूतकाळ क.शब्दचित्र ड.आई

*उत्तरे :

१. ब.विठ्ठल,२अ. काऊ,३.क. रुणुझुणु, ४.ब. प्रबोधनाचा, ५. ड. राणी छत्रपती ताराबाई,६.क. बहिणाबाई चौधरी,७.अ. मन,८.ब. दोन जीवांचा,९. ड. चौथे,१०. क. शब्दचित्र

*लघुत्तरी प्रश्न / टीपा लिहा

१. संत ज्ञानेश्वराच्या कवितेतील भक्तिभाव स्पष्ट करा.

२. राणी छत्रपती ताराबाईचे वर्णन सावित्रीबाई फुले यांनी कसे केले आहे.

३. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील मनाच्या
भावावस्थेचे चित्रण करा.

४. आजीचे शब्दचित्र भालचंद्र नेमाडे यांनी कसे रेखाटले आहे.

*अंतर्गत विकल्पासह दीर्घोत्तरी प्रश्न:

१. संत ज्ञानेश्वरांच्या अभंगातून व्यक्त झालेल्या विठ्ठल भेटीच्या आतुरतेचे वर्णन करा.

२. सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून माणुसकीचा महिमा कसा चित्रित झाला आहे ते सांगा.

३. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील मनाचे मनोवेधक चित्रण कसे आले आहे ते लिहा.

४. भालचंद्र नेमाडे यांच्या कवितेतील घरंदाज स्त्रियांच्या वेदना कशा आल्या आहेत ते लिहा.

४.७.उपक्रम:

१. तुमच्या परिसरातील एखाद्या कवी,कवयित्रीची भेट घ्या.त्यांच्या लेखनाविषयी आवर्जून चर्चा करा.

४.८.अधिक वाचन:

१.गीतरचना: स्वरूप आणि विवेचन (१९४०ते १९८०)
कल्याण इनामदार, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

२. मराठी कविता: स्वरूप आणि विवेचन - निशिकांत ठकार
स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे

३. कविता :संदर्भ आणि दृष्टिकोन - आशुतोष पाटील
अक्षर वाड.मय प्रकाशन, पुणे

४. आधुनिक मराठी गेय कविता - सयाजीराजे मोकाशी, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर

५. आधुनिक मराठी कविता: एक विश्लेषण - प्रकाश देशपांडे -केजकर, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

४.९.संदर्भ ग्रंथ :

१. श्री ज्ञानेश्वरदर्शन (भाग पहिला, दुसरा) संपादक रा.ब.नरहर बाळकृष्ण देशमुख , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (२०२२)
२.संत ज्ञानेश्वरांचा भक्तियोग: शंकर अभ्यंकर, आदित्य प्रतिष्ठान, पुणे (१९८९)
३. सावित्रीबाई फुले: काल आणि कर्तृत्व : संपादक मा.गो.माळी आणि इतर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९९८)
४. बहिणाईची गाणी :बहिणाबाई चौधरी, सुचित्रा प्रकाशन,मुंबई (२००४)
५. भूमिकन्या बहिणाबाई चौधरी :एक चिंतन -
स्नेहलता चौधरी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे (१९९४)
६.भालचंद्र नेमाडे यांची कविता :एक आकलन -किशोर सानप, साकेत प्रकाशन,औरंगाबाद (२००४)
७. साठोत्तरी मराठी कविता व कवी : रा. ग. जाधव,साकेत प्रकाशन,औरंगाबाद (१९९४)

******